# शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी दिलेले वचन पाळावे

## उद्धव ठाकरे यांनी धनगर समाजाला विधान परिषद उमेदवारी द्यावी

## विदर्भ धनगर परिषदेच्या बैठकीत समाजबांधवांची आग्रही मागणी

**अमरावती/ प्रतिनिधीः-**

विधान परिषदेची १२ मे रोजी निवडणूक होत असून या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी विदर्भातील धनगर समाजाला उमेदवारी द्यावी आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी एडतकरांना दिलेले वचन पाळावे, अशी मागणी विदर्भ धनगर परिषदेच्या बैठकीतून धनगर समाजाने केली आहे.



यासंदर्भात धनगर समाजाची विदर्भस्तरीय बैठक माजी आमदार हरिभाऊ भदे यांच्या अध्यक्षतेत पार पडली. या बैठकीत राजकीय मंथन करण्यात आले. १९९० मध्ये शिवसेना आमदार व जिल्हा प्रमुखांच्या बैठकीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेतर्फे वाशीम लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढविलेल्या लक्ष्मणराव एडतकर यांना विधान परिषदेत पाठवून धनगर समाजाला प्रतिनिधीत्व देण्यात येईल, असे घोषीत केले होते. बाळासाहेबांनी केलेल्या त्या घोषणेची दुर्देवाने तेव्हा अंमलबजावणी होऊ शकली नाही. परंतु आता बाळासाहेब ठाकरे यांचे ते वचन माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी, दिलीप लक्ष्मणराव एडतकर यांना विधान परिषदेची उमेदवारी देऊन पूर्ण करावे, अशी विनंती उपरोक्त बैठकद्वारे धनगर समाज बांधवांनी केली.

धनगर समाजावर सर्वपक्षीय अन्याय-

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर आजपावेतो कोणत्याही पक्षाने विदर्भात धनगर समाजाला एखादा अपवाद वगळता कुणालाही विधान परिषदेत पाठविलेले नाही. सर्वच पक्षांनी धनगर समाजाची प्रतारणा केली असून धनगर समाजाचा फक्त वापर केलेला आहे, हे सर्वश्रृत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलीप एडतकर यांच्या माध्यमातून धनगर समाजाला न्याय द्यावा व बाळासाहेबांनी दिलेला शब्द पाळावा, असे आवाहन विदर्भ धनगर परिषदेतर्फे करण्यात आल्याचे विदर्भ धनगर परिषद कार्याध्यक्ष माजी आमदार हरिभाऊ भदे यांनी म्हटले आहे.

विदर्भ धनगर परिषदेच्या बैठकीला डॉ. प्रमोद पातुर्डे, काशीराम साबळे (अकोट), भास्करराव ढेवले, संतोष साव, रमेश पाटील (नागपूर), गणेशराव पावडे (नागपूर), अरुण बांबल, हरिदास भदे (अकोला), जनार्दन पातुर्डे, उत्तमराव गोंडसे (तिवसा), डॉ. रमेश महानुर (यवतमाळ), डॉ. मेघश्याम करडे, प्रमोद तालन, दिगांबर करडे, ओंकार उंदरे (धामणगावरेल्वे), प्रकाशराव वाढे, लक्ष्मण उघडे, भाऊराव गाढवे (धामणगावरेल्वे), शिवदास कोल्हे, मनोज कचरे, अनिल कोल्हे, प्रकाशराव बोबडे, रमेश पाटेकर, अनिल चेंडकाळे ,केशव चव्हाण (पुसद), भास्कर उघडे (दारव्हा), अशोकराव मस्के, संभाजी गावंडे, अशोक गावंडे (पुसद), दिनेश बांबल, भास्कर पुनसे, प्रवीण नवरंगे, प्रा. एल. डी. सरोदे (मुर्तिजापूर), डॉ. वैभव धुमाळे, अजय साव, बाळासाहेब काळमेघ (नागपूर), सुरेश चारबैल, प्रा. राजाभाऊ काळमेघ (वरुड), प्रदीप कोल्हे, प्रवीण भागवत, राजेंद्र म्हस्के, प्रफूल्ल औघड, सदाशिव गाढेकर, दिलीप घुरडे (तिवसा), कृष्णराव बांबल (करजगाव), माधव अवघड, सुधीर गोंडसे, छाया कात्रे, जयश्री शहाकार, नंदा चाफले, ज्ञानेश्वर ढोमणे, राजू गंधे, अशोकराव इसळ, वामनराव सरोदे, महादेवराव रोकडे, पंकज गोहत्रे, ॲड. अचल कोल्हे, घनश्याम बोबडे, प्रमोद कापडे, रमेश ढवळे, राजू डांगे, प्रा. संजय लव्हाळे, सदानंद नागे, शिवहरी बोकडे, साहेबराव भदे, ब्रम्हदेव काळे, डॉ. संदीप सुशीर, प्रकाश सरोदे, बबनराव काळे डॉ. सुधाकरराव काळमेघ,ॲड. अचल कोल्हे आदी उपरोक्त बैठकीला उपस्थित होते.

महाविकास आघाडीने विदर्भाला प्रतिनिधीत्व द्यायला पाहिजे. काँग्रेसचा उमेदवार म्हणून महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष आणि प्रभारी तसेच काँग्रेसच्या वरिष्ठ नेतेमंडळीकडे विधानपरिषदेची उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज केलेला आहे. त्यावर त्यांनी विचार करावा, एकच जागा असल्यामुळे ती शिवसेनेकडे आहे, असे कळते. पण त्या जागेवर उद्धव ठाकरे उभे राहणार नसतील तर ती जागा काँग्रेसकडे जाईल आणि काँग्रेसने ती जागा धनगर समाजाला, विदर्भाला द्यावी, अशी मागणी आहे.

**-ॲड. दिलीप एडतकर**, माजी प्रदेश सरचिटणीस काँग्रेस

उद्धव ठाकरे यांच्यासाठी ती जागा सुटली नाही तर महाविकास आघाडीची ती एक जागा काँग्रेसकडे नक्कीच जाईल. दिलीपराव एडतकर यांचे काँग्रेसमध्ये जे कार्य आहे, त्यानुसार विदर्भातून ॲड. दिलीप एडतकर यांना ती जागा मिळावी, ही संपूर्ण विदर्भातील धनगर समाजबांधवांची मागणी आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेला शब्द उद्धव ठाकरे पाळणार नसतील तर शिवसेना जिल्हा समन्वयक म्हणून बाळासाहेबांचा शब्द पाळणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. त्यांच्याकडे हा प्रस्ताव नक्कीच मांडणार.

**-अरुण पडोळे,** जिल्हा समन्वयक, शिवसेना (शिंदे)

## पंचवटी चौकात आढळला अज्ञात महिलेचा मृतदेह

### -गाडगेनगर पोलिसांचा तपास सुरू

**अमरावती/ प्रतिनिधीः-**

शहरातील गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचवटी चौकाजवळ एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१८) सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास पंचवटी हॉटेलसमोरील फुटपाथवर एक अज्ञात महिला बेशुद्ध अवस्थेत पडलेली दिसून आली. याबाबत स्थानिक रहिवासी नितीन मधुकरराव वीरमारे (रा. जवाहर गेट, शनि मंदिर परिसर) यांनी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व महिलेला तातडीने उपचारासाठी इर्विन रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.


मृत महिलेचे वय अंदाजे ५० वर्षे असून ती सावळी वर्णाची, धडधाकट बांध्याची व सुमारे ५ फूट २ इंच उंच असल्याचे सांगितले जात आहे. तिचे केस काळ्या रंगाचे आहे. तिने हिरव्या रंगाचा ब्लाउज आणि पांढऱ्या-काळ्या नक्षीची लाल रंगाची साडी परिधान केली होती. तिच्या हातात एक बॅगदेखील आढळून आली आहे. दरम्यान, मृत महिलेची अद्याप ओळख पटलेली नसून ओळख पटविण्यासाठी गडगेनगर पोलिसांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास गाडगेनगर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शेंदूरजनाघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सातनूर रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विशाल धुर्वे हा तरुण २० एप्रिल रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास काही कामानिमित्त घराबाहेर गेला होता. दरम्यान रावळा ते सतनूर रस्त्यावरून जात असताना एका अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच त्याचे कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी विशालला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी मृत विशालची बहीण निधी परतेती यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेंदूरजनाघाट पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड



**अमरावती/ प्रतिनिधीः-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड करण्यात आली. जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी त्यांनी उमेदवारांनी आपल्या रोजगाराप्रती नेहमी जागृत आणि उत्साही असावे, असे सांगून कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचेही कौतुक केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृपा अर्गुलेवर, संदीप यादव, पंकज कचरे उपस्थित होते. मेळाव्यात ६ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदविला. यात १०० रिक्त पदांसाठी १४२ उमेदवारांनी नोंदणी केली. यात प्रत्यक्ष मुलाखतीनंतर ६३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांपैकी ३ उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते जागीच नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. आकाश येवले यांनी सूत्रसंचालन केले, पंकज कचरे यांनी आभार मानले.

## १ व १० वरिल उर्वरित

### राज्यात गारपिटीसह विजांचा

सतर्कता बाळगावी, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.विजेचा कडकडाट ऐकू आला किंवा वीज चमकताना दिसताच तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, मोकळ्या शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रानिक उपकरणांचा वापर करू नये. निवा-यापासून दूर असल्यास जमिनीवर आडवे न पडता पाय एकत्र करून खाली बसून राहावे.

**प्रशासनासाठी उपाययोजना-** ग्रामपंचायत, पोलिस व आरोग्य विभागांनी तातडीने जनजागृती करावी. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके सज्ज ठेवावीत. शाळा, सभागृह व सार्वजनिक इमारती सुरक्षित निवा-यासाठी खुल्या ठेवाव्यात. हवामान खात्याचे अद्ययावत इशारे गावपातळीपर्यंत त्वरित पोहोचवावेत.

**शेतक-यांसाठी विशेष सूचना-** शेतकरी बांधवांनी विजांच्या इशा-याच्या कालावधीत शेतातील कामे टाळावीत. बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे. तसेच यात्रा, धार्मिक कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दीचे आयोजन तातडीने स्थगित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**आज राज्यातील बहुतांश भागांना यलो अलर्ट**

आज कोकण पट्ट्यातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्गसह सातारा व सातारा घाट विभाग, पुणे आणि पुणे घाट विभाग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सांगली, सोलापूर, नाशिक व नाशिक घाट विभाग, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर आदी भागांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने या सर्व भागाला मंगळवारी यलो अलर्ट दिला आहे. राज्यातील काही भागांत पुढील २ दिवसांत तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घसरण होईल. यामुळे नागरिकांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळेल.

### शरद पवार पुन्हा

त्यांनी पवारांना काही दिवस विश्रांतीची गरज असल्याचे म्हटले होते. सध्या शरद पवार डॉक्टरांच्या देखरेखीखाली असून, प्रकृतीत सुधारणा होताच ते पुन्हा एकदा आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय होतील, अशी माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

**बारामतीकरांसाठी लिहिली पोस्ट-** या दरम्यान शरद पवार यांनी एक पोस्ट लिहिली आहे. यात ते म्हणाले, 'मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येउन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे. त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो. माझ्यावर अथक प्रेम व विश्वास असलेले बारामतीचे नागरिक, मतदार व कार्यकर्ते मला समजुन घेतील याची मी खात्री बाळगतो.

आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी.

बारामतीमधील मतदार यांनी माझ्यावर प्रदीर्घ विश्वास ठेवलेला आहे. ते या आवाहनास प्रतिसाद देतील, असा मला विश्वास आहे. मतदानासाठी प्रत्यक्ष न येता निवडणुक आयोगाच्या विविध पर्यायांचा देखील मी तपास केला व विचारणा केली. परंतु ते पर्याय उपलब्ध नसल्याचे राज्याच्या निवडणुक अधिका-यांकडून सांगण्यात आले. अखेर अतिशय व्यथित व जड अंत:करणाने मला मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय करावा लागला. या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करावे, असे मी बारामतीकरांना पुन्हा एकदा आवाहन करतो.

### अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह

मांडले होते. न्यायालयानेही या बाबींचा विचार करून पोलीस कोठडी वाढविण्याचा निर्णय दिला. दरम्यान, या प्रकरणाने परतवाडा परिसरात मोठी खळबळ उडवून दिली असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक संघटना व नागरिकांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून, लवकरच आणखी काही धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आरोपींकडून मिळणाऱ्या माहितीनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणी चारही आरोपींना न्यायालयात आणले असता महिला संघटनांनी या आरोपीला कठोर शिक्षा द्यावी अशी संतप्त मागणी केली. यावेळी न्यायालय परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.

### दर्यापूर न्यायालयासमोर इसमाचा

दर्यापूर न्यायालयासमोर असलेल्या कडूनिंबाच्या झाडाखाली जाऊन बसलेले काही जणांना आढळले. तेथिल रहिवाशांनी त्या व्यक्तीला पाणी सुद्धा पाजले. जास्त ऊन असल्यामुळे मी आराम करतो असे दादाराव शिवरकर यांनी पाणी

पाजणाऱ्यांना म्हटले होते . त्यानंतर सायंकाळी साडे सहा ते सात वाजताच्या दरम्यान काही नागरिकांना हालचाल करत नसल्यामुळे शंका आली. त्यांनी तात्काळ दर्यापूर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी सुद्धा घटनास्थळी धाव घेऊन डॉक्टरांच्या मदतीने तपास केला असता त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी पोलिसांना सांगितले. मृतदेहाची ओळख नसल्यामुळे व घातपात तर नाही या कारणामुळे दर्यापूर पोलिसांनी फॉरेन्सिक टीमला पाचारण केले होते. मृतदेह शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे पाठवण्यात आला होता. दादाराव शिवरकर यांचा मृत्यू उष्माघाताने झाला असावा असा प्राथमिक अंदाज लावण्यात आला आहे. तसेच पुढील तपास ठाणेदार सुनिल वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय रोहित सोनटक्के,पोहेकॉ दिलीप चव्हाण करीत आहेत.

### शासकीय-निमशासकीय कर्मचारी

अंबादास काकडे ,ऋतुराज पटोरकर, रामानंद सरस्वती ,महेंद्रसिंह ठाकूर, सतीश कापडे, फारुख खान, सुशील पवार, निलेश दडमल, अनंता मानके श्रद्धा देशमुख, लता पुंड ,रूपाली आंबेकर, माधुरी सगणे, अभिजीत भेंडे, योगेश रेवस्कर,सचिन पवार, एच.बी.घोम, विजय सावरकर, वर्षा पांगोटे, अनिल मानकर, दिलीप मेश्राम, सुनील चौकडे सह शासकीय कर्मचाऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालयसह भूमि अभिलेख, उपनिबंधक कार्यालयात तसेच इतर कार्यालयामध्ये शुकशुकाट होता.

### जिल्हा वकील संघाची निवडणुक,

ॲड. रामपाल कलंत्री यांनी घोषित केलेल्या उमेदवारांच्या अंतिम यादीवरून मिळत आहे. अध्यक्ष पदासाठी ॲड. अनिल विश्वकर्मा, ॲड. प्रशांत देशमुख, व ॲड. धनराज साधवानी यांच्या मध्ये त्रिकोणी मुकाबला होणार आहे. सचिव पदासाठी ॲड. गिरीश धर्माले, ॲड. सचिन पंडितकर यांच्या मध्ये टक्कर आहे. उपाध्यक्ष पदासाठी ॲड.इमरान नुरानी, ॲड. आर एस भोयर, ॲड.नरेंद्र गजभिये, ॲड. धनंजय तोटे यांच्यात मुकाबला होत आहे. महिला उपाध्यक्ष साठी ॲड.भावना ठाकरे खंडारे, ॲड. प्राजक्ता वरुडकर मैदानात आहे. ग्रंथालय सचिव पदासाठी ॲड.चेतन बुंदेले ,ॲड.सुमीत शर्मा मैदानात होते ,परंतु नामकणाच्या अंतिम दिवशी चेतन बुंदेले यांनी आपले नामांकन वापस घेतल्याने सुमित शर्मा यांचे निर्विरोध चयन झाले. सदस्य पदासाठी ॲड. आदित्य गुप्ता, ॲड. गौरव राऊत, ॲड. श्रीधर अकोलकर, ॲड.प्रवीण आठवले,ॲड. रोहन बाकडे, ॲड.अक्षय खराटे,ॲड.रमेश रंगारकर तथा महिला मधून ॲड.रश्मी देऊस्कर, ॲड.शितल गाहन, ॲड.सुरभी कुर्वे, ॲड.ऋतुजा पाठारे आपले भवितव्य आजमावत आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी ॲड.रामपाल कलंत्री आणि सहाय्यक अधिकारी ॲड.शोएब खान यांच्या मार्गदर्शनात निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान बुधवार २२ एप्रिल रोजी आक्षेप नोंदणी व त्यावरील सुनावणी होऊन त्याच दिवशी अंतिम निर्णय देण्यात येणार आहे. २४ एप्रिल रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याची मुदत ठेवण्यात आली असून त्याच दिवशी सायंकाळी उमेदवारांची यादी जाहीर होईल. ३० एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार आणि १ मे रोजी सकाळी १०.३० वाजता पासून न्यायालय परिसरात मतमोजणीला सुरुवात होईल. त्यानंतर निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

### आईसह मुलावर हल्ला

आणि वसीम खान पूर्वी चांगले मित्र होते. पण नंतर त्यांच्यात काही भिनसले आणि त्यांनी एकमेकांशी बोलणे बंद केले. तेव्हा पासून शेख सलमान वसीमवर रागावला होता. अशात रविवारी रात्री शेख सलमान यांनी वसीम खानला फोन करून भेटण्यासाठी रात्री ८.३० वाजता धरमकाट्या जवळ बोलावले. पण वसीम खान त्याला भेटायला नाही गेले. या मुळे संतप्त शेख सलमान आपल्या इतर चार मित्रांना तलवार, चाकू, लोखंडी पाईपसह घेऊन वसीम खानच्या घरी गेला. आरोपींनी घरामध्ये तोडफोड केली. वाहनाचे नुकसान केले. वसीम खान यांची आई आणि भाऊ मधात आले तर दोघांना मारहाण करण्यात आली. नागपूर गेट पोलिसांनी आरोपी आणि विरुद्ध कलम ११८ (१), १८९(२),१८४(४),१९०,१९१(१),१९१(३),१९२(२),३२४(४),३२३,३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

### दिवसाढवळ्या घरफोडी करणाऱ्या

मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. माहिती नुसार प्रतापसिंग रूपसिंग तवंर (वय ६५) यांनी ९ एप्रिल रोजी तक्रार दिली होती की ते, ९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता दरम्यान ड्रीमलॅंड येथे घराला कुलूप कोंडा लावून गेले होते. ते जेव्हा परत आले तेव्हा घरातील कुलूप कोंडा तुटलेला दिसला आणि सोन्याचे दागिने गायब दिसले. त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. प्रकरणाच्या तपासादरम्यान गुन्हे शाखाला गोपनीय माहिती मिळाली की, अमरावती येथील पोलीस रेकॉर्डवरील महिला हिने सदर गुन्हा केला असून पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. गुन्हा संबंधाने विचारपूस केला असता तिने कबुली दिली. चोरी केलेला मुद्देमाल परिचयातील सोनार विवेक कुंबलवार यांना विक्री केल्याचे सांगितले. यावरून पोलिसांनी सोनार विवेक कुंबलवार यांना सुद्धा ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३४.६९ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. आरोपींना पुढील तपासणीसाठी दर्यापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक मूलचंद भांबुरकर, अंमलदार अमोल देशमुख, संतोष तेलंग़, सचिन मिश्रा, सुधीर बावणे, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, वृषाली वाळसे, जयश्री खंडारे, प्रीती सोनार, हर्षद घुसे यांनी केली.

### नांदगाव पेठ परिसरात केबल

शेतातून केबल चोरी करण्यात आली असून, एकूण नुकसान तीन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

दुपारच्या कडक उन्हात शेतकरी शेतात नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी ही चोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, हे चोरटे दररोज वेगवेगळ्या शेतांवर डोळा ठेवून टप्प्याटप्प्याने केबल चोरी करत असल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर प्रा. मोरेश्वर इंगळे यांच्या नेतृत्वात संतप्त शेतकऱ्यांनी एकत्र येत नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात सामूहिक तक्रार दाखल केली आहे. चोरट्यांचा तत्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी ज्ञानेश्वरराव ढेंगे,प्रवीण शेंडे,प्रकाश तायडे, सुरेश इंगळे,अतुल राऊत,संजय बैस,सरीता बैस,सचिन नागापुरे,सचिन आमले,अरुण गिर्हे, धीरज गिर्हे, चेतन गिर्हे, जीवन नागापुरे, श्याम तायडे, योगेश तायडे,सुभाष आमले, सचित राऊत आदी शेतकरी निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

**वाहनांच्या बॅटरी चोरीतही वाढ-** नांदगाव पेठ परिसरात केवळ केबल चोरीच नव्हे, तर वाहनांच्या बॅटरी चोरीच्या घटनांमध्येही दिवसेंदिवस वाढ होत आहे. विशेषतः ट्रॅक्टर, ट्रक आणि इतर जड वाहनांच्या बॅटऱ्या लक्ष्य करून चोरटे सक्रिय झाले आहेत. रात्रीच्या वेळी उभ्या असलेल्या वाहनांमधून बॅटऱ्या चोरून नेण्याचे प्रकार वाढल्याने वाहनचालक आणि मालकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

**पोलिसांची गस्त वाढवली जाईल-**

'परिसरातील केबल व बॅटरी चोरीचे प्रकरण गंभीर आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात येणार असून, संपूर्ण भागात पोलिसांची गस्त वाढवली जाईल. नागरिकांनी संशयित हालचाल दिसल्यास तात्काळ ११२ वर संपर्क साधावा. **-दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक, नांदगाव पेठ**

### धामोडी गावचा ७५ वर्षांचा

लागतो, तर शेतकऱ्यांचे उत्पादन बाजारात नेणेही अवघड बनते.

दोन दिवस उपोषण करूनही प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. 'आम्हाला आमच्या हक्काचा रस्ता मिळवण्यासाठी भीक मागावी लागतेय का?' असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत लवकरात लवकर उर्वरित रस्ता पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस पावले उचलणार का?याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

रस्त्याचे काम चालू झाले असून उर्वरित रस्त्याच्या कामासाठी निधी प्राप्त होताच ते काम लवकरच करण्यात येईल असे जिल्हा परिषद बांधकाम विभाग दर्यापूर यांच्याकडून सांगण्यात आलेले आहे.

**-पुनम अमोल गावंडे- सरपंच, धामोडी**

रस्त्याच्या संदर्भात प्रशासनास वारंवार निवेदन सादर करूनही अद्याप पर्यत कुठलीच दखल घेतल्या गेली नाही. याचा फटका शालेय विद्यार्थी व इतर नागरिकांना बसत असून नाहक त्रास सहन करावा लागत आहे.**-मंगला मा. देशमुख-सरपंच, शिवर**

प्रशासनाच्या विरोधात आंदोलने करूनही अद्याप पर्यंत कुठलाच ठोस निर्णय घेतला गेला नसून अधिकाऱ्यांकडून व लोकप्रतिनिधी कडून फक्त आश्वासने दिल्या जात आहे. विकास मात्र शून्य आहे.

**-रोहन डिक्कर (रावण), आंदोलनकर्ता**

### सोन्याचे दागिने चमकवण्याच्या

गणोरी येथे कुटुंबीयासह राहतात. सोमवारी दुपारी त्यांच्या घरात दोन अनोळखी इसम आले.त्यांनी घोरमाडे यांना सांगितले की, आमच्याकडे सोने-चांदीचे दागिने चमकून देण्यासाठी विशिष्ट पावडर आहे. यावरून घोरमाडे यांनी २० ग्रॅम सोन्याचा गोफ किं. १ लाख रुपये, ५ ग्रॅम सोन्याची अंगठी २५ हजार, २० ग्रॅमची काळ्या मणीची सोन्याची पोत कि.१ लाख रुपये असे २ लाख २५ हजार रुपये दागिने त्यांनी चमकवण्याकरिता दिले. त्यांनी सदर दागिने एका भांड्यामध्ये टाकले व त्या भांड्यात पाणी व त्यांच्या जवळील पावडर टाकून भांड्यातील मिश्रण गरम करण्याकरिता गॅसवर उकळण्यासाठी ठेवायला सांगितले. आम्ही आजूबाजूच्या लोकांना पावडर देऊन येतो असे घोरमाडेला सांगून ते घरून निघाले. घोरमाडे यांनी गॅसवर गॅसवर ठेवलेले दागिनेचे भांडे त्यांनी जेव्हा हलवले त्यावेळी त्यामध्ये त्यांना दागिने नाही दिसले. या मुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी दोन्ही आरोपींचा आजू बाजूने शोध घेतला पण ते मिळाले नाही. त्यामुळे आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी भातकुली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम ४०६,४२०,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २२ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४


एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# न्यू तापडिया नगर उड्डाणपुलाच्या मंजुरीवरून श्रेयवादाचा स्फोट!

## १०४.७९ कोटींच्या निधीनंतर वंचित-भाजप आमनेसामने; 'कोणामुळे मिळाली मान्यता?' वर राजकारण तापले







### प्रकल्पाची पार्श्वभूमीही वादग्रस्तच

या उड्डाणपुलाची कहाणी गेल्या दशकभरापासून रखडलेली आहे. ९ मार्च २०१६ रोजी सुमारे ५० कोटी रुपयांच्या खर्चाला मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळाली नाही. रेल्वे मार्गावरील तांत्रिक बदल, दुहेरी मार्गाची रचना, वाढलेली व्याप्ती, तसेच वाढलेले बांधकाम दर यामुळे प्रकल्पाचा खर्च दुपटीने वाढला मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी सादर केलेल्या सुधारित प्रस्तावानुसार प्रकल्पाचा खर्च १०४.७९ कोटी रुपयांवर पोहोचला. यात मूळ बांधकाम खर्चासोबतच आकस्मिक निधी, काम शुल्क, स्थापना खर्च, विमा, रेल्वे विभागाचा वाटा आणि जीएसटी वाढ यांचा समावेश आहे. खर्च दुप्पट झाल्याने उच्चस्तरीय समितीकडून मंजुरी घेण्याची प्रक्रिया पार पाडावी लागली आणि अखेर २१ एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरातील न्यू तापडिया नगर येथील अनेक वर्षांपासून रखडलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला अखेर राज्य शासनाने १०४.७९ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर नागरिकांना दिलासा मिळण्याआधीच अकोल्याच्या राजकारणात श्रेयवादाचा स्फोट झाला आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांनी या निर्णयाचे श्रेय स्वतःकडे खेचण्यासाठी जोरदार मोहीम उघडल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळेच शासन हलले आणि निर्णय झाला, असा ठाम दावा वंचितच्या पदाधिकाऱ्यांकडून केला जात आहे. न्यू तापडिया नगर परिसरातील नागरिक अनेक वर्षांपासून उड्डाणपुलाच्या प्रतीक्षेत होते. वाहतूक कोंडी, रेल्वे फाटकावर लागणारी लांबच लांब रांग, आपत्कालीन परिस्थितीत होणारा विलंब या समस्यांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी होती. या पार्श्वभूमीवर वंचितचे स्थानिक नेतृत्व सक्रिय झाले.

गटनेते निलेश देव यांनी हा प्रश्न सातत्याने मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर स्वतः आंबेडकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना थेट फोन करून जाब विचारला आणि तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले, असा दावा वंचितच्या प्रेस नोटमध्ये करण्यात आला आहे.

दुसरीकडे भाजपनेही आपली भूमिका स्पष्ट करत श्रेयाचा दावा ठोकला आहे. आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळेच या प्रकल्पाला मंजुरी मिळाली, असे भाजपकडून सांगण्यात येत आहे. मंत्रालयात झालेल्या बैठका, सादर करण्यात आलेले निवेदन आणि प्रत्यक्ष भेटी यामुळेच हा प्रस्ताव गतीने पुढे गेला, असा दावा करत भाजपने वंचितच्या दाव्यांना फेटाळले आहे.

यामुळे अकोल्यात एकाच निर्णयावरून दोन वेगवेगळ्या 'यशोगाथा' समोर आल्या आहेत. दोन्ही पक्षांनी स्वतंत्र प्रेस नोट काढत नागरिकांपर्यंत आपापली भूमिका पोहोचवण्याचा प्रयत्न केला. परिणामी, विकासाच्या मुद्द्यावर राजकीय कुरघोडी उघडपणे समोर आली आहे.

सातव चौक ते न्यू तापडिया नगर दरम्यानचा हा उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर अकोला शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. अकोला ते खरप बु. या मार्गावरील प्रवास अधिक सुलभ होणार असून औद्योगिक व निवासी भागांना मोठा फायदा होणार आहे. मात्र, काम प्रत्यक्षात कधी सुरू होणार आणि वेळेत पूर्ण होणार का, हा खरा कस लागणार आहे. तोपर्यंत अकोल्यात 'विकासापेक्षा श्रेय' या राजकारणाची धुरळा उडत राहणार, हेच चित्र सध्या दिसत आहे.

### काम महत्त्वाचे की श्रेय?

स्थानिक नागरिकांमध्ये मात्र वेगळाच सूर आहे. 'कोणामुळे मंजुरी मिळाली यापेक्षा पूल कधी पूर्ण होणार?' हा सरळ प्रश्न नागरिक विचारत आहेत. दररोज रेल्वे फाटकावर अडकणारे रुग्णवाहिका, शालेय बस आणि कामगार यांना होणारा त्रास पाहता, हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कारंजाचा अभिमान! डॉ. कटोले यांची आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रभावी कामगिरी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील प्रख्यात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पंकज वसंतराव कटोले यांनी इंदूर येथे पार पडलेल्या ५ व्या आंतरराष्ट्रीय अस्थिरोग परिषदेत प्रभावी सहभाग नोंदवत कारंजाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे.

१७, १८ व १९ एप्रिल २०२६ दरम्यान स्कायलाइन हॉटेल अँड कन्व्हेन्शन सेंटर येथे ही परिषद आयोजित करण्यात आली होती. परिषदेत MIROS (मिनिमली इन्व्हेसिव्ह रिडक्शन अँड ऑस्टिओसिंथेसिस सिस्टीम) आणि TPTS (टांगरी-प्रकाश ट्रॉमा सिस्टीम) या अत्याधुनिक फ्रॅक्चर फिक्सेशन तंत्रावर सखोल चर्चा, प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.

या परिषदेत MIROS कोर्सचे फॅकल्टी म्हणून डॉ. पंकज काटोले यांनी महत्त्वपूर्ण व्याख्यान दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे देश-विदेशातील अस्थिरोग तज्ज्ञांना आधुनिक उपचार पद्धतींची सखोल माहिती मिळाली. कारंजा सारख्या शहरातील तज्ज्ञाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपली छाप उमटवल्याने परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या अत्याधुनिक तंत्राचे जनक डॉ. मारियो टांगरी (रोम, इटली) असून त्यांनी विकसित केलेल्या MIROS पद्धतीमुळे फ्रॅक्चर उपचारात नवे मानदंड निर्माण झाले आहेत. तसेच डॉ. एल. प्रकाश यांच्या नेतृत्वाखाली या तंत्रात सुधारणा करून TPTS प्रणाली विकसित करण्यात आली आहे. हे तंत्र पारंपरिक प्लेट्स, स्क्रूज, नेल्स किंवा एक्स्टर्नल फिक्सेटर्सपेक्षा वेगळे असून लवचिक (Elastic fixation), सुरक्षित आणि जैविक दृष्ट्या अनुकूल आहे.

# फुले-आंबेडकर जयंती निमित्त उमरा शम. येथे बौद्ध उपासिका महिलांना पांढऱ्या साड्यांचे वाटप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

उमरा (शम. )ता.जि. वाशिम येथे राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण कला क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने एक प्रेरणादायी व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. समाजातील गरजू व बौद्ध उपासिका महिलांना आधार देण्याच्या उद्देशाने पांढऱ्या साड्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष शाहीर संतोष खडसे व सौ. रेखा खडसे यांच्या हस्ते बौद्ध उपासिका महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले. साडी स्वीकारताना महिलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, समाधान व कृतज्ञतेची भावना पाहून उपस्थित सर्वांच्या मनाला स्पर्श झाला. अनेक महिलांनी या उपक्रमाबद्दल मनापासून आभार व्यक्त करत, 'ही मदत आमच्यासाठी खूप मोलाची आहे,' अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यात आला.

# मधुमित्र, मधुसखी पुरस्कारासाठी नामांकने मागविली

■ प्रतिनिधी | वाशिम ■

२० मे रोजीच्या जागतिक मधमाशी दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने सन २०२६ च्या 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकने मागविण्यात आली आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देणे आणि यशस्वी मधपाळांना प्रोत्साहन देणे, या उद्देशाने मंडळाने ही पुरस्कार योजना सुरू केली असून, गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी मधपाळांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रथम पुरस्कार रु. ११ हजार, द्वितीय पुरस्कार रु. ७ हजार, तर तृतीय पुरस्कार रु. ५ हजार इतका आहे. दि. २० मे २०२६ रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून पुणे येथे आयोजित समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

# कारंजा लाड येथे महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील श्री वनवेश्वर मंदिर संस्थानात महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले.

या प्रसंगी आमदार सईताई डहाके, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, गटनेत्या शालिनी ठाकरे, नगरसेवक अतुल चिमागावे, नगरसेविका कांचन डेडुळे, ज्योती राठोड, तसेच भाजपा महिला जिल्हा पदाधिकारी सुनीता काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान समाजातील नवनिर्वाचित नगरसेवक अतुलभाऊ चिमागावे यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार सईताई डहाके यांनी बसवेश्वर जयंतीनिमित्त सर्व समाजबांधवांना शुभेच्छा देत कृतज्ञता व्यक्त केली.

माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके यांनी आपल्या भाषणात महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, 'महात्मा ही पदवी अत्यंत मोजक्या व्यक्तींना मिळते. बसवेश्वरांनी सुमारे आठशे वर्षांपूर्वी समाजाला समानतेचा संदेश दिला.

# जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविले

## युवक, युवती आणि संस्थांना गौरवाची संधी; २७ एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी युवक, युवती आणि नोंदणीकृत संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा शक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

या पुरस्कारांतर्गत दरवर्षी एक युवक, एक युवती आणि एक नोंदणीकृत संस्था यांची निवड करण्यात येते. युवक व युवती गटासाठी सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि प्रत्येकी रु. १० हजार, तर संस्थेसाठी सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि रु. ५० हजार रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. पात्रतेनुसार, संबंधित जिल्ह्यात सलग पाच वर्षे वास्तव्य असणे आवश्यक असून युवक-युवतींचे वय १ एप्रिल रोजी १३ वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्षांपर्यंत असावे. अर्जदारांनी केलेल्या कार्याचे दस्तऐवजीकरण, प्रसिद्धीपत्रे, छायाचित्रे व इतर पुरावे सादर करणे बंधनकारक आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान तीन वर्षे कार्यरत राहण्याची अटही नमूद करण्यात आली आहे. मूल्यांकनासाठी मागील तीन वर्षांतील कार्याचा विचार करण्यात येणार असून सामाजिक कार्य, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, रोजगार, विज्ञान-तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्र, नागरी समस्या निराकरण, आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या क्षेत्रांतील योगदानाला प्राधान्य दिले जाणार आहे.

नोंदणीकृत संस्थांसाठी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० व ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार नोंदणी, तसेच किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे. संस्थांनीही कार्यासंदर्भातील पुराव्यासह अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २७ एप्रिल २०२६ असून प्रस्ताव संपूर्ण कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम येथे सायंकाळी ४ वाजेपर्यंत बंद पाकिटात दोन प्रतींमध्ये सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात डहीकर आक्रमक

■ प्रतिनिधी | मालेगाव ■


महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे डही वारंगी ईरळा गोकसावगी येथील नागरिक गेल्या आठ दिवसांपासून अंधारात जीवन जगत असून तीव्र उष्णतेच्या लाटेत नागरिकांचे हाल होत आहेत महावितरणकडून ग्राहकांची आर्थिक व मानसिक लूट सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे

गेल्या आठ दिवसांपासून डही येथे वीजपुरवठा खंडित असल्याने संतप्त नागरिक मोठ्या संख्येने मालेगाव येथील महावितरण कार्यालयात दाखल झाले मात्र कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांचा रोष अनावर झाला यावेळी संतप्त ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदविला

यावेळी गजानन बोरचाटे यांनी इशारा देताना सांगितले की जर दोन तासांत वीजपुरवठा सुरू झाला नाही तर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनात भगवान बोरकर विजय शेंडगे प्रशांत ठाकरे राजु पाटील दहात्रे वसंतराव आंधळे संतोष बोरचाटे कैलास बोरचाटे श्रीकृष्ण बोरचाटे वैभव बोरचाटे आदिनाथ बोरचाटे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त - सिड बँकेच्या प्रदर्शनाचे आयोजन

## राष्ट्रीय हरित सेना एस एम सी इंग्लिश स्कूलचा अभिनव उपक्रम




■ प्रतिनिधी | वाशिम ■

निसर्ग आणि मानव यांचे नाते अतुट आहे. आपल्या बुद्धी सामर्थ्याच्या बळावर संस्कृतीची उभारणी करणारा आणि प्रचंड प्रगती साधणारा एकमेव प्राणी म्हणजे मानव .मानवाच्या या वैशिष्टया मुळे व समाज प्रियतेमुळे त्यांच्या भोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणाला सामाजिक पर्यावरणाची सुद्धा जोड मिळाली. आधुनिक काळात एकीकडे मानवाने प्रगतीची उत्तुंग शिखरे गाठली परंतु दुसरीकडे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाविषयी गुंतागुंतीची व भयानक समस्या उभ्या केल्या व वसुंधरेकडे दुर्लक्ष केले .बेसुमार वृक्षतोड केली त्यामुळे पशु -पक्षी - प्राणी देखील दिवसेंदिवस दुर्मिळ होत गेले .आपल्या देशातील अनेक शहरांमध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत आहे .जगातील आश्चर्य असणारा ताजमहल प्रदूषणामुळे काळवंडत चालला आहे .प्रशांत महासागराच्या पोटात खळबळ माजली आहे. अमेरिका, फ्रान्स इत्यादी देशात आम्ल वर्षा होत आहे. थंड हवेचे ठिकाण असलेले माथेरान ,महाबळेश्वर येथील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे .पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे .पृथ्वीचे तापमान जर १०५ अंश सेल्सिअस पर्यंत झाले तर समुद्राच्या पाण्याची पातळी वाढेल व समुद्राच्या आजुबाजुची महानगरे गडप होतील .प्रदुषणाचा भस्मासुर वसुंधरेला गिळू पाहत आहे.

याविषयी परर्यावरणविषयक जाणीवा व जागृती होउ लागल्या.विशेषतः १९७० च्या दशकापासून जगभर याबाबतच्या विचारमंथणाला चालना मिळाली. पर्यावरण रक्षण केले पाहिजे. मानवी अस्तित्व टिकवले पाहिजे आणि ते आपण समृद्ध केले पाहिजे अशी दृष्टि विकसीत होउ लागली आणि आज मानव वसुंधरेविषयी प्रयत्नशील झाला आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत आयोजित ITO (Indian Talent Olympiad) परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. विशेष म्हणजे राज्यस्तरावरही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे. या परीक्षेत इयत्ता २ री मधील ऋतुजा राम शेळके हिने राज्यस्तरावर ७ वा क्रमांक मिळवून शाळेचा नावलौकिक राज्यस्तरापर्यंत नेऊन पोहोचवला आहे. तर इयत्ता ९ वी मधील श्रावस्ती नारायण इंगोले हिने राज्यस्तरावर २० वा क्रमांक पटकावला.तसेच इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता १ ली मधील विवेक प्रभाकर कालापाड (वर्गात प्रथम) इयत्ता ४ थी मधील रोमानिका दिनेश राठोड (वर्गात प्रथम) इयत्ता ५ वी मधील अभिजीत संतोष सावंत (वर्गात प्रथम) यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शाळेचा गौरव वाढवला.याशिवाय इतर ४२ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण होऊन त्यांनीही उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली.या यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी आयोजित सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# मौजे काटा येथील स्व. आकाश कुंडलीक चोपडे यांचे मरणोत्तर नेत्रदान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील मौजे काटा येथील रहिवासी कुंडलीक परसराम चोपडे यांचा मुलगा स्व. आकाश कुंडलीक चोपडे यांच्या वयाच्या २६ व्या वर्षी दिनांक १७ एप्रिल रोजी सकाळी ०८.३० वाजता निधन झाले. चोपडे कुंटुबातील सर्वात मोठा व सर्वाना सोबत घेऊन चालणारा तसेच समाजकार्याची आवड असलेला स्व. चि. आकाश कुंडलीक चोपडे यांचे निधन झाल्याने संपुर्ण चोपडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना चोपडे कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त करत मौजे काटा येथे एक आदर्श निर्माण केला.

त्यानूसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी स्व. आकाश कुंडलीक चोपडे यांची नेत्र बुबूळे काढली व नेत्र बुबुळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी या नेत्रांच्या सहायाने दोण दृष्टि हिनांना पुन्हा प्रकाश पाहण्याची संधी उपलब्ध होणार असून चोपडे कुटुबिंयाच्या निर्णयाचे सर्वत्र कौतूक होत आहे. कुटूबिंयानी जनतेला संदेश देताना सांगितले की, नेत्रदान हि अत्यंत पवित्र व मानवतावादी कृती असुन, मृत्युनंतरही एखादयाच्या आयुष्यात प्रकाश देण्याची संधी यातुन मिळते. भारतात दरवर्षी हजारो लोक नेत्र मिळण्याच्या प्रतिक्षेत असतात. मात्र नेत्रदानाबाबत जागरुकतेच्या अभावामुळे आवश्यक तेवढी नेत्र उपलब्ध होत नाहीत. नेत्रदान करणे म्हणजे एखादयाला नवजिवन देणे. अशा कार्यात अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे. सदरील नेत्रदान करण्याकरीता स्व. चि. आकाश कुंडलीक चोपडे यांचे वडील कुंडलीक परसराम चोपडे, माजी सरपंच जाधव, प्रविण देशमुख, अतिष देशमुख, विजय करंगे, गोपाल कष्टे, विनोद देशमुख, मनोज पाचपवार, गोपाल चोपडे, ओंकार चोपडे, राजुभाउ देशमुख, प्रविणभाउ देशमुख, दिनकर अंभोरे, व समस्त चोपडे कुंटुबांचे सहकार्य लाभले.

तरी सर्व समाजातील गणमान्य व्यक्तींनी या नेत्रदान चळवळीत सक्रीय सहभाग घेवुन नेत्रदान चळवळ ही लोक चळवळ व्हावी. मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तीचे त्वरीत नेत्रदान घडवून आणावे व नेत्रदाना नंतरच मृतावर अंतिम संस्कार करावे असे अवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले असुन चोपडे कुटूंबाचे आभार मानले आहेत.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४५ ■ बुधवार, २२ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच शिक्षणाचा बोजवारा; शाळेला कुलूप, शासन गप्प

## बोरगाव हातला विद्यालय बंद; विकासाच्या गप्पांचा फुगा फुटला

-श्रमदानातून उभी शाळा संपली; खाजगीकरणाच्या लाटेत ग्रामीण शिक्षण बुडाले

-शिक्षण वाचवा'च्या घोषणा हवेत; वास्तव मात्र ओसाड वर्गखोल्यांत

**विरूळ आकाजी । सचिन देवताळे :** शिक्षण राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच एका शाळेला पटसंख्या अभावी कायमचे कुलूप लागणे ही केवळ घटना नाही, तर राज्याच्या शिक्षण व्यवस्थेवर कोरलेली काळी शोकांतिका आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील बोरगाव हातला येथील 'भारत माता विद्यालय' शून्य पटसंख्येमुळे बंद पडले असून, शासनाच्या गाजावाजाच्या दाव्यांची उघडीपणे पोलखोल झाली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण', 'डिजिटल वर्ग', 'नवीन शैक्षणिक धोरण या सगळ्या घोषणांचा गजर एकीकडे सुरू असताना, दुसरीकडे ग्रामीण भागात शाळांना कुलूप लागण्याची ही वस्तुस्थिती अंगावर शहारे आणणारी आहे. शिक्षणाच्या नावावर फुशारक्या मारणाऱ्या यंत्रणेने बोरगाव हातल्यातील या शाळेकडे मात्र पाठ फिरवली.

वर्धा धरण प्रकल्पामुळे बोरगाव हातला गाव पूर्णपणे विस्थापित झाले. घरं, शेती, आयुष्यभराच्या आठवणी पाण्याखाली गेल्या. मात्र गावकऱ्यांनी हार मानली नाही. नव्याने उभ्या राहिलेल्या गावात मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःच्या कष्टातून, श्रमदानातून 'भारत माता विद्यालय' उभं केलं. ही शाळा म्हणजे त्यांच्या जिद्दीची आणि स्वाभिमानाची ओळख होती.

पण शासनाच्या दुर्लक्षाने ही ओळखच पुसली गेली. शिक्षकांची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव आणि शिक्षणाच्या गुणवत्तेकडे झालेले दुर्लक्ष यामुळे पालकांचा विश्वास उडाला. त्यातच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांचे वाढते जाळे या दुहेरी फटक्याने ग्रामीण मराठी शाळा अक्षरशः कोलमडल्या.

मुलांचं भविष्य उज्ज्वल व्हावं या अपेक्षेने पालकांनी खाजगी शाळांकडे कूच केली. बोरगाव हातला विद्यालयातील वर्ग रिकामे होत गेलेष्ठ बाकं ओस पडलीष्ठ आणि अखेर पटसंख्या शून्यावर येऊन ठेपली. प्रशासनानेही हात वर करत शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय म्हणजे ग्रामस्थांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरला आहे.



आज त्या शाळेची अवस्था पाहून हृदय पिळवटून जातं. वर्गखोल्यांवर धुळीचे थर, मैदानावर उगवलेलं गवत आणि दरवाज्यावर लटकणारं कुलूप हे दृश्य शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष देत उभं आहे. एकेकाळी मुलांच्या आवाजाने गजबजणारी जागा आज भेसूर शांततेत हरवली आहे.

राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच शाळा टिकत नाही, तर इतर गावांचं काय असा प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत. शिक्षकांचे समायोजन होईल, फाईल पुढे सरकेल पण गावकऱ्यांच्या भावना, त्यांचा संघर्ष, त्यांची स्वप्नं यांचं काय

बोरगाव हातल्याची ही घटना केवळ एका गावापुरती मर्यादित नाही. पटसंख्या घटत असल्यामुळे राज्यातील अनेक ग्रामीण शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. ही परिस्थिती कायम राहिली, तर पुढील पिढी अंधाराच्या दरीत ढकलली जाईल, यात शंका नाही. शिक्षण हा विकासाचा पाया आहे, पण तोच पाया जर खचला, तर विकासाचे किल्ले कितीही उभारले तरी ते कोसळणारच. बोरगाव हातल्याच्या कुलूपबंद शाळेने हा इशारा दिला आहे. आता तरी शासन जागे होणार का, की ग्रामीण शिक्षणाची अंत्ययात्रा अशीच सुरू राहणार.

# वर्धेतून शिर्डी, शेगावसाठी थेट बससेवेची मागणी

## पालकमंत्री डॉ. भोयर यांचा परिवहनमंत्री सरनाईक यांच्याकडे पाठपुरावा



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील भाविकांच्या सोयीसाठी वर्धा येथून शिर्डी व शेगाव या प्रमुख धार्मिक स्थळांसाठी थेट राज्य परिवहन (एसटी) बससेवा सुरू करावी, अशी मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी नुकतीच सरनाईक यांची भेट घेऊन विषयाचे गांभीर्य मांडले.

वर्धा जिल्ह्यातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. साईबाबांच्या दर्शनासाठी दररोज अनेक नागरिक प्रवास करतात. तसेच शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठीही भाविकांचा ओढा कायम असतो. मात्र, या पार्श्वभूमीवर थेट एसटी बससेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

सध्या वर्धेतून शिर्डीसाठी कोणतीही थेट बससेवा उपलब्ध नाही. शेगावसाठीही अत्यंत मर्यादित सेवा असून, हिंगणघाट येथून केवळ एक बस धावते. त्यामुळे जिल्ह्यातील इतर भागांतील नागरिकांना प्रवासासाठी बस बदलावी लागते किंवा खासगी वाहनांचा पर्याय निवडावा लागतो. यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढत असल्याची तक्रार भाविकांकडून व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. भोयर यांनी वर्धा ते शिर्डी आणि वर्धा ते शेगाव या मार्गांवर नियमित व थेट बससेवा सुरू करण्याची मागणी केली. 'विठाई' आणि 'लालपरी' या एसटीच्या लोकप्रिय सेवांद्वारे ही सुविधा उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण व निम्न आर्थिक गटातील नागरिकांसाठी एसटी सेवा ही सर्वात परवडणारी आणि सुरक्षित मानली जाते. त्यामुळे धार्मिक स्थळांसाठी नियमित बससेवा सुरू झाल्यास भाविकांची सोय होण्यासोबतच राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नातही वाढ होण्याची शक्यता आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.दरम्यान, प्रादेशिक परिवहन विभागासाठी १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. भोयर यांनी परिवहनमंत्री सरनाईक यांचे आभार मानले. या निधीच्या माध्यमातून जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

भाविकांकडूनही ही मागणी लवकरात लवकर मान्य करून प्रत्यक्षात बससेवा सुरू करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. थेट बससेवा सुरू झाल्यास प्रवास अधिक सुलभ होऊन धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

## -वर्ध्यात धरणे आंदोलन; कामकाजावर परिणाम

**वर्धा जनमाध्यम :** जुनी पेन्शन योजना तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद आणि शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मंगळवार, २१ एप्रिलपासून बेमुदत संप सुरू केला आहे. राज्य कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, पहिल्याच दिवशी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे धरणे आंदोलन करण्यात आले.



आंदोलनकर्त्यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विविध मागण्यांबाबत घोषणा दिल्या. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. यात जुनी पेन्शन योजना लागू करणे, सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अधिसूचना जारी करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्वांसाठी आरोग्य विमा योजना लागू करणे, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, पीएफआरडीए कायदा रद्द करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे तसेच विना अनुदानित शाळांना शंभर टक्के वेतन देणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच टीईटी परीक्षा सर्व शिक्षकांवर सक्तीने लागू करू नये आणि १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. विविध कर्मचारी व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले आहेत. दरम्यान, संपाचा परिणाम जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांवर दिसून आला. जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक ठिकाणी कामकाज मंदावल्याचे चित्र होते. काही विभागांमध्ये कर्मचारी अनुपस्थित असल्याने नागरिकांची कामे रखडली. संपाची व्याप्ती वाढण्याची शक्यता असून, शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**कामकाजावर परिणाम**

बेमुदत संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक कर्मचारी संपात सहभागी झाल्याने मंगळवारी कार्यालयातील कामकाजावर परिणाम झाला. काही ठिकाणी खुर्च्या रिकाम्या दिसत होत्या.

सहभागी कर्मचाऱ्यांची संख्या (जिल्हाधिकारी कार्यालय)

अव्वल कारकून : ९३
महसूल सहाय्यक : ८६
वाहन चालक : ६
शिपाई : ६२

# लेक लाडकी योजना:मुलींचा जन्मदर व शिक्षणास प्रोत्साहन

## -वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत १ लाख १ हजाराचे सहाय्य

**५ हजार ३७६ लाभार्थ्यांना २ कोटी ६८ लाखाचे वितरण**




**वर्धा जनमाध्यम :** मुलींचा जन्मदर वाढविण्यासोबतच त्यांच्या शिक्षणास चालना देणे, मृत्युदर कमी करून बालविवाह रोखणे तसेच कुपोषण कमी करणे व शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शुन्यावर आणण्याठी लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेंतर्गत मुलीच्या जन्मापासून तर तिच्या १८ व्या वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने तिला १ लाख १ हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. जिल्ह्यात योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत २ कोटीहून अधिकचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

मुलींचा जन्मदर वाढण्यासह त्यांना शिक्षण देऊन सक्षम करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. परंतु समाजात आजही विशेषत: ग्रामीण भागात अनेकांना मुलगी म्हणजे ओझे वाटते. मुलींच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले जाते. ही बाब मुलींचा जन्मदर घटण्यास आणि त्या अशिक्षित राहण्यास कारणीभूत ठरणारी आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने लेक लाडकी योजना सुरु केली आहे.

योजनेमध्ये पात्र कुटूंबात मुलीचा जन्म झाल्यानंतर जन्मानंतर लगेच ५ हजार रुपये देण्याची तरतुद आहे. याशिवाय मुलगी इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये व वयाची १८ वर्षे पुर्ण केल्यानंतर ७५ हजार रुपये याप्रमाणे एकुण १ लाख १ हजार रुपये एवढी रक्कम देण्यात येते. योजनेमध्ये पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना त्याचप्रमाणे एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला योजनेचा लाभ दिला जातो. पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. दुसऱ्या प्रसुतीच्यावेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना योजेचा लाभ अनुज्ञेय आहे. मात्र त्यानंतर माता पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचा जन्माचा दाखला, कुटूंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थ्यांचे आधारकार्ड, पालकांचे आधारकार्ड, बँकेचे पासबुक, रेशनकार्ड पिवळे अथवा केसरी, शाळेचा दाखला, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे.

**५३७६ मुलींना २ कोटी ६८ लाखाचे सहाय्य**

या योजनेंतर्गत जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ५ हजार ३७६ मुलींना पहिला टप्पा प्रत्येकी ५ हजार याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. ही रक्कम २ कोटी ६८ लाख ८० हजार इतकी आहे. त्यात आर्वी तालुक्यातील ४८४ मुलींचा समावेश आहे. आष्टी तालुका २५७ मुली, देवळी तालुका ४७८ मुली, हिंगणघाट ५०० मुली, कारंजा तालुका ३५२ मुली, समुद्रपुर तालुका ४०४ मुली, सेलु तालुका ५२८ मुली तर वर्धा तालुक्यातील ४८५ मुलींचा समावेश आहे. मदतीची रक्कम थेट आधारलिंक बँक खात्यात वितरीत केली जाते.

# मुख्य जलवाहिनी फुटली; १४ गावांचा पाणीपुरवठा ठप्प

## -ऐन उन्हाळ्यात नागरिकांवर टंचाईचे संकट

**वर्धा जनमाध्यम :** शहरालगतच्या १४ गावांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. आर्वी मार्गावरील प्रिया पॅलेसजवळ मुख्य जलवाहिनी फुटल्याने ही समस्या निर्माण झाल्याची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पिपरी (मेघे)सह १३ गावांसाठी प्रादेशिक जलपुरवठा योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत सुमारे २० हजारांहून अधिक नळजोडण्या देण्यात आल्या असून, धाम नदीतून पाणी उचलून त्यावर प्रक्रिया करून संबंधित गावांमध्ये पुरवठा केला जातो.

मात्र, सोमवारी पंपिंग स्टेशनहून पिपरीकडे जाणारी मुख्य जलवाहिनी फुटल्याने संपूर्ण यंत्रणा ठप्प झाली. प्राथमिक माहितीनुसार, खोदकाम सुरू असताना ही जलवाहिनी फुटली. यामुळे पाणीपुरवठा तात्काळ बंद करावा लागला.

अचानक नळांना पाणी न आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या तीव्रतेत ही समस्या अधिकच गंभीर बनली आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत असून, काही भागांत कृत्रिम टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे सांगण्यात आले. जलवाहिनी दुरुस्तीनंतर लवकरात लवकर पाणीपुरवठा पूर्ववत केला जाईल, अशी माहितीही देण्यात आली आहे.

नागरिकांकडून मात्र या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त होत असून, वारंवार होणाऱ्या अशा बिघाडांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# खैरीत बालविवाहाचा डाव हाणून पाडला; प्रशासनाचा वेळीच हस्तक्षेप

## -अल्पवयीन मुलीचे लग्न थांबवून दिला दिलासा; पालकांकडून हमीपत्र

**वर्धा जनमाध्यम :** तालुक्यातील खैरी गावात होणारा अल्पवयीन मुलीचा बालविवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आणि तातडीच्या कारवाईमुळे थांबविण्यात यश आले. या घटनेमुळे एका बालिकेचे आयुष्य वाचले असून, बालविवाहाविरोधात प्रशासनाच्या सक्रिय भूमिकेचे उदाहरण समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाभूळगाव येथील एका अल्पवयीन मुलीचा विवाह खैरी येथील २४ वर्षीय युवकासोबत ठरविण्यात आला होता. याबाबतची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, चाईल्ड हेल्पलाईन आणि संबंधित विभागांनी तात्काळ हालचाल करत घटनास्थळी धाव घेतली. या पथकात महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन, पोलिस विभाग तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांचा समावेश होता. संबंधित कुटुंबीयांना खरांगणा पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी तथा बालविवाह प्रतिबंधक अधिकारी संदीप खोडे यांनी पालकांकडून बालविवाह थांबविण्याबाबत लिखित हमीपत्र घेतले.



यावेळी सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पाटील, प्रकल्प समन्वयक आशिष मोडक, अंगणवाडी सेविका मंगला भानसे, पोलिस पाटील मंगेश बावणे, तसेच चंदा नाखले, संतोष डोणे, मधुरी थूल आणि वैभव भांदककर उपस्थित होते. बालिका बाभूळगाव येथील असल्याने तेथील ग्रामपंचायत अधिकारी दीपा शिंदे यांच्याशीही तातडीने संपर्क साधून संपूर्ण माहिती देण्यात आली. चाईल्ड हेल्पलाईनच्या माध्यमातून कुटुंबीयांचे समुपदेशन करण्यात आले. बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम यांची सविस्तर माहिती देण्यात आली. बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अंतर्गत हा गुन्हा दंडनीय असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रशासनाच्या समजावणीमुळे कुटुंबीयांनी विवाह थांबविण्यास सहमती दर्शवली.

यानंतर बालिकेच्या शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आणि तिच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बालिकेला बाल कल्याण समिती, वर्धा येथे हजर करण्याच्या सूचना पालकांना देण्यात आल्या असून, पुढील कार्यवाही समितीमार्फत केली जाणार आहे.

# धुऱ्याच्या आगीने घेतला रौद्ररूप; केळीची बाग भस्मसात

## -शेजाऱ्याच्या निष्काळजीपणाचा फटका; शेतकऱ्याचे हजारोंचे नुकसान

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील सुकळी स्टेशन शिवारात धु-याला लावलेल्या आगीने रौद्ररूप धारण करत शेजारील शेतातील केळीची बाग भस्मसात केल्याची घटना २० रोजी घडली. या घटनेत शेतकरी सचिन किसान डबले यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन डबले यांची सुकळी स्टेशन शिवारात शेती असून त्यांनी शेतात केळीची लागवड केली होती. मेहनतीने जोपासलेल्या या बागेत चांगली वाढ झालेली असताना अचानक लागलेल्या आगीने सर्व चित्र बदलून गेले.

शेतालगत असलेल्या प्रकाश श्यामराव टेंभरे यांनी आपल्या शेतातील धु-यावर साचलेला कचरा जाळण्यासाठी आग लावली. मात्र, उन्हाळ्याचे वाढते तापमान आणि वाऱ्याचा वेग यामुळे ही आग नियंत्रणाबाहेर गेली. क्षणार्धात आगीने भीषण रूप घेत शेजारील डबले यांच्या शेतात प्रवेश केला.

या आगीत सुमारे ३० ते ४० केळीची झाडे जळून पूर्णतः नष्ट झाली. काही मिनिटांतच हिरवीगार बाग काळ्या राखेत परिवर्तित झाली. या घटनेमुळे डबले यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरले आहे.

घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांनी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून, अशा प्रकारच्या निष्काळजीपणावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

या प्रकरणी सचिन डबले यांनी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, उन्हाळ्यात धु-यावर कचरा जाळताना योग्य काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# आता नागरिकांना होणार केरोसीन उपलब्ध

## -प्रति शिधापत्रिका ३ लिटर केरोसीन उपलब्ध

**वर्धा जनमाध्यम :** केरोसीन विक्रीस मिळत असलेल्या प्रतिसादाचा विचार करुन उपलब्धतेनुसार व ठरवून दिलेल्या नियतनानुसार नागरिकांना केरोसीनचा पुरवठा केला जाणार आहे. यासाठी जिल्ह्याला मार्च व एप्रिल करीता ७२ कि.ली. केरोसीन नियतन मंजूर केले आहे. जिल्ह्यातील केरोसीन विक्रेत्यांनी केरोसीनची उचल करुन वितरण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रति शिधापत्रिका ३ लिटर अनुज्ञेय राहील. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटूंब गट योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य देण्यात येईल. केरोसीन विक्रीस मिळत असलेल्या प्रतिसादाचा विचार करुन केरोसीन उपलब्धतनुसार श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र राहील. ज्या कुटूंबाकडे शिधापत्रिका नाही, असे कुटूंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार वितरणास पात्र राहील.

# दारू पिऊन ड्रायव्हिंग महागात; जिल्हाभरात धडक मोहीम

**वर्धा जनमाध्यम :** वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यात वाहतूक पोलिसांनी आक्रमक भूमिका घेत दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरोधात धडक मोहीम राबवली. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली १९ एप्रिल रोजी झालेल्या या कारवाईत एकाच दिवशी १० चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. कारंजा, सांवगी, हिंगणघाट, आर्वी, सेवाग्राम, पुलगाव आणि समुद्रपूर या ठिकाणी नाकाबंदी करून पोलिसांनी तपासणी केली. दारूच्या नशेत वाहन चालविताना सापडलेल्या चालकांमध्ये छत्रपती आत्राम, संदीप काळबांडे, किरण बोबाटे, राहुल येटे, राजू सरकाटे, अविनाश बोन्द्रे, पंकज इंगळे, शुभम अडकने, गणेश सुरकार आणि प्रशांत छापेकर यांचा समावेश आहे. दरम्यान, अपघातांना आळा घालण्यासाठी ही मोहीम दररोज राबविण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. हेल्मेट, सीटबेल्ट व वेगमर्यादा पाळा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी केले आहे.



MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Proposals are invited on e-tender by this office from registered & experienced Firms/Contractors in the prescribed Tender form for **Manufacture and supply of 8 M/140 Kg and 9 M/200 Kg Prestressed Cement Concrete Poles as per REC design (latest MSEDCL approved drawing) to O&M Divisions under O&M Circle Wardha, Dist. Wardha. Tender No. SE/WRD/PSCPOLE/2026-27/T-07.**

The e-tenders can be downloaded from our website www.mahadiscom.in or http://etender.mahadiscom.in/eatApp after payment of requisite Tender fee ONLINE only. Tenders can be downloaded from **22.04.2026 to 29.04.2026**, The Pre Bid Meeting on dt. 24.04.2026 at 15:00 Hrs. The last date of tender submission is 29.04.2026 at 15.00 Hrs. & Tender will be opened on Dt. 30.04.2026, at 11.00 Hrs. if possible.

Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the News Papers separately.

Contact person: Executive Engineer (Adm)
Mobile No.**7875761027**

**NZ PRO No. 74/2026**
**Dt.21.04.2026**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**O&M, Circle, MSEDCL, Wardha.**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अंमलबजावणीची वाट?

नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने देशातील राष्ट्रीय महामार्ग हे प्रगतीचे मार्ग न ठरता अपघातांचे सापळे बनत असल्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. अतुल चांदूरकर यांच्या खंडपीठाने महामार्गांवरील अवैध पार्किंगवर देशभर बंदी घालण्याचे निर्देश दिले. महामार्गाच्या मुख्य मार्गिकेवर किंवा बाजूच्या पट्टूयावर कोणत्याही अवजड वाहनाला उभे राहण्यास मज्जाव करताना न्यायालयाने रस्ते सुरक्षेचा प्रश्न हा थेट राज्यघटनेच्या कलम २१ मधील जगण्याच्या अधिकाराशी जोडलेला असल्याचे स्पष्ट केले. बेजबाबदार प्रशासकीय धोरणांमुळे मानवी जीव धोक्यात येणे अपयश असल्याचे ताशेरे ओढत, द्रुतगती मार्ग हे मृत्यूचे कॉरिडॉर बनता कामा नयेत, असा इशाराही दिला. देशाच्या एकूण रस्ते जाळ्यात राष्ट्रीय महामार्गांचा वाटा अवघा २ टक्के असला, तरी रस्ते अपघातांतील एकूण मृत्यूंपैकी ३० ते ३६ टक्के मृत्यू याच मार्गांवर होतात. वेगवान वाहतुकीसाठी असलेल्या हायवेवर अचानक एखादा उभा ट्रक समोर दिसणे हे धोकादायकच ठरते. भारतात गेल्या दशकभरामध्ये रस्ते- महामार्गांचा विकास लक्षणीय ठरला. या काळात महामार्गांचे जाळे ६० टक्क्यांहून अधिक विस्तारले. भारत याबाबत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला. देशात सन २०१४ मध्ये ९१,२८७ किलोमीटरचे राष्ट्रीय महामार्गांचे जाळे होते. आज हा आकडा तब्बल दीड लाख किलोमीटरहून अधिक आहे. यामुळे कनेक्टिव्हिटी वाढवणे आणि लॉजिस्टिक कॉस्ट कमी करून उत्पादन खर्च कमी करणे ही दोन्ही उद्दिष्टे साध्य झाली; पण दुसऱ्या बाजूला या रस्ते मार्गांवर होणाऱ्या अपघातांची वाढती संख्या चिंताजनक आहे. या मृतांमध्ये सर्वाधिक संख्या १८ ते ४५ वयोगटातील तरुणांची असणे ही अधिक गंभीर बाब. महामार्गांच्या कडेला नियमांचे उल्लंघन करून उभारलेले धाबे आणि व्यावसायिक बांधकामांमुळे वाहनांची वर्दळ वाढते आणि मुख्य मार्गावर अडथळे निर्माण होतात. हे चित्र बदलण्यासाठीच न्यायालयाने ६० दिवसांत कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. राजस्थान आणि तेलंगणामध्ये गतवर्षी झालेल्या भीषण अपघातांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेतली आणि त्याबाबत महत्त्वपूर्ण निकाल दिला. केंद्र सरकारला या निर्देशांच्या अंमलबजावणीचा अहवाल ७५ दिवसांत सादर करावा लागणार असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन महिन्यांनंतर आहे. रस्ते अपघातांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास या समस्येची भीषणता स्पष्ट होते. २०२४ या वर्षात राष्ट्रीय महामार्गांवर सुमारे ५४,४४३ ते ५७,४८२ मृत्यूंची नोंद झाली. याचा अर्थ दररोज सरासरी १५० हून अधिक नागरिक महामार्गांवरील अपघातांत आपले प्राण गमावत आहेत. युद्धामध्ये जाणाऱ्या बळींपेक्षा ही संख्या अधिक आहे. गतवर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांत राष्ट्रीय महामार्गांवरील अपघातांत सुमारे २६,७७० लोकांचा मृत्यू झाला. उत्तर प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांनंतर राजस्थानमध्ये अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यंदाच्या वर्षी पहिल्या तीन महिन्यांत एकट्या राजस्थानमध्ये ३ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. वस्तुतः, अनेक लांब पल्ल्याच्या महामार्गांवर दर ५० ते ६० किलोमीटरवर ट्रक टर्मिनल्स किंवा विसावा केंद्रे गरजेची आहेत; परंतु त्यांची संख्या मर्यादित आहे. यामुळे ट्रकचालक नाइलाजाने महामार्गाच्या कडेला वाहने उभी करतात. प्रशासनाकडून आता जिल्हा पातळीवर विशेष सुरक्षा दल स्थापन करून अशा वाहनांवर आणि अनधिकृत धाब्यांवर कारवाई करण्यात येत असली, तरी स्थानिक राजकारण, अर्थकारण यांचे अनेक पैलू गुंतागुंत वाढवतात. ती बाजूला सारत आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन सर्वेक्षण आणि ई-चलन प्रणालीद्वारे नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीचे निर्देश देऊन न्यायालयाने रस्ते सुरक्षेबाबत एक नवी आणि कठोर नियमावली देशासमोर ठेवली आहे. महाराष्ट्र आणि इतर राज्यांत अवैध पार्किंगसाठी वाहनांच्या प्रकारानुसार दंड आकारला जातो. अवजड वाहनांसाठी तो दहा हजार रुपयांपर्यंत असू शकतो. वाहन टोईंगचे शुल्क स्वतंत्रपणे आकारले जाते. याचा अर्थ कायदे आणि नियम अस्तित्वात आहेत. ते कडक आणि कठोर आहेत. प्रश्न आहे तो अंमलबजावणीचा आणि पालनाचा. या दोन्हीही बाबतीतील ढिलाई अपघातांचा आलेख उंचावण्यास हातभार लावते. प्रगत देशांमध्ये यासाठी 'व्हिजन झीरो' हे धोरण राबवले जाते. याचा मुख्य उद्देश रस्ते अपघातांत होणारे मृत्यू शून्यावर आणणे हा आहे. तिथे महामार्गांवर अनधिकृत पार्किंग हा गंभीर गुन्हा मानला जातो. एखाद्या वाहनात बिघाड झाला, तर त्याला केवळ 'इमर्जन्सी लेन' मध्ये उभे राहण्याची परवानगी असते आणि ठरावीक वेळेत ते वाहन तिथून हटवणे अनिवार्य असते. युरोपियन देशांमध्ये महामार्गांवर दर १०० किलोमीटर अंतरावर 'सेफ अँड सिक्युअर ट्रक पार्किंग' क्षेत्र बंधनकारक आहे. तिथे चालकांना विश्रांतीसाठी सर्व सोयीसुविधा दिल्या जातात, जेणेकरून थकव्यामुळे होणारे अपघात टाळता येतील. ब्रिटनमध्ये 'इंटेलिजंट ट्रान्स्पोर्ट सिस्टीम' द्वारे महामार्गांचे २४ तास निरीक्षण केले जाते. एखादे वाहन चुकीच्या ठिकाणी उभे असेल, तर 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन' कॅमेऱ्यांच्या मदतीने तत्काळ ई-चलन पाठवले जाते. तंत्रज्ञान आणि नियमांची अंमलबजावणी यांची सांगड घालून महामार्ग सुरक्षित ठेवण्याची ही किमया भारताला साध्य करणे सहज शक्य आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण टोल नाके बंद केले; मग अवैधरीत्या महामार्गांवर थांबलेली वाहने हटवण्यात अवघड ते काय? भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राज्य पोलिस, परिवहन विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिका स्पष्ट असल्या, तरी अपघात झाल्यावर जबाबदारी निश्चित करण्यावरच अधिक चर्चा होते. या चर्चेत मूळ प्रश्न आणि उपाययोजना बाजूला पडतात. त्याबाबतची जाग पुढील मोठा अपघात झाल्यानंतरच येते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनंतर तरी ही परिस्थिती बदलेल, अशी अपेक्षा करूया.

# उत्तम शेतीची कनिष्ठ शेती का झाली?



'उत्तम शेतीची कनिष्ठ शेती का झाली?' या विषयावर स्वानुभवातून शेतकरी संघटना पाईक विजय जावंधिया यांनी केलेली चर्चा.

जन्म नागपूर या शहरात १९४७ साली झाला. वडीलांचे फार लवकर निधन झाले. त्यामुळे नागपुरच्या आजोबांनीच आमचे पालन पोषण केले. आमचा शेतीशी काहीच संबंध नव्हता. आम्ही फक्त उन्हाळ्याच्या सुट्टीत गावात कडील आजोबांकडे जात होतो. परिस्थीती समजण्याचे वय झाले तेव्हां हे लक्षात आहे की, गावाकडे आजोबा मोठे जमीनदार, पण ते नेहमीच आर्थिक 'तंगीत' असायचे. नागपुरचे आजोबा कापड व्यापारी त्यांनी शुन्यातून समृध्दीकडे वाटचाल केली होती. याचे कारण लक्षात येत नव्हते, पण १९७० साली आमच्या काकांच्या वाटण्या झाल्या व माझ्या मोठ्या भावाला ४०-४० एकर जमीन (कोरडवाहू) शेती वाट्यास आली. माझ्या मनात विचार आला की, ८० एकर जमीन आहे. आपण शेती करावी. म्हणून मी नागपूर येथे जाऊन येवून शेती करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळेस नागपुरच्या सायन्स कॉलेजमध्ये M.Sc करीत होतो. चार बैल जोड्या विकत घेतल्या. भाडयाच्या ट्रॅक्टरने (सरकारी) जमीन नांगरून घेतली. त्या काळात शेतात काम महिलांची मजूरी बारा आणे ते १ रूपये होती. माणसांची मजूरी २ ते २.५० रुपये होती. इतकी कमी मजूरी देवून १९७१ च्या पीकातून विक्रीनंतर काहीच शिल्लक राहीले नाही. ७५ ते १००रूपये क्विंटल ज्वारी, १०० क्विंटल तूर, १५० ते २०० क्विंटल कापूस असे बाजार भाव होते. १९७२-७३ नंतर संकरीत कापसाचा प्रचार-प्रसार होवू लागला. विदर्भात डॉ.मा.गो-बोकरे यांच्या विचाराने कापसाच्या भावासाठी कापूस उत्पादक संघाची स्थापना झाली. डॉ. बोकरे आणि डॉ.चोखारे कापूस ते कापड हे गणित फार सोप्या शब्दात समजवून सांगायचे. यातूनच १९७२ साली महाराष्ट्रात कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरू झाली. 'कापूस ते कापड' असे ब्रिदवाक्य या योजनेच्या प्रचाराच होते.

१९७० ते १९७२ या काळात बाहेरून काही जास्त विकत घेऊन शेती करीत नव्हत. फक्त संकरीत ज्वारीचे पिकासाठी लागणारे खत किंवा किटकनाशक. पण १९७३ नंतर संकरीत ४ कापसाचा प्रचार व प्रसार वाढला व रासायनीक खते व किटक नाशकांचा वापर वाढला. म्हणजेच भांडवली खर्चाची (Capital Investment) वाढ झाली. या हरीतक्रांतीच्या तंत्रज्ञानाने उत्पादनात वाढ झाली. उत्पादन वाढले पण बाजारात ते भाव पडायचे. १००रू.प्रती क्विंटल ज्वारी, १००रू.प्रती क्विंटल तूर व १८० ते २०० रु.प्रती किंटल कापूस विकून शिल्लक काहीच नाही. मला पहिला प्रश्न पडला की, इतकी कमी मजूरी देवून जर काहीच शिल्लक नाही तर कुटुंब कसे पोसायचे? मजूरी वाढवावी नाहीतर स्व.इंदिराजी म्हणतात, 'गरीबी हटाव' ती कशी हटणार? यातून माझ्या मनातील प्रश्नांची उत्तरे मी शोधू लागलो यात मला डॉ. बोकरे आणि डॉ.चोखारे यांची मदत झाली. वाचन केल्यावर माझ्या लक्षात असे आले की, गावाच्या गरीबीचे कारण गांवात नाही ते या व्यवस्थेत आहे. शेतमालक हा शेतमजुरांच्या गरीबीचे कारण नाही तर ही व्यवस्थाच शेतक-यांना सांगते की, तुम्ही कमीत कमी मजुरी द्या व जास्तीत जास्त काम करून घ्या. स्वस्तात स्वस्त शेतमाल (जीवनावश्यक वस्तू) आम्हाला म्हणजे शहरांना पुरवा. यात जे शिल्लक राहील ती तुमची दलाली, तुम्ही पण मरू नका व मजूरांना पण मरू देवू नका! या सर्व पार्श्वभुमीवर मनात विचार पक्का झाला की, या व्यवस्थेची ही दलाली आपल्याला करायची नाही. ही व्यवस्था आपला (शेतमालक) माध्यमातून शेतमजूरांवर (गांवावर) गरीबी लादत आहे, या व्यवस्थेलाच हा प्रश्न विचारला पाहिजे. म्हणून मी तेव्हापासून पुढाऱ्यांना प्रश्न विचारायाला प्रारंभ केला.

### पुढा-यांना प्रश्न

नागपूरला मी पुढा-यांच्या सभेत जाऊन बसायचो व त्यांचे भाषण झाल्या वर त्यांना मी प्रश्न विचारायचो, एक रुपया किलो ज्वारी विकून ज्वारीच्या शेतात काम करणा-यांची मजूरी किती व त्यात गरीबी कशी दूर होणार? याच सुमारास कापूस उत्पादक संघांच्या बैठकी होत होत्या. कापूस एकाधिकार खरेदी योजना महाराष्ट्रात सुरू झाली होती. व्यापारी खरेदी बंद झाली होती. कापूस एकाधिकार सरकारी खरेदी फक्त महाराष्ट्रात होती. मी कापूस उत्पादक संघांच्या बैठकीत जाऊन प्रश्न विचारायचो 'एकाधिकार खरेदी फक्त महाराष्ट्रात आहे. देशात तर व्यापारी खरेदी झाहे. गुजरात-पंजाब-हरियाणा-राजस्थान-आंध्रच्या राज्यातून कापसाच्या (रूई) गाठी मुबंईला येतील त्या स्वस्त असल्या तर महाराष्ट्रातील कापूस एकाधिकारातील रुई च्या गाठींना भाव कसा मिळणार? कापूस उत्पादकांना भाव कसा मिळणार? विदर्भातील सहकारी क्षेत्रातील नेत्यांना याचा राग यायचा. पण डॉ. बोकरे आणि डॉ.चोखारे हे नागपुरला नेहमी मला समजवायचे. त्यांचे हे म्हणने की, महाराष्ट्रात एकाधिकार कापूस खरेदीमुळे सरकारच एकमेव खरेदादार व तेच भाव देणार नाही तर त्यांच्या विरोधात शेतकऱ्यांना संघटीत करणे सोपे होईल. याच तर्काचा पुढे शेतकरी संघटनेच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी फायदा झाला. कापूस एकाधिकार व शेतकरी संघटनेची लोकप्रियता यावर एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. यातून एक स्पष्ट झाले की, कापसाच्या भावाचा, शेतमालाच्या भावाच प्रश्न एका राज्याचा किंवा एका पीकाचा नाही तर हा देशाच्या राजकारण व अर्थकारणाचा प्रश्न आहे. या चर्चेतूनच मला 'मोनोपोली' काय? भांडवलच संचय काय? या गोष्टी समजू लागल्यात. आज जशी इराण-अमेरिका युद्धामुळे पेट्रोल डिझेलचे भाव वाढले आहेत. त्यामुळे कापसाचे भाव वाढले अशीच परिस्थीती १९७३ साली झाली होती. जगातील तो पहिला उर्जा संकटाचा अनुभव प्रधानमंत्री इंदिराजींनी एकदम १०० टक्क्यांनी युरीया-रासायनीक खतांचे भाव वाढविले. ५० रुपये प्रती ६० किलोचे भाव एकदम १००रू झाले. १६ रू प्रती लिटर किटकनाशके ८० रू प्रती लिटर झाले. यावर्षी कापसाचे भाव २५० रू प्रती क्विंटल वरून ५५० ते ६०० रूपये लिटर झाले होते. संकरीत-५ कापसाची शेती आकर्षक वाटू लागली होती पण दुस-याच वर्षी भाव ७४-७५ कापसाच्या भावात मंदी आली व भाव ३०० ते ३५० पर्यंत पडले. खर्च वाढला पण भाव पडले. हरित क्रांतीचा फटका बसू लागला. राजकीय वातावरण तापत होत. विद्यार्थी आंदोलन सुरु झाले. स्व. जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला.

### आणिबाणीच्या काळ

१९७५ मध्ये आणिबाणी लागली. शेतीमालाचे भाव पडले पण बोंब नाही. ७४-७५, ७५-७६, ७६-७७ शेतमालाच्या हमीभावात वाढच नाही, गव्हाची एमएसपी ७४ रू प्रती क्विंटलची कायम पण कोंब नाही. कापूस एकाधिकार योजनेत कापसाचे चुकारे (पैसे) नाही, बोंब नाही. त्यावेळेस मी मुख्यमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांच्या गळ्यात नागपूर विमानतळावर कापसाच्या बोंडाचा हार घालून कापसाचे चुकारे (पैसे) द्या, ही मागणी करणारी घोषणा दिली होती. आणिबाणीत असा विरोध करणे धोक्याचे होते. या काळातच स्व.संजय गांधी व श्रीमती मेनका गांधी पवणारला स्व. विनोबाजींच्या भेटीला आले होते. यावेळेस मी विनोबाजींना एक पत्र लिहीले होते. ते नागपुरच्या 'युगधर्म' या वर्तमानपत्रात छापून आले होते. त्यात मी स्व-विनोबाजींना विनंती केली होती की, त्यांनी स्व.संजय गांधी यांना आदेश द्यावा की, त्यांनी गावात ५०एकर जमीन घेवून कसे जगायचे व मजूरांची मजूरी कशी वाढवायची हे करून दाखवावे. कारण, मला विनोबाजींवर राग होता की यांनी भूदानाच्या माध्यमातून गावाच्या संपत्तीचे वाटप केले पण शहरी संपत्तीचे काय? शेतमालाचे भाव वाढवले नाही तर मजूरी कशी वाढणार? या रागापोटी हे पत्र लिहिले होते. पण नंतर जेव्हा विनोबाजींचे साहित्य वाचले तेव्हा हे लक्षात आले की, विनोबाजींनी फक्त भुदान देणे नाहीतर त्यांनी शेतमालाच्या भावाचा प्रश्न पण मांडला होता. विनोबांनी बिहारमध्ये एका गावांत भाषण करताना असे म्हटले आहे की, शेत जमीन देवून प्रश्न सुटणार नाही तर भावातील एकतेची जरूरी आहे. कारण शहरातील सर्व गरजांची पुर्तता गावातून होते पण त्याचे भाव ठरविण्याचा अधिकार गावाला नाही. म्हणजेच शेतीमालाचा भाव कोणी मागीतला तर विनोबांनी मागीतला. पुढे ते अस म्हणतात, शहरातील लोकांना आपल्याला उपाशी मारायचे नाही. आपण ८० टक्के आहोत आपण त्यांना सांगू आम्ही ८० टक्के गावात ठेवू व २० टक्के शहरांना देवू. अर्थशास्त्राचा मागणी आणि पुरवठा शिकवला होता. स्वतंत्र भारतात झाले याच्या उलटेच. गावातील पोरांना दुध नाही पण शहरात दूध-दही, श्रीखंड, आईसक्रीम भरपूर. मजूरांच्या मजूरी बद्दलचा गांधी-विनोबा यांचा एक संवाद अत्यंत महत्वाचा आहे. पण त्यावर कधीच गंभीरपणे चर्चा झालीच नाही. विनोबा म्हणयाचे की, मी इतके चांगले सूत कातताे व एका बैठकीत ७-८ तास काम करतो. पण, मला या सुताचे २ ते ३ आणे (३०नवीन पैसा) मिळतात. यातच ते जगण्याचा प्रयत्न करायचा. एकदा बापू गांधी म्हणाले की सूत कातण्याला कमीत कमी मजूरी आठ आणे (५०पैसे) मिळाले पाहिजे. खादी महाग झाली तर हरकत नाही. यावर विनोबांची प्रतिक्रीया होती. आज बाबा (विनोबा )खुश हुवा कारण आता मला आठ आणे मिळणार. याचाच अर्थ शेत मालाचे भाव वाढले तर हरकत नाही पण शेत मजुरांची मजूरी वाढलीच पाहिजे. विनोबा एका ठिकाणी म्हणतात, 'ज्या वस्तू शेतकरी गावकरी तयार करतात त्या सर्वांनी महाग विकत घेतल्या पाहिजे व ज्या शेतक-यांना लागतात त्या स्वस्त असल्या पाहिजे'. वास्तवात दुध महाग पाहिजे पण ते स्वस्त आहे. व ग्लास स्वस्त पाहिजे ते महाग आहे. ज्या देशात ७५ टक्के लोक गांवात राहतात. शेती व्यवसायावर जगतात त्या देशात दूध, खादी, धान्य स्वस्त ठेवून देश सुखी कसा होणार? (आजची घोषणा 'सब का विकास?') ज्या मोजक्या लोकांना नियमीत चांगले वेतन मिळते त्यांचाच फक्त विचार करून चालणार नाही हे त्यांनी स्पष्ट पणे सांगितले होते.

गांधीवादी यंत्राचा विरोध करतात, त्यावर विनोबा म्हणायचे आम्ही संत्राचा विरोध करणारे नाही. आमचे म्हणणे आहे की, यंत्राणे तयार झालेली वस्तू स्वस्त व श्रमाने तयार झालेले वस्तू महाग असली पाहिजे. हाच गांधी विचार राष्ट्र सत तुकडोजी महाराजांनी, 'कच्चामाल मातीच्या भावे पक्का होताची चौपटीने द्यावे' या सोप्या शब्दात मांडला. हिच शेतक-यांची लूट महात्मा ज्योतीबा फुलेंनी 'शेतक-यांच्या आसूड' मध्ये विस्ताराने गो-या इंग्रज सरकार पुढे मांडली होती. पण ही वास्तविकता आहे की, यासर्व विचारांची दखल स्वतंत्र भारताच्या राजकारण-अर्थकारण-समाज कारणात ज्या गंभीरतेने घ्यायला हवी होती ते झाले नाही. इंग्रजांनी त्यांच्या देशाच्या विकासासाठी उघोगासाठी आपल्या देशाची लूट केली तशीच स्वतंत्र भारतात सुरु राहीली. इंग्रजांच्या काळात शेतीची लूट जमीनदारी जहागीरदारीच्या माध्यमातून मजबूत करण्यात आली होती. मी शेतकरी संघटनेच्या मंचावरून जाहीरपणे बोलायचो, माझ्या आजोबांकडे १२०० एकर जमीन आली कशी? त्याचे उत्तर सोपे आहे आमचे आजोना-पंजोबा गावात सावकार होते. इंग्रजांनी नगदीत वायदा वसुली सुरू केली तेव्हा शेतक-यांजवळ नगदी पैसे राहत नसत ते सावकाराकडून कर्ज घ्यायचे, ते कर्ज परत करता येत नव्हते. जमीनी सावकाराकडे जायची, अशी जमीन आमच्याकडे आली. जेव्हा सावकारी बंद पडली तेव्हा आमचे आजोबा जमीन विकून जगले. (मी पण ६० एकर जमीन विकून नागपूरला घर व कार विकत घेतली. शेती करून नाही.) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती विरोधी आंदोलन पण केले आह. भारताचे पहिले गृहमंत्री लोहपुरूष वल्लभभाई पटेल यांनी खेडूत समाजाची स्थापना करून वायदे बंदीचे आंदोलन केले आहे.

स्वतंत्र भारतात गावाच्या लुटीचे धोरण बदलवून गावाचा विकास ख-या अर्थाने स्वराज्य तयार होईल ही आशा निराशेत बदलली. विनोबांनी स्वतंत्र भारत कशासाठी, याची फार सुंदर व्याख्या केली आहे.

विनोबा भावे म्हणातात, हा देश स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश होता. मुगल आले तेव्हा हा स्वतंत्र गावांचा गुलाम देश झाला. इंग्रज आले तेव्हा हा गुलाम गावाचा गुलाम देश झाला. आम्हाला हा देश स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश करावयाचा आहे.

१९४७ साली स्वतंत्र झालो. पण, गाव आजही गुलाम आहेत. याचे कारण इंग्लंडचा विकास कच्च्या मालाच्या व श्रम शक्तीच्या लुटीवर होता. स्वतंत्र भारतात श्रम शक्तीच्या लूटीच्या विरोधात आंदोलन झाले. पण कच्चा मालाची लूट मागे पडली. मार्क्सचे म्हणणे महत्त्वाचे ठरते की, श्रमशक्तीच्या लुटीतून भांडवल संचय होतो पण गांधीवाद किंवा रोझ लूक्झेम्बर्गचा विचार, कच्च्या मालाच्या लुटीतून ही भांडवल संचय होतो मागे पडला. कारखान्यातील कामगार-सरकारी नोकर संगठीत झाले. त्यांचे वेतन-पेन्शन सोई सवलती वाढल्या तर दुसरीकडे गावातील जमीन मालक शेतकरी हा शोषक आहे असा प्रचार करून शेत जमीन धारण कराण्यावर सिलिंगचा कायदा आला. शेतकरी लहान लहान झाले. संघर्ष करण्याची शक्तीच राहीली नाही.

डॉ बाबासाहेबांनी, महात्मा ज्योतीबा फुलेंचाच विचार मांडण्याचा प्रयत्न केला. 'शिका-संघटीत व्हा व संघर्ष करा'. पण जो शिकला तो संघटीत झाला व पगार वाढीसाठी संघर्ष करून गांव-खेड्याला विसरला. गांधी-विनोबा विचार किंवा आंबेडकर-फुले विचार याची राजकारण अर्थकारण समाजकारणात उपेक्षा झाली म्हणूनच आज उत्तम शेती जी कनिष्ठ शेती झाली. जूनी म्हण अशी होती 'उत्तम शेती मध्यम व्यापार कनिष्ट नोकरी. आज उत्तम नोकरी मध्यम व्यापार कनिष्ट शेती अशी स्थिती झाली आहे. उत्तम नोकरी होण्याचे कारण शेतक-यांच्या आसुड-प्रकरण ३ रे वाक्य पहिले:'आर्य ब्राम्हण इराणांतून कसे आले व शुद्र शेतक-यांची मूळ पीटीका व हल्लीचे आमचे सरकार, एकंदर सर्व आपले कामगारास मन मानेल तसे पगार व पेन्शन देण्याच्या इराद्याने नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतक-यांच्या डोक्यावर बसवून, त्यांचे द्रव मोठ्या हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत.'

विनोबांनी हाच विचार, पैसा लफंगा आहे अस म्हणू मांडले होते. ही लफंगेगीरी समजण्या साठी बाबासाहेबांचे अर्थशास्त्र समजून घ्यावे लागेल. सोपे करण्यासाठी एकच उदाहरण देतो मा.प्रधानमंत्री मोदी जी २०१४ साली प्रधानमंत्री झाले. त्या वेळी त्यांच्या कार चालकाचा (ड्रायव्हर) पगार किती होता व आज (२०२६) किती आहे या तुलनेत शेतमजूरांची मजूरी वाढली का? ती हिशेबात घेऊन शेतमालाचे भाव आहेत का? याचे उत्तर नाही. असे आहे. म्हणूनच आज शेतीची कनिष्ठ शेती झाली व कनिष्ठ नोकरीची उत्तम नोकरी झाली.

सर्वांनी विचार करावा ही विनंती.

**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

## नेपाळमधील क्रांतिकारक निर्णय

नेपाळमध्ये बालेनं शहा यांनी सत्ता पंतप्रधान म्हणून हाती घेतली आहे. ते केवळ ३५ वर्षाचे पंतप्रधान आहेत. जगातील सर्वात तरुण राष्ट्रप्रमुख म्हणून त्यांचा गौरव आहे. त्यांनी विद्यार्थी आंदोलनात भाग घेतला होता. नेपाळमधील सत्ता हाती घेतली होती त्यांनी नेपाळमधील काठमांडू शहराचे महापौर म्हणून काम केले होते. सत्तेवर आल्यानंतर त्यांनी राज्यातील खाजगी शाळा बंद केल्या व सरकारी शाळांना पुनर्जीवन दिले. सरकारी कर्मचाऱ्यांना दर १५ दिवसांनी पगार देण्याचे अर्थमंत्र्यांनी ठरविले आहे. मासिक वेतन देण्याची परंपरा आता मोडीत निघणार आहे.

या निर्णयाचे नेपाळमधील कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे . सरकारी कर्मचाऱ्यांच्या हातात अधिक वेळा पैसे आल्यास खर्चात वाढ होऊ शकते .त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो नेपाळमध्ये अनेक क्रांतिकारक निर्णय शहा यांनी घेतले आहेत कारभारातील भ्रष्ट्राचार निपटून काढण्याचा त्यांचा मानस आहे . नेपाळमधील निर्णय स्वागतार्ह आहेत.

**शांताराम वाघ**

## मराठी खाद्य संस्कृतीचे जतन होणे आवश्यक

मराठी मुलाखात पिढ्यानपिढ्या तयार केले जाणारे पदार्थ जतन करण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेनुसार खाद्य संस्कृतीची विविधता आढळते. येत्या चार वर्षात मराठी खाद्य संस्कृतीचे विविध पैलू संग्रहित करण्यात आलेले हे कोश तयार होतील. त्याकरिता राज्य सरकारने दीड कोटी रुपयांचा निधी देण्याचे मान्य केले. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद मार्गदर्शक समिती म्हणून काम पाहणार आहे. या कोशामधून मराठी खाद्य संस्कृतीची महत्ता, विविध पेये आणि खाद्य पदार्थांची यादी संबंधित पदार्थ तयार करण्याची शास्त्रीय आणि पारंपारिक पद्धत, त्याचे आधुनिक युगातील महत्व, पोषण मूल्यांची माहिती यांचा अभ्यासपूर्ण आढावा या कोश प्रकल्पातून घेतला जाणार आहे. एका दृष्टीने मराठी खाद्य संस्कृतीचा वारसा जतन होण्याकामी हा प्रयत्न महत्वाचा ठरणार आहे. राज्यभरातील अनुसूचित जाती, जमाती यांच्या आहार पद्धतीचाही या खाद्य संस्कृती कोशात आवर्जून समावेश केला जावा, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. कारण त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक विविधता ठळकपणे एकत्रित आणण्याच्या कार्याला गतीच मिळणार आहे. अनेक खाद्य पदार्थ आज नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. त्यासाठी हे पदार्थ तयार करणाऱ्या जुन्या जाणत्या गृहिणींशी संवाद साधून त्याचेही संकलन या कोशात होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## राजकीय 'इव्हेंट'

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या 'नारी शक्ती वंदन विधेयक' या विषयावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कलगीतुरा रंगला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिलेल्या खुल्या चर्चेच्या आव्हानानंतर, खासदार सुप्रिया सुळे यांनी ते स्वीकारल्याचे म्हटले आहे. लोकसभेत हे घटना दुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक बहुमत न मिळाल्याने पडल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली. 'हे विधेयक पडणे हा महिलांचा विश्वासघात असून, कॉंग्रेस, शरद पवार गट आणि उबाठा गटाने दुटप्पी भूमिका घेतली,' असा थेट आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आकडेवारी, कायदेशीर बाबी आणि संसदीय प्रक्रियेचा दांडगा अभ्यास असलेले नेते मानले जातात. अशा परिस्थितीत, खासदार सुप्रिया सुळे यांनी केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी किंवा टोलेबाजीसाठी हे आव्हान स्वीकारले असेल, तर ते त्यांच्या अंगाशी येऊ शकते. जर त्यांनी विधेयकातील तांत्रिक तरतुदी आणि आधीच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केला नाही, केवळ प्रश्नांची सरबत्ती करून चालणार नाही, तर त्यांना ठोस पर्यायी मांडणीही करावी लागेल नाहीतर पुन्हा एकदा त्यांचे 'हसे' होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**अविनाश देशपांडे**

# राळेगाव प्रकरण “मानव तस्करी, लव्ह जिहाद”चे आरोपविरुद्ध पोलिसांचा पुराव्यांवर भर

## आरोपांचे राजकारण, पोलीस अधीक्षकांनी मांडले वस्तुस्थितीचे गणित


**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राळेगाव येथील कथित आदिवासी मुली विक्री प्रकरणाने आता नवे वळण घेतले असून, एका बाजूला भाजप व हिंदुत्ववादी संघटनांनी गंभीर आरोपांची मालिका सुरू ठेवली आहे.तर दुसऱ्या बाजूला पोलीस प्रशासनाने ठोस पुराव्यांशिवाय निष्कर्ष काढण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात “आरोप विरुद्ध वास्तव” असा संघर्ष तीव्र होताना दिसत आहे.




आज भाजप कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चव्हाण यांनी धक्कादायक दावे करत, 44 वर्षांच्या व्यक्तीसोबत अवघ्या 15 महिन्यांच्या मुलीचे लग्न लावण्याचा प्रयत्न उधळून लावल्याचा दावा केला. “या प्रकरणात आम्ही स्वतः हस्तक्षेप करून त्या मुलीला वाचवले असून, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे,” असे त्यांनी सांगितले. चव्हाण यांनी पुढे आरोप केला की, ऑडिओ क्लिपच्या आधारे राळेगाव परिसरात मजहर कुरेशीच्या माध्यमातून मानव तस्करी, जबरदस्ती विवाह व धर्मांतराचे रॅकेट कार्यरत आहे. “आधार कार्डमध्ये फेरफार करून मुलींची विक्री केली जाते, तसेच ‘पूनम आत्या’ नावाच्या व्यक्तीचा उल्लेख समोर येत आहे. या संपूर्ण साखळीत काही कुटुंबीयांचाही सहभाग असल्याचे दिसते,” असा गंभीर आरोप त्यांनी केला.याशिवाय, कुरेशी गोमांस विक्रीत सहभागी असल्याचा तसेच हिंदू देवतांचा अवमान केल्याचा आरोपही त्यांनी केला. “त्यांची पत्नी हिंदू असून तिच्या माध्यमातून मुली व त्यांच्या कुटुंबांशी संपर्क साधून हे जाळे चालवले जात आहे. असेही त्यांनी नमूद केले. राळेगाव प्रकरणात एकीकडे भाजपकडून गंभीर व संवेदनशील आरोपांची सरबत्ती होत असताना, दुसरीकडे पोलीस प्रशासन केवळ पुराव्यांवर आधारित भूमिका घेत आहे. त्यामुळे या प्रकरणात नेमके सत्य काय, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून आगामी सायबर तपास व चौकशी अहवाल निर्णायक ठरणार आहेत.

## पोलीस अधीक्षकांची भूमिका “पुराव्यांवरच कारवाई”



दुसरीकडे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी या सर्व आरोपांकडे संयमाने पाहण्याचे आवाहन केले आहे. “प्राप्त ऑडिओ-क्लिप्सची सायबर तपासणी सुरू आहे. मात्र ठोस पुराव्यांशिवाय कोणताही निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले.पोलीस नोंदींचा दाखला देत त्यांनी सांगितले की, बेपत्ता व अपहरणाच्या बहुतांश प्रकरणांमध्ये मुली परत सापडलेल्या आहेत आणि मोठ्या प्रमाणावर मानव तस्करी किंवा संघटित रॅकेट असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नाही. “तक्रारी गंभीर आहेत, त्यामुळे तपासही तितक्याच गांभीर्याने सुरू आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी मात्र या प्रकरणात अधिकृत नोंदींचा आधार घेत वास्तव मांडले. त्यांच्या माहितीनुसार: 2025 मध्ये राळेगाव पोलीस ठाण्यांतर्गत 38 महिला बेपत्ता झाल्याच्या नोंदी असून त्यापैकी 37 महिलांचा शोध लागला, केवळ 1 महिला अद्याप बेपत्ता आहे. त्याच वर्षात 14 अपहरण प्रकरणापैकी 12 मुली सापडल्या, तर 2 प्रकरणांचा तपास सुरू आहे. 2026 मध्ये (आतापर्यंत) 9 महिला बेपत्ता झाल्याच्या तक्रारी आल्या असून त्यापैकी 8 महिलांचा शोध लागला, तर 1 महिला अद्याप सापडलेली नाही. या आकडेवारीवरून मोठ्या प्रमाणात मुली बेपत्ता असल्याचा दावा अतिशयोक्त असल्याचे संकेत मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, पण कोणतीही बाब तपासाअंतीच स्पष्ट होईल,” असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# दोन इसमांना ताब्यात घेवुन २१ लाखाचा मुद्देमाल जप्त !

## घरफोडी केली उघड स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांची कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - यवतमाळ जिल्हातील वाढत्या घरफोडीचे प्रमाण पाहता पोलीस अधिक्षक यवतमाळ, यांनी गुन्हे उघडकिस आनण्याच्या सुचना स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना दिल्या होत्या त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखा पथक वणी पांढरकवडा गुन्हा उघड करणेसाठी पोलीस स्टेशन वणी हददीतील चोरीचे गुन्हयाबाबत प्रयन्त करीत असतांना दिंनाक २०/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ हे पोलीस स्टेशन मारेगाव येथे फिर्यादी नामे सुशिल जगेंवार रा. मारेगाव यानी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी प्रत्यक्ष पोलीस स्टेशल ला येवुन जबानी रिपोट 'दिला कि, त्याचे राहते घरी कोनीतरी अज्ञात ईसमानी सोन्या, चांदीचे दागिने चोरुन नेले आहे. अश्या फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मारेगाव येथे अपराध क्रमांक १४२/२०२६ कलम ३०३ (A) भा.न्या.स. प्रमाणे दाखल आहे.

वरुन सदर गुन्हयाचा समातंर तपास करीता असतांना उपविभाग वणी स्थागुशा. पथकास खात्रीलायक खबर मिळाली कि, दोन विधीसंगर्षग्रस्त बालकाने सदर चोरी केली असुन पुसद



येथिल आरोपीचे मार्फतीने चोरी केलेले सोन्या चांदीचे दागिने उमरखेड येथिल सराफा व्यावसाईकास विक्री केले आहे. अश्या माहिती वरुन क्षनाचा विलंब नकरता वणी/पांढरकवडा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ सदर दोन्ही विधीसंगर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन त्याना विचारपुस केली असता सदर विधीसंगर्षग्रस्त बालकाने चोरी केल्याची कबुली देवुन आरोपी नामे नथ्थु कुरकुटे व दत्ता कुरकुटे रा. नागवाडी ता. पुसद जि. यवतमाळ यांचे मार्फतीने सोने व चांदीचे दागिण्याची विक्री केली आहे. अश्या माहिती वरुन पुसद येथे रवाना होवुन पुसद विभागातीन स्था.गु.शा. अधिकारी व कर्मचारी यांचे मदतिने गुन्हयात चोरी गेलेला १०० टक्के मुददेमाल वेगवेगळ्या प्रकारचे सोने चांदीचे दागिने एकुण किमंत २१,३७,७७१/-रुपयाचा मुददेमाल जप्त करुन आरोपी दत्ता सटवाजी कुरकुटे रा. नागवाडी ता. पुसद यास ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन मारेगाव यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई ही मा, पोलीस अधिक्षक श्री कुमार चिता, अप्पर पोलीस अधिक्षक श्री अशोक थोरात, यवतमाळ पुसद उपविभागिय पोलीस अधिकारी श्री हर्षवर्धन बिजे, पोनी सतिश चवरे स्था.गु.शा. यवतमाळ, यांचे मार्गदर्शनात सपोनि दत्ता पेंडकर, सपोनि धिरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक धनराज हाके, शरद लोहकर, सफौ/मुन्ना आडे, पोहवा/ सतोंष भोरगे, पोहवा/सुनिल खंडागळे, सुधिर पांडे, निलेश निमकर, सुधिर पिदुरकर, तेजाब रनखांब, सुभाष जाधव, कुनाल मुडेकार, रमेश राठोड, पोका / सलमान शेख, रजनिकांत मडावी, सुनिल पंडागळे, राजेश जाधव, चापोउपनि. रविंद्र श्रिरामे, चापोना सतिश फुके सर्व स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# • वेचक

## महापुरुष तेव्हाच जिवंत असतात जेव्हा त्यांचे विचार चालविणारे लोक जिवंत असतील : डॉ. ओमप्रकाश फुलमाळी



राळेगाव - बुद्ध विचार हे मानवाला जगण्याचा आणि माणुसकी वाढविण्याचा संदेश देते सध्याच्या काळात व कायमस्वरूपी जगाला तारण्याचे सामर्थ्य बुद्ध विचारातच आहे म्हणून महापुरुष तेव्हाच जिवंत असतात तेव्हा त्यांचे विचार चालवणारे लोक जिवंत असतात आज तुम्ही जे इथे बसलेले आहे ते बाबासाहेबांचे विचार चालविण्यासाठी बाबासाहेबांना वाचविण्यासाठी बसले आहात असे मनोगत डॉ. ओमप्रकाश फुलमाळी यांनी लोणी येथे धम्म परिषदेच्या समारोह प्रसंगी बोलताना आपले व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचा अध्यक्षीय भाषणातून माजी शिक्षण मंत्री वसंत पुरके यांनी आपले मनोगत व्यक्त केले असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दहा बाय दहाच्या खालीत सोळा सोळा तास अभ्यास करून बाबासाहेब जगाचा हिरो बनला या देशातील प्रत्येक माणसाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार दिला असे सखोल मार्गदर्शन त्यांनी या प्रसंगी आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित अंकुश मुनेश्वर, मुकुंद दारुंडे, रमेश लढे, रणजीत कोरडे, शेखर दारुंडे, राष्ट्रपाल भोंगाडे, प्रशांत भोगटे, बाबुलाल राठोड, रंजन भगत, किशोर धोंगडे, धनराज लाकडे,बंडू उईके,संदीप वारेकर,सुरेश भगत, रवीभाऊ सीडाम, इंदल राठोड, राजू उमरे, वावरे, मुकुंद दारुंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## शेतकरी, कामगार व भूमिहीनांचा मोठा सहभाग १९ ते २२ एप्रिलदरम्यान चार दिवसांचा आंदोलन मार्च

पाटणबोरी - यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गंभीर असताना, शेतकरी, कामगार, योजना कर्मचारी तसेच भूमिहीन आदिवासी व गैर-आदिवासी नागरिकांच्या विविध मागण्यांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय किसान सभा, CITU आशा कर्मचारी युनियन, महिला परिचर संघटना आणि आदिवासी अधिकार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळखुटी ते यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय असा सुमारे १०० किलोमीटरचा पायी लाँग मार्च आयोजित करण्यात आला आहे. हा मार्च १९ एप्रिल ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान काढण्यात येत असून, भर उन्हाळ्यात होणाऱ्या या आंदोलनात हजारो शेतकरी, कामगार व कर्मचारी सहभागी होणार आहेत. या लाँग मार्चमध्ये शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, पीक दर दुप्पट करणे, अतिवृष्टीग्रस्तांना मदत, वन्य प्राण्यांपासून संरक्षण, सौर ऊर्जा योजना, वनजमिनीवरील हक्क, तसेच आशा कर्मचाऱ्यांचे मानधन, प्रलंबित मोबदला, प्रोत्साहन निधी, ग्रॅज्युएटी व विमा कवच आदी मागण्या प्रमुख आहेत.

# 'माझी निवड होणारच' या आत्मविश्वासाने परीक्षेची तयारी करा

## आयपीएस रॉबिन बन्सल यांचे स्पर्धा परीक्षार्थींना प्रेरणादायी मार्गदर्शन






**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात युपीएससी परीक्षेची यश मिळविण्यासाठी 'माझी निवड होणारच' या आत्मविश्वासाने परीक्षेची तयारी करा, असा प्रेरणादायी मुलमंत्र भारतीय पोलीस सेवेतील आयपीएस रॉबिन बन्सल यांनी स्पर्धा परीक्षार्थींना ‘युवा संवाद’ कार्यक्रमात दिला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने तरुणांना स्पर्धा परीक्षा, करिअर मार्गदर्शनासाठी २१ एप्रिलपासून ‘युवा संवाद’ उपक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे करण्यात आले असून या त्याचा शुभारंभ आज करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, प्रमुख मार्गदर्शक व पांढरकवडाचे उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस रॉबिन बन्सल, उपजिल्हाधिकारी पुनम अहिरे, मुख्यमंत्री फेलो कुणाल पाटील, विठ्ठल गाडगे, प्रसाद कुलकर्णी आणि स्पर्धा परीक्षार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शक आयपीएस रॉबिन बन्सल यांनी त्यांचा अनुभव विषद करतांना सांगितले की, ते पूर्वी सॅमसंग या खासगी कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर पदी नोकरी करायचे, ते काम करत त्यांनी युपीएससी परीक्षेचा अभ्यास केला. परंतू, नोकरी करत परीक्षेच्या तयारीला अपूरा वेळ मिळत असल्याने त्यांनी कंपनीची नोकरी सोडून सिव्हील सर्विसेसची तयारी केली आणि यश संपादन केल्याचे सांगितले. यास मार्गदर्शनात त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात युपीएससीच्या सिव्हील सर्विसेस परीक्षेबद्दल मार्गदर्शन केले. यात त्यांनी युपीएससी परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम, विषयांची निवड, पुस्तकांची निवड, प्रश्न पद्धती, मुलाखतीची पूर्वतयारी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी व व्यवहार आणि सुरक्षा यांचा अभ्यास, इतिहासाचा अभ्यास, स्टडी मटेरिअल, ऑनलाईन अभ्यास सुविधांचा वापर आणि कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) चा वापर कसा करायचा तसेच निवड झाल्यानंतरच्या तयारीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, युपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करायची असेल तर तुमचे ध्येय स्पष्ट असले पाहिजे. युपीएससी परीक्षांसाठी किमान दोन वर्ष लागतात. परीक्षेची तयारी करतांना 'माझी निवड होणारच' ही भावना मनात असली पाहिजे. याशिवाय परीक्षेत निवड न झाल्यास प्लॅन बी तयार असला पाहिजेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी अनेक कल्याणकारी धोरण राबविले : स्नेहा टोम्पे !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधन पर्व २०२६ यांच्या वतीने दिनांक १६एप्रिल ते १९ एप्रिल पर्यंत गायन व प्रबोधन विद्यार्थ्यासाठी स्पर्धा मार्गदर्शनाचे व महिलांसाठी प्रबोधनाचे कार्यक्रम घेण्यात आले. या मध्ये शेवटचे पुष्प १९ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयी कल्याणकारी धोरण या विषयावर प्रबोधन करण्यासाठी प्रमुख वक्त्या स्नेहा टोम्पे,अमरावती यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात संभाजीनगर येथील लुंबिनी महिला मंडळ यांच्या वतीने त्रिनयना व बुद्धवंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा ॲड.मोहिनीताई नाईक यांच्या सह उपस्थित महिलांनी बुद्ध,शिव,फुले, शाहू,आंबेडकर, अशोक सम्राट या महामानवाच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा ॲड मोहिनीताई



नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधनपर्व समितीच्या उद्घाटना मी दिवशी हजर राहू शकलो नाही परंतु पुढील वर्षी मी तुमच्यासोबत राहणार असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून जाहीर केले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर प्रमुख वक्त्या स्नेहा टोम्पे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयी कल्याणकारी धोरण या विषयावर आपल्या व्याख्यानाला सुरूवात करून उपस्थित महिलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच हिंदू कोड बिल, कोळसा कामगारांना खानीतील महिलांना मजुरांना त्यांच्या भविष्याबद्दल सुरक्षा कवच, प्रशासनात नोकरीदार असलेल्या महिलांना प्रसूती पगारी रजा, आई-वडिलांच्या प्रॉपर्टीमध्ये हिस्सा, तसेच पूर्वी एक पुरुष अनेक बायका करत असे परंतु संविधानातील कायद्याच्या नियमानुसार एक पुरुष एक महिला त्या पुरुषाला दुसरे लग्न करण्यासाठी अगोदर फारकत नामा व तिची पोटगी द्यावी लागेल नंतरच तो दुसरे लग्न करू शकेल अशी महिला विषयी अनेक धोरण राबवून संविधानात हक्क अधिकार प्रदान करून दिले

# बनावट मद्याचा मोठा साठा जप्त..!

## पांढरकवड्यात उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पांढरकवडा पथकाने २१ एप्रिल २०२६ रोजी धाड टाकून बनावट देशी व विदेशी मद्याचा मोठा साठा जप्त करत अवैध दारू व्यवसायावर मोठा घाव घातला. मौजा सायखेडा शिवारातील अनिल काशिनाथ मुजारीया यांच्या शेतात उभी असलेल्या महिंद्रा सुप्रो मॅक्सी मिनी ट्रक (क्र. MH 04 JK 8842) मधून हा साठा आढळून आला. कारवाई दरम्यान ९० मिली क्षमतेच्या देशी दारूच्या हजारो बाटल्या, टिनशेडमध्ये लपवून ठेवलेला अतिरिक्त साठा तसेच १८० मिलीच्या विदेशी मद्याच्या बाटल्या असा एकूण १०,१२,५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



विशेष म्हणजे, हा मद्यसाठा गोवा राज्यात तयार करण्यात आलेला बनावट असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून यामुळे शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी कमलेश अनिल मुजारीया (रा. सायखेडा, ता. पांढरकवडा) याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत विविध कलमांसह भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम १२३ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी (PCR) मंजूर करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणामागे आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याचा संशय असून मद्यसाठा पुरवठा व वितरण करणारे मुख्य आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध सुरू असून तपास अधिक गतीने करण्यात येत आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह-आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उप-आयुक्त पराग नवलकर, अधीक्षक नितेश शेंडे यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली निरीक्षक पुरुषोत्तम बोढारे यांच्या पथकाने केली. तपास दुय्यम निरीक्षक निलेशकुमार वानखडे करीत असून पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या धाडीत सक्रिय सहभाग घेतला. अवैध मद्यनिर्मिती, विक्री किंवा वाहतूक याबाबत कोणतीही माहिती असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १८०० ८३३ ३३३३ किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गर्भवती मातांसाठी ‘प्रधानमंत्री मातृ वंदना योजना’

## ५-६ हजार रुपये आर्थिक सहाय्य ; थेट खात्यात रक्कम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून गर्भवती महिलांना थेट त्यांच्या बँक खात्यात आर्थिक सहाय्य दिले जात आहे. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डिबीटी) प्रणालीद्वारे अनुदान वितरित केले जात आहे. केंद्र सरकारच्या १४ जुलै २०२२ च्या निर्णयानुसार योजनेत बदल करण्यात आला असून, पूर्वी केवळ पहिल्या गर्भधारणेसाठी मर्यादित असलेला लाभ आता विस्तारण्यात आला आहे. १ एप्रिल २०२२ नंतर दुसऱ्या अपत्यात मुलगी जन्माला आल्यास त्या लाभार्थी महिलांनाही योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.




या योजनेअंतर्गत पात्र महिलेला पहिल्या अपत्यासाठी एकूण रु. ५००० दोन हप्त्यांत तर दुसऱ्या अपत्यात मुलगी जन्मल्यास रु. ६००० एकरकमी आर्थिक सहाय्य दिले जाते. ही रक्कम आधार-संलग्न बँक किंवा पोस्ट खात्यात थेट जमा केली जाते. पात्र लाभार्थी पहिल्या अपत्यासाठी गर्भवती महिला दुसऱ्या वेळेस मुलीला जन्म देणाऱ्या महिला उद्देश या योजनेचा मुख्य उद्देश गरोदर मातांना सकस आहारासाठी आर्थिक मदत देणे तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हा आहे. लाभ घेण्यासाठी महिलांनी जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा. आशा कार्यकर्त्या, आरोग्य सेविका किंवा अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हैदराबादमधील तरुणांचा ‘आंबेडकरी रंगमंच’ !

## अनाथांच्या हातून विचारांचा जागर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित साहित्य व नाट्यपरंपरेने समाजजागृतीची मोठी परंपरा घडवली आहे. त्याच धर्तीवर आता तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे (जगराजू) या आंबेडकरी चळवळीतील अनाथ व प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या मुला-मुलींना एकत्र आणत संगीतमय नाटकांच्या माध्यमातून परिवर्तनाची नवी चळवळ उभी केली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमित्य आंबेडकर चौक यवतमाळ येथे सार्वजनिक जयंती निमित्त समितीच्या वतीने संगीतमय पद्धतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी जनमाध्यम प्रतिनिधी यांनी जगराजू याच्याशी केलेली चर्चा त्यांनी सांगितले की तथागत गौतम बुद्ध, सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटके सादर करून हा समूह समाजप्रबोधनाचे कार्य करत आहे. आतापर्यंत महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकसह विविध राज्यांमध्ये सुमारे ८५२ प्रयोग सादर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या सर्व नाटकांमध्ये सहभागी असलेले कलाकार हे अनाथ किंवा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून आलेले आहेत. या उपक्रमामागील सूत्रधार जगराजू स्वतः क्षत्रिय समाजातील असून, घरातील प्रतिकूल परिस्थिती आणि बहिणीला शिक्षण न मिळाल्याची खंत यामुळे ते सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वळले. उच्च शिक्षण घेत असताना त्यांचा कम्युनिस्ट विचारसरणीशी संपर्क आला आणि त्यातून त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या साहित्याचा सखोल अभ्यास केला. या अभ्यासातून महिलांचे अधिकार, शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय याविषयी बाबासाहेबांनी केलेले कार्य त्यांना प्रकर्षाने जाणवले. नाटकांच्या माध्यमातून हेच विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा त्यांनी ध्यास घेतला. १४ एप्रिल २०१६ पासून सुरू झालेल्या या संगीतमय नाट्यप्रवासात आजपर्यंत ८२० पेक्षा अधिक सादरीकरणे झाल्याचा दावा करण्यात आला आहे. ‘बुद्ध’ या नाटकाचे पाच प्रकार सादर झाले असून त्याचे ४९ प्रयोग झाले आहेत, तर महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित नाटकांचे हिंदी व तेलुगू भाषेत ५६ ठिकाणी सादरीकरण झाले आहे. या नाटकांमधून विशेषतः महिलांच्या हक्कांवर प्रकाश टाकण्यात येतो. सती प्रथा, विधवांवरील अन्याय, शिक्षणावरील बंदी यांसारख्या जुन्या रूढींविरुद्ध बाबासाहेबांनी उभा केलेला लढा प्रभावीपणे मांडला जातो. “संविधानाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, नोकरी, पुनर्विवाह आणि स्वातंत्र्याचे अधिकार मिळाले हेच आम्ही रंगमंचावरून सांगतो,” असे जगराजू यांनी सांगितले. युवकांमध्ये वाढत चाललेली मोबाईल आणि इंटरनेटची व्यसनाधीनता लक्षात घेऊन त्यांना सकारात्मक दिशेकडे वळवण्याचाही या उपक्रमाचा उद्देश आहे. डान्स, संगीत आणि अभिनयाच्या माध्यमातून तरुणांना आकर्षित करत सामाजिक संदेश दिला जातो. या समूहात सध्या २० कलाकार कार्यरत असून, त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील संघर्षामुळे ते नाटकातील भूमिका अधिक जिवंतपणे साकारतात. या उपक्रमातून पाच कलाकारांचे



विवाहही लावून देण्यात आले आहेत. आंबेडकरी विचारांच्या नाटकांना तेलुगू, कन्नड, तमिळ आणि हिंदी भाषांमध्ये मोठी मागणी असल्याचे दिसून येते. “हे नाटक थेट लोकांच्या भावनांपर्यंत पोहोचते. प्रेक्षक भावनिकरित्या जोडले जातात आणि आम्हाला मोठा प्रतिसाद मिळतो,” असे जगराजू यांनी सांगितले. अनाथ तरुणांच्या हातून उभा राहिलेला हा ‘आंबेडकरी रंगमंच’ केवळ नाट्यप्रयोग नसून सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी संदेश देणारी चळवळ ठरत आहे.

# पांढरकवड्यात कश्मीरी चेरीचे उन्हाळी उत्पादन

## स्थानिक पातळीवर प्रयोगाला यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - परिसरात पहिल्यांदाच कश्मीरी चेरीचे उन्हाळी उत्पादन घेतल्याचा दावा समोर आला असून, या प्रयोगामुळे स्थानिक शेतकरी आणि नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

परंपरेने थंड हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या कश्मीर भागातील चेरीचे उत्पादन विदर्भासारख्या उष्ण प्रदेशात घेणे आव्हानात्मक मानले जाते. मात्र, पांढरकवड्यात काही शेतकऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून किंवा विशेष जातींच्या माध्यमातून हा प्रयोग यशस्वी केल्याचे सांगितले जात आहे. उत्पादन झालेल्या चेरी फळांचे आकर्षक रंग व आकार लक्षवेधी असून, स्थानिक स्तरावर त्यांची चांगली चर्चा सुरू आहे. या प्रयोगामुळे भविष्यात फळबागांच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात,



असा आशावाद व्यक्त केला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या उत्पादनासाठी योग्य वाण, सिंचन व्यवस्था आणि हवामान नियंत्रण तंत्र महत्त्वाचे ठरते. त्यामुळे या प्रयोगाची शास्त्रीय पडताळणी आणि मार्गदर्शन मिळाल्यासच मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य होईल. दरम्यान, या यशस्वी प्रयोगामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या पिकांविषयी उत्साह वाढला असून, पुढील काळात अशा अभिनव प्रयोगांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महावितरण अचलपूर विभागाची आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये चौफेर कामगिरी

## व्याघ्र प्रकल्पातील चिखलदरा व धारणीतही विद्युत पुरवठा सुरळीत

**अमरावती/का.प्र.**

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये महावितरण अचलपूर विभागाने सर्वच आघाडय़ांवर चौफेर कामगिरी केली आहे.प्रामुख्याने म्हणजे चिखलदरा,धारणी हा संपूर्ण तालुका मेळघाट व्याघ्र प्रकल्पात येतो. येथील विस्तीर्ण जंगल,घाटांचा परिसर तसेच वन्य प्राणी यांचा वावर असल्याने याभागात विद्युत पुरवठा सुरळीत ठेवणे हे अतिशय जिकिरीचे काम आहे. परंतू महावितरण अचलपूर विभागाने ही सर्व आव्हाने पेलत दिमाखदार कामगिरी केली आहे.

महावितरण अचलपूर विभाग भौगोलिक दृष्टीने अचलपूर, अंजनगावसुर्जी, दर्यापूर, चांदूर बाजार, चिखलदरा व धारणी या सहा तालुक्यातील ७ उपविभाग व ४० वितरण केंद्र अशा कार्यालयांचा विस्तीर्ण भूभाग दरम्यान विस्तारला आहे.अचलपूर विभागीय कार्यालय अंतर्गत २,२८,६०० ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी ३३ के. व्ही.उपकेंद्राची एकूण संख्या



४२ असून त्याठिकाणी ८१ पॉवर ट्रान्सफॉर्मर असून त्याची स्थापित क्षमता ४२८ एमव्हीए आहे. त्यामधे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये स्थापित केलेल्या ९ पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या ४५ एमव्हीए क्षमतेचा समावेश आहे. या ३३ केव्ही उपकेंद्र मधून निघणाऱ्या ११ केव्ही वीज वाहिन्यांची संख्या १९९ असून त्याची लांबी ५१००किमी आहे.३३ केव्ही उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या ८७० किमी लांबीच्या ३३ केव्ही वीज वाहिन्या व डिस्ट्रिब्युशन ट्रान्सफॉर्मरला वीज पुरवठा करणाऱ्या ५१०० किमी लांबीच्या ११ केव्ही वीज वाहिन्या या दोष रहित ठेवून ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा सुरू ठेवण्याचे काम आव्हानात्मक असते. यामध्ये महावितरण परिवार या कठीण परिस्थितीत सुद्धा अखंडित वीजपुरवठा कायम ठेवण्यासाठी कटिबद्ध असते.

महावितरण अचलपूर विभागाने यावर्षी आश्वासित केल्याप्रमाणे दिवाळीच्या तोंडावर ३३ केव्ही जरीदा उपकेंद्र सुरू करून आदिवासी बांधवांची दिवाळी गोड केली. या ३३ केव्ही जरीदा उपकेंद्रा मुळे सभोवतालच्या परिसरात सुरळीत वीज पुरवठा उपलब्ध झाल्याने रब्बी हंगामात शेतकऱ्यांना गव्हाचे विक्रमी पीक घेता आले. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी २.० योजने अंतर्गत



अचलपुर विभाग अंतर्गत ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त ४ पॉवर ट्रान्सफॉर्मर व ५ ते १० एमव्हीए क्षमता वाढ अंतर्गत १० एमव्हीए क्षमतेचे एकूण ४ पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आले. तसेच ६५ मेगावॉट क्षमतेचे एकूण ११ सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले त्यापैकी मेळघाट परिसरात २५ मेगावॉट क्षमतेचे ३ सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित केले. तसेच याच योजनेंतर्गत ३३ केव्ही ४.८ किमी व ११ केव्ही ७ किमी अशी विद्युत वाहिनी उभारणी करण्यात आली. यामुळे अचलपुर विभागीय कार्यालय अंतर्गत संपूर्ण परिसरात शेतकऱ्यांना बहुतांश काळात दिवसा विद्युत पुरवठा उपलब्ध झाला. यावर्षी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून आसेगाव ते सावळापूर या १० किमी च्या ३३ केव्ही वाहिनीचे काम प्रस्तावित करून १३२ केव्ही उपकेंद्र चांदूर बाजार-हिरूळपूर्णा-आसेगाव-सावळापूर- खल्लार- १३२ केव्ही उपकेंद्र दर्यापूर असा ३३ केव्ही वाहिनीचा गोल मार्ग तयार केल्याने या मार्गावरील सर्वच ३३ केव्ही उपकेंद्र यांना पर्यायी विद्युत व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

अचलपूर विभाग अंतर्गत एकूण ७ उपविभाग मधील आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता बिगर कृषी वीज विक्री मागणी२४९.२७ कोटी रुपये होती व त्यापैकी २४४.५३ कोटी रुपये इतकी ९८.१०% विक्रमी वसुली करण्यात आली. त्यापैकी घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वर्गवारी मधील वीज ग्राहकांची वीज मागणी रक्कम २३१.५८ कोटी रुपये होती व त्यापैकी २३२.५४ कोटी रुपये इतकी विक्रमी वसुली करून आर्थिक वर्षातील एकत्रित वसुली प्रमाण १००.४१% इतके प्राप्त केले. तसेच एकूण वीज वापरा करिता उपकेंद्र मधून घेतलेल्या विजेचे प्रमाण ८.८७ % इतके कमी करून बिगर कृषी वीज वापर आकारणी मध्ये ५.१ % इतकी भरीव वाढ नोंदविली व त्यामुळे वीज हानीचे प्रमाण कमी झाले.वीज चोरी मोहीम प्रभावीपणे राबवून एकूण१२९५ वीज चोरी प्रकरणे शोधून काढली व त्यामध्ये १७.७० लाख युनिट पोटी ३.६७ कोटी रुपयांची दंड रक्कम आकारणी करून ३.२० कोटी रुपयांची वसुली केली.यामुळे वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांमध्ये धडक भरली आहे.

राष्ट्रीय ऊर्जा धोरणास अनुसरून स्मार्ट ग्रीड कार्यक्रम अंतर्गत वीज वापराचे अचूक मोजमाप करण्यासाठी 'स्मार्ट मिटरिंग' कार्यक्रम राबविण्यात आला व त्याअंतर्गत एकूण १,८०६०० बिगर कृषी ग्राहकांपैकी ५५००० इतक्या ग्राहकांकडे स्मार्ट मिटर लावण्यात आले. यामुळे वीज देयक तक्रारींचे प्रमाण अतीशय कमी झाले आहे.अचलपूर विभागाने ही सर्व कार्यालयीन कामे पार पाडत असतांना अधिकारी, कर्मचारी यांचा कामाचा ताण हलका होईल, सुरक्षा उपायांची जाणीव जागृती होईल तसेच या कार्यक्रम मधून सामाजिक बांधिलकी जोपासत असे कार्यक्रम या वर्षभरात पार पाडले. यामध्ये शालेय स्तरावर चित्रकला स्पर्धा,गावा गावातून स्मार्ट मिटर बाबत जागृती रॅलीज काढणे इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. महावितरणच्या जागृती कार्यक्रमाची जागतिक नोंद गिनीज बुक यामध्ये सुद्धा केल्या गेली व महावितरणला त्याकरिता गौरविण्यात आले. अधिकारी कर्मचारी यांचेकरिता रक्तदान शिबीर आयोजित करून थेट धारणी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आदिवासी बांधवांना रक्त उपलब्ध करून देवून आदिवासी बांधवांसोबत थेट रक्ताचे नाते निर्माण केले. धोतरखेडा गावातील आदिवासी वस्ती मध्ये बैलपोळ्याच्या दिवशी विद्युत पुरवठा करून त्यांच्यामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले.शिवाय पर्यावरण संवर्धन करीता महावितरण कार्यालय परिसरात आंबा, फणस, कडूनिंब, अमलतास सोनचाफा, पिंपळ अशा अक्षयी वृक्षांची लागवड करण्यात आली.

अचलपूर महावितरणच्या या चौफेर कामगिरीकरीता अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक साळुंखे,तसेच अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांचे मार्गदर्शन लाभले. ही भरीव कामगिरी कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, कार्यकारी यांचे नेतृत्वाखाली सर्व उपविभागीय अभियंते सर्वश्री प्रशांत फुटाणे, नीलेश बोरीकर, उमेश राठोड, विक्रम काटोले, तुषार गांजरे, संजय दातीर, देवेंद्र चौधरी, नीलिमा गावंडे तसेच लेखा अधिकारी राजेश तिवारी,विशाल पसारकर यांनी अथक परिश्रम घेऊन पार पाडली.

## शालेय साहित्याचे वाटप

**अमरावती**-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, युनियन बँक कर्मचारी कल्याण संघटना, पुणे विभाग (महाराष्ट्र व गोवा राज्य) यांनी वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण प्रोत्साहनासाठी एक अत्यंत स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर यांचे प्रयत्नाने जिल्हा परिषद माध्यमिक शाळा,उत्तमसरा येथे कार्यक्रम पार पडला. या संघटनेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग, पाण्याच्या बाटल्या, वह्या, पेन पाउच, स्टेशनरी किट्स व कंपास बॉक्सचे वितरण करून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करण्यात आले आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे काम करण्यात आले.कार्यक्रमाला अरविंद शर्मा,आकाश श्रीवास्तव,इंचार्ज अजय कायगोडे व विवेक अलोणे उपस्थित होते. हा कार्यक्रम संदीप गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असून प्रादेशिक सचिव अरविंद राळे यांनी सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी ठरला.संचालन शाळेचे शिक्षक संजय मगर्दे यांनी केले. आभार प्रदर्शन संतोष कुऱ्हेकर यांनी केले. चंद्रशेखर ब्राह्मणकर,उमेश बसरे,शितल भोपाळे,ज्योत्स्ना हायगले,प्रतिभा नांदणे,भूषण बुरंगे,रेणुका केचे कार्यक्रमास उपस्थित होते.

## उष्माघातासाठी इर्विन रुग्णालय सज्ज

**अमरावती/का.प्र.**

संभाव्य उष्माघाताच्या घटनांना तोंड देण्यासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. सध्या एकही उष्माघाताचा रुग्ण दाखल नसला, तरीही खबरदारी म्हणून रुग्णालयात विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. रुग्णांच्या सोयीसाठी वार्डामध्ये जम्बो कुलरची व्यवस्था करण्यात आली आहे. पुरुषांच्या वार्ड क्रमांक १ मध्ये दोन बेडची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून महिलांसाठी वार्ड क्रमांक ६ मध्ये स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.याशिवाय आयसीयूसह सर्व वार्डामध्ये कुलर लावून रुग्णांना उष्णतेपासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. रुग्णालयातील परिचारिका रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना उष्माघाताबाबत मार्गदर्शन करत आहेत. आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून उष्णतेपासून बचाव करण्यासाठी जनजागृतीही केली जात आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही पूर्वतयारी केली असून, परिस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

**उपाययोजना व काळजी कशी घ्यावी**

उष्माघात हा अत्यंत धोकादायक प्रकार असून, शरीराचे तापमान अचानक वाढल्यामुळे मेंदू व इतर अवयवांवर परिणाम होतो. प्रामुख्याने तीव्र उन्हात दीर्घकाळ राहिल्यास, पाण्याची कमतरता झाल्यास किंवा शरीरातील उष्णता नियंत्रण बिघडल्यास उष्माघात होऊ शकतो. यामध्ये चक्कर येणे, डोकेदुखी, उलट्या, त्वचा कोरडी पडणे, ताप वाढणे अशी लक्षणे दिसतात. यासाठी सर्वात महत्त्वाची काळजी म्हणजे दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे. बाहेर पडताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्री वापरणे आवश्यक आहे. भरपूर पाणी, ताक, लिंबूपाणी यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन करावे. हलके व सैल कपडे परिधान करणेही फायदेशीर ठरते.

उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास रुग्णाला त्वरित सावलीत आणून थंड पाण्याने शरीर पुसावे व तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत. विशेषतः लहान मुले, वृद्ध व कामगारांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन केल्यास उष्माघाताचा धोका मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो.

## संक्षिप्त

### बुवाबाजी विरोधी प्रबोधन शनिवारी

**अमरावती**-अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेकवादी प्रागतिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार,२५ एप्रिल रोजी बुवाबाजी विरोधी प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा सायंकाळी ५.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे होणार आहे.प्रमुख वक्ते तथा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय संघटक प्रा. श्याम मानव हे मार्गदर्शन करणार आहे. प्रबोधन सभेत मंत्रतंत्र, जादूटोणा, करणी, काळी जादू, वशीकरण यांसारख्या विषयांबाबत वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच ज्योतिषाच्या दाव्यांमागील वास्तव काय आहे, महिला बुवा-बाबांकडे का आकृष्ट होतात, अशा विविध प्रश्नांची उकल करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात विविध सामाजिक संघटनांचा सहभाग असणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### खरीप हंगाम पूर्व नियोजन सभा


**टाकरखेडा संभू**-खरीप हंगाम २०२६ च्या अनुषंगाने



तालुकास्तरीय निविष्ठा विक्रेते यांची नियोजन व आढावा सभा तसेच साथी पोर्टल प्रशिक्षण कार्यक्रम केमिस्ट भवन, अमरावती येथे आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनीष मोहोड उपस्थित होते. तसेच साथी पोर्टल प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक म्हणून सहाय्यक कृषी अधिकारी योगेश हुशंगाबादकर उपस्थित होते.बैठकीदरम्यान खरीप हंगाम २०२६ चे नियोजन, अनधिकृत HTBT बियाणे, लिंकिंग यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी विराग देशमुख यांनी उपस्थित निविष्ठा विक्री केंद्र संचालकांना मार्गदर्शन केले. यावेळी साथी पोर्टल संदर्भातील शंका उपस्थितांनी मांडल्या असून त्यांचे समाधान प्रश्नोत्तराच्या माध्यमातून करण्यात आले. संचालन तालुका गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रमोद खर्चान यांनी केले. संजय पिंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### संस्कृती ज्ञान स्पर्धेत तृप्ती तिडके द्वितीय

**अचलपूर**-स्थानिक श्रीमती जानकीबाई देशमुख कन्या



विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या संस्कृती ज्ञान स्पर्धेत विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत एकूण ३६ विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून आपली बौद्धिक क्षमता सिद्ध केली.इयत्ता पाचवी ते सातवी गटासाठी पल्लवी गणोरकर यांनी तर इयत्ता आठवी ते दहावी गटासाठी कमल बावणे यांनी मार्गदर्शन करत संपूर्ण कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये स्पर्धेबद्दल आत्मविश्वास आणि जिज्ञासा वाढल्याचे दिसून आले. यशाबद्दल शाळेच्या अध्यक्षा माधुरी देशमुख यांनी विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करत भविष्यातही अशाच प्रगतीची अपेक्षा व्यक्त केली. तसेच मुख्याध्यापिका मनीषा नाकील यांनीही विद्यार्थिनींच्या परिश्रमाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचा सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून स्पर्धेला यशस्वी बनवले.

## कॉटन मार्केट परिसरात होणार शेतकरी भवन

**अमरावती/का.प्र.**

शहरातील जुन्या कापूस बाजार परिसरातील जुन्या बाजारपेठेच्या जागेचा कायापालट करण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले जात आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने (APMC) एक आधुनिक व्यावसायिक संकुल आणि अत्याधुनिक शेतकरी इमारत बांधण्याची योजना आखली आहे. यामुळे केवळ व्यावसायिक घडामोडींना चालना मिळणार नाही, तर शेतकऱ्यांनाही चांगल्या सुविधा मिळतील.

उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष हरीश मोरे यांनी सांगितले की, जुन्या कापूस बाजार परिसरात बांधण्यात येणारे व्यावसायिक संकुल आणि शेतकरी भवन संपूर्ण परिसराचे रूप पालटून टाकेल. यामध्ये आधुनिक दुकाने, कार्यालये आणि शेतकऱ्यांसाठी एक सुसज्ज इमारत असेल. अमरावती कृषी बाजार आता आपली आर्थिक स्थिती सातत्याने मजबूत करत आहे. २०२५-२६ मध्ये समितीने २१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले. २०२४-२५ या वर्षात हे उत्पन्न २० कोटी रुपये होते. तर, त्यापूर्वी गेल्या वर्षी हा आकडा केवळ १८ कोटी रुपये होता. हे उत्पन्न वर्षानुवर्षे वाढत आहे, जे बाजार समितीचे प्रभावी व्यवस्थापन आणि वाढत्या व्यावसायिक घडामोडींचे द्योतक आहे. आर्थिक शिस्त दाखवत, समितीने यावर्षी मुदत ठेवींमध्ये १०० कोटी रुपयांचा विक्रमी टप्पाही गाठला आहे. यामुळे भविष्यातील विकास प्रयत्नांसाठी एक भक्कम आर्थिक पाया घातला गेला आहे. बाजार समितीने शेतकऱ्यांसाठीच्या विकासकामांवर भर दिला आणि व्यापाऱ्यांची सोय लक्षात घेऊन अनेक महत्त्वाची कामे करण्यात आली आहेत. धान्य बाजारात ५ कोटी रुपये खर्च करून दोन नवीन शेड बांधण्यात आले. बाजार परिसरात एक जनरेटर आणि इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसवण्यात आले, तसेच बडनेरा येथील जनावरांच्या बाजारात जनावरे उतरवण्यासाठी एक रॅम्प बांधण्यात आला. या सुविधांमुळे बाजाराची कार्यक्षमता वाढली असून शेतकऱ्यांना थेट फायदा झाला आहे.

## अमरावतीमधील चौकाचौकात लागणार ग्रीन नेट

### नगरसेवक प्रमोद महल्ले यांचा प्रस्ताव मंजूर आठ दिवसांत अंमलबजावणीचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

शहरातील वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे ट्रॅफिक सिग्नलवर थांबणाऱ्या वाहनधारकांना दिलासा देण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या आमसभेत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ट्राफिक सिग्नल असलेल्या प्रत्येक चौकात ग्रीन नेट लावण्याचा प्रस्ताव नगरसेवक प्रमोद महल्ले यांनी मांडला होता. हा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला असून येत्या आठ दिवसांत त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सभापती श्रीचंद तेजवानी यांनी प्रशासनाला दिले आहेत.

अमरावती शहरातील प्रमुख चौकांमध्ये ट्राफिक सिग्नलवर वाहनधारकांना काही काळ उन्हात थांबावे लागते. सध्या वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पीडीएमसी, संत गाडगेबाबा प्रभाग क्रमांक २ चे नगरसेवक प्रमोद महल्ले यांनी सोमवारी झालेल्या आमसभेत हा प्रस्ताव मांडला.सभागृहाने प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे लवकरच शहरातील प्रमुख ट्राफिक सिग्नल असलेल्या चौकांमध्ये ग्रीन नेट बसविण्यात येणार असून वाहनधारकांना उन्हापासून काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

> अमरावतीतील सिग्नल चौकांमध्ये वाहनधारकांना उन्हात थांबावे लागते. त्यांना दिलासा मिळावा यासाठी प्रत्येक चौकात ग्रीन नेट लावण्याची मागणी केली होती. प्रस्ताव मंजूर झाल्याने लवकरच याची अंमलबजावणी होईल.
>
> 
>
> **-प्रमोद महल्ले,** नगरसेवक

## उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर आजपासून

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक युवा विकास केंद्र, संचालित, एकलव्य धनुर्विद्या क्रीडा अकादमी, एकलव्य गुरुकुल स्कूल, युवा विकास बहुउद्देशीय संस्था अमरावती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तालुका क्रीडा संकुल नांदगाव खंडेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ एप्रिल ते १ मे दरम्यान होणाऱ्या विविध खेळाचे व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश जाधव उद्घाटक म्हणून अनिल भटकर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र जाधवर,श्रीराम लांबाडे, प्रा.जयंत इंगोले,शेख सलीम शेख हुसेन,अनिल कोल्हे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन संपन्न होणार आहे होणार आहे या शिबिरामध्ये एकूण ४५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे.शिबिराच्या यशस्वीते करिता. विलास मारोटकर, अनुप काकडे, अमर जाधव, विशाल ढवळे एकलव्य क्रीडा अकादमीचे पदाधिकारी, एकलव्य गुरुकुल स्कूलचे शिक्षक प्रतिनिधी प्रा. गजानन काकडे ,सीमा पोहनकर,आंतरराष्ट्रीय खेळाडू, राष्ट्रीय खेळाडू परिश्रम घेत आहे.

## पी.आर पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

### महाविद्यालयातील २५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**अमरावती/का.प्र.**

पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे नुकताच सर्व शाखेतील बी. ई. अंतिम वर्ष २०२५ तसेच एमबीए व एमसीए पहिली ऑटोनॉमस बॅचचा पदवी प्रदान समारंभ उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील सर्व शाखेतील बी.ई अंतिम वर्ष २०२५ च्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या व एमबीए एमसीए ऑटोनॉमस बॅच विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.याच सोबत विद्यापीठातील गुणवत्ता यादीतील प्राविण्य सुचित नाव असलेल्या एकूण २५ विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. नितीन कोळी (संचालक परीक्षा नियंत्रक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ) यांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षी



पी. आर पोटे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी , एम.सी.ए व एम.बी.ए च्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता धारक प्राविण्य सूचित स्थान प्राप्त केले.

कार्यक्रमाची सुरवात सरस्वती व संत गाडगे महाराज प्रतिमेचे पूजन, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीताने झाली. यानंतर डॉ. नितीन कोळी (संचालक परीक्षा नियंत्रक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ) यांनी विद्यार्थ्यांना भारतासारख्या प्रगतिशील राष्ट्रात भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि देशांतर्गत ऊर्जा निर्मितीचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम जावंधिया यांनी पदवी प्राप्त विद्यार्थी यांना नैतिकतेची शपथ दिली व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी.एम खोडके यांनी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी.एम. जावंदीया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. गौरी देशपांडे यांनी केले. तर डॉ सचिन सराफ, डॉ सोमदत्त तोंडरे यांनी कार्यक्रमचे उत्कृष्ट आयोजन केले. सर्वात शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# दिलीप बाबू इंगोले-दूरदृष्टी, कर्तृत्व आणि समर्पणाचा सुवर्णप्रवास

समाजकारण, शिक्षणसेवा आणि संस्थात्मक बांधिलकी यांचा सुंदर संगम म्हणजे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय दिलीप बाबू इंगोले होय. आपल्या कर्तृत्व, दूरदृष्टी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर त्यांनी संस्थेच्या विकासात मोलाचा वाटा उचलत एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

तब्बल पंचवीस वर्षे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी परिषदेवर विविध जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडत त्यांनी संस्थेच्या प्रत्येक घटकाला सक्षम करण्याचे काम केले. शाळा, महाविद्यालये, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्याशी असलेली त्यांची नाळ ही केवळ प्रशासनापुरती मर्यादित नसून ती आत्मीयतेने जोडलेली आहे.

स्वर्गीय रावसाहेब इंगोले यांच्या पश्चात संस्थेत झालेली त्यांची एंट्री जरी अनपेक्षित असली, तरी त्यांच्या कार्याने ती इतिहासात सुवर्णक्षरांनी नोंदवली गेली. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या विचारांचा वारसा जपत त्यांनी शिक्षण क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत.

संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच भौतिक सुविधांच्या उभारणीत त्यांनी घेतलेला पुढाकार विशेष उल्लेखनीय आहे. अत्याधुनिक इमारती, क्रीडांगणे, जिम, इनडोअर स्टेडियम यांसारख्या सुविधा उभारून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक सक्षम आणि सर्वांगीण विकासाचे वातावरण निर्माण केले आहे.



स्वतः क्रीडापटू असल्याने क्रीडाक्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले. आज संस्थेअंतर्गत ३०० पेक्षा अधिक शाळा व महाविद्यालयांमध्ये क्रीडासुविधा उपलब्ध असून, अनेक विद्यार्थी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करत आहेत.

बँकिंग क्षेत्रातील अनुभवामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनात अचूकता आणि दृष्टीकोन दिसून येतो. संस्थेचा आर्थिक कारभार त्यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळत प्रगतीचा मजबूत पाया घातला आहे.

संस्थेला 'एन्सायक्लोपीडिया' ही मिळालेली उपाधी त्यांच्या अफाट ज्ञानाची साक्ष देते. संस्थेतील प्रत्येक बाबीची सखोल माहिती आणि निणर्यक्षमतेमुळे त्यांनी संस्थेला स्थैर्य आणि दिशा दिली आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय हर्षवर्धन दादा देशमुख त्यांच्या नेतृत्वात संस्थेचे झालेल्या प्रगतीत दिलीप बाबूंचा मोलाचा वाटा आहे.

दिलीप बाबू इंगोले हे केवळ प्रशासक नसून एक संवेदनशील, आपुलकीने वागणारे आणि प्रत्येकाला आपलेसे वाटणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला ते कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपतात हीच त्यांची खरी ताकद आहे. आमच्या कुटुंबाला भक्कम साथ देणारी वडीला समान व्यक्ती आदरणीय दिलीप बाबू इंगोले यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

आज त्यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**वैशाली जनार्दन गरकल**
जिल्हा परिषद, अमरावती

# परंपरा, आस्थेतून पर्यावरणीय संतुलन साधणारी

# देवराई...

भारतीय संस्कृती निसर्गपूजक आहे त्यामुळे इथल्या धार्मिक ग्रामीण प्रथा-परंपरा ह्या निसर्गावरच आधारित आहेत. ऋतुचक्राच्या बदलानुसार सण-उत्सव, मंगल कार्य हे शास्त्र आणि विज्ञानाला अनुसरून आहे. आज तांत्रिक आणि यांत्रिक दृष्ट्या विश्व विकसित जरी झाले असले तरी भारतातील अनेक प्रकारच्या ऐतिहासिक रहस्यांचे उत्तर त्यांना काही शोधता आले नाही. अध्यात्म आणि शास्त्र या दोघांच्या मांडणीतून अनेक संकल्पना भारतीय समाजात रूढ होऊन परंपरा बनल्या आणि काळाच्या प्रवाहात गतिमान झाल्या काही संपल्या सुद्धा. त्यातीलच एक महत्वाची संकल्पना आणि परंपरा म्हणजे देवराई. देवराई म्हणजे मातृदेवतांचे रान अशी परंपरा प्राचीन ग्रामीण भागात रूढ होती. देवराई मध्ये मातृदेवतेचा वावर असल्याची परंपरा ग्रामीण भागात रूढ असल्यामुळे ते एक प्रकारचे देवाचे राखीव जंगल होते. देवाचे जंगल असल्यामुळे त्या ठिकाणच्या वृक्षांची तोड करणे किंवा त्याला वणवा लावणे हे परंपरेच्या व धर्माच्या विरुद्ध होते. आज महाराष्ट्रात अशा देवराई पहायला मिळत नसल्या तरी इतिहासात अनेक गावात देवराई असल्याची नोंद आहे.

परंपरेचा नावावर देवराई उभी झाली असली तरी ते एक प्रकारचे सरंक्षित वन होते जे आस्था आणि श्रद्धेच्या आधारावर उभे झाले होते. या देवराई मुळे मोठ्या प्रमाणात प्राणवायू ची निर्मिती तर होत होतीच परंतु पर्जण्याचे प्रमाण देखील वाढत होते. देवराईमुळे जमिनीतील पाण्याची पातळी संतुलित राहत असल्याने गावात अवर्षण किंवा दुष्काळ पहायला मिळत नव्हते. संरक्षित वन असल्यामुळे सर्व प्रकारच्या



वनस्पतींची वाढ या जंगलात होत होती त्यातून अनेक प्रकारच्या दुर्लभ आणि औषधीय वनस्पती ज्यात हिरडा, बेहडा, सातवीन, चारोळी, उंबर, बिब्बा, करवंदवेल सारख्या अनेक वनस्पतींचा समावेश होता. अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी, सूक्ष्मजीव मुक्तपणे देवराईत संचार करायचे शिवाय पाळीव गुरांसाठी चाराची व्यवस्था देखील व्हायची. जैवविवीधतेचे संरक्षण, पर्यावरणीय संतुलन या सर्वांसाठी देवराई गुणकारी होती. आज संपूर्ण विश्व यांत्रिक आणि तांत्रिक विकासाच्या हायवेवर गतिमान आहे त्यामुळे आता कुठलीच गोष्ट अशक्य नाही असे म्हणता येईल. संचार पद्धती मध्ये घडून आलेल्या विकासामुळे विश्वाला कनेक्ट करणे सहज आणि सोपे झाले आहे. मानवी श्रमाची जागा यंत्रे घेत असल्याने कामाच्या वेळेत मोठ्या प्रमाणात कमी आली आहे. औद्योगिक क्रांती नंतरचा हा झालेला विश्वव्यापी बदल मानव प्रजातीच्या शोधक, चिकित्सक आणि मेहनती वृत्तीला परिभाषित करतो. यातून मानव जातीचा सर्वांगीण विकास होत असला तरी अनेक प्रकारचे भौगोलिक, जीवशास्त्रीय, वातावरणीय बदल यातून होतांना दिसत आहेत जे फक्त मानव जातीवरच नाही तर अन्य प्राणी, पक्षी, सूक्ष्मजीव, वनस्पती यांच्यावर देखील प्रभाव टाकत आहेत. हा प्रभाव धोकादायक असून यातून तापमान वाढ, ऋतुचक्रात बदल, हवामानातील बदल, जैवविविधतेवर परिणाम अशा सारख्या समस्या उद्भवताना दिसत आहेत. जागतिक तापमान वाढीचा परिणाम सागरांच्या, पर्वतांच्या, आणि जमिनीच्या अंतर्गत हालचालींवर होत असून यातून सुनामी, भूकंप, अवकाळी पाऊस सारखी स्थिती उद्भवतांना दिसत आहे. हे सर्व मानव प्रजातीच्या अत्याधिक पर्यावरणीय हस्तक्षेपामुळे होत असल्याचे निदर्शनास येते. आज शासनाला किंवा अनेक पर्यावरणीय सरंक्षणासाठी कार्यरत संस्थाना वृक्ष लागवड व संवर्धनासाठी जाहिराती कराव्या लागतात. बरेचदा अभियान सुद्धा राबवावे लागतात. परंतु आपण ज्या आपल्या पूर्वजांची अशिक्षित, अज्ञानी, अंधश्रद्धाळू, रूढीवादी म्हणून हेटाळणी करतो त्यांनी देवराई सारखी पर्यावरणीय समतोलाची आणि वृक्षसंवर्धनाची व्यापक संकल्पना समजाला दिली. देवराई फक्त एक राखीव जंगल नव्हते तर येणाऱ्या पिढीचे जीवनवायू सुद्धा होते. पर्यावरणीय कृतज्ञता, जागरुकता आणि श्रद्धा यांच्या आधारावर पूर्वजांनी उभे केलेली देवराई आज दिसून येत नाही कारण सतत विकासाच्या नावावर आजच्या पिढीनी तिचा सर्वनाश केला आहे. आज देवराई असती तर शासनाला राखीव जंगलांसाठी कायदा करावा लागला नसता.

**डॉ. दुर्गेश साठवणे**
नागपूर
मो. ८८०६९९९३१४

# जागतिक वसुंधरा दिन

दरवर्षी २२ एप्रिलला जागतिक वसुंधरा दिन साजरा होतो. अमेरिकेच्या सांता बार्बारातील तेलगळती पीडितांनी पृथ्वीवरचे जीवन वाचवण्यासाठी '२२ एप्रिल' वसुंधरा दिन म्हणून साजरा करण्याची कल्पना प्रथम १९७० मध्ये मांडली. ती सर्वमान्य होऊन पहिल्या वर्षी त्यात २० लाख लोक सहभागी झाले. ही संख्या आता एक अब्जाहून जास्त झाली आहे. वसुंधरा दिनानिमित्तच्या देशोदेशींच्या कार्यक्रमांची अधिकृत माहिती आंतरजालावर देतात. वन्यप्राणी निधीसारख्या स्वयंसेवी संस्थादेखील कार्यक्रमांत सहभागी होतात.



या दिवशी शैक्षणिक संस्था, विविध गट, मंडळांतर्फे पृथ्वीच्या संरक्षणासाठीचे प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात. 'आपण सामान्य लोक काय करणार? शासनाने ही जबाबदारी घ्यावी' हा प्रचलित दृष्टिकोन बदलण्यासाठी पर्यावरण आणि परिस्थितीकी शास्त्राचे ज्ञान दिले जाते. जसे प्रत्येकजण आपले घर व्यवस्थित ठेवतो, तसेच त्याने पृथ्वी चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी काळजी घ्यावी हे यमनिमित्ताने अधोरेखित केले जाते. शाश्वत जीवनपद्धती संदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते. हवामान बदलाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा बचत, हरितीकरण, प्रदूषणमुक्त परिसर, घनकचरा व्यवस्थापन अशा साध्या आणि सहज करता येतील अशा उपायांबद्दल जाणीवजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

सध्या आपल्याला मिळालेल्या अंतराळाबद्दलच्या माहितीनुसार जीवसृष्टी असणारा पृथ्वी हा एकच ग्रह आपल्याला वास्तव्यासाठी उपलब्ध आहे. पर्याय नसाल्याने आपण इथेच काळजीपूर्वक शाश्वतरीत्या राहणे गरजेचे आहे. विनाकारण अतिप्रमाणात साधनसंपदा वापरून आपण प्रदूषणाचे डोंगर निर्माण करत आहोत. त्यामुळे इतर जैवविविधता धोक्यात येत आहे. विकासाच्या अनेक कल्पनांनी आपण निसर्गाची रचना बदलून टाकतो. मग निसर्गही त्याला वेळोवेळी चोख प्रत्युत्तर देतो. त्यामुळे मानवाचे जीवन खडतर होते. ऊर्जा बचत करणे; सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय वापरणे; प्लास्टिक, थर्मोकोल किमान वा न वापरणे; वस्तूंचा पुनर्वापर, यांचा आग्रह धरणे एवढे तरी आपण सहजच करू शकतो.

**आखाती युद्ध केवळ भूराजकीय संघर्ष नसून जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे संकट ठरते. तेलाच्या किमतींपासून रोजगारापर्यंत प्रत्येक स्तरावर त्याचे परिणाम दिसून येतात. अशा वेळी दीर्घकालीन उपाययोजना, पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विकास, आर्थिक स्वावलंबन आणि स्थिर धोरणे यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. अन्यथा, प्रत्येक जागतिक संघर्षासोबत अर्थव्यवस्थेची हीच घसरण पुन्हा पुन्हा अनुभवावी लागेल.**

# युद्धज्वराचा हिदोळा

प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण आता येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा.

युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही गुंतवणूकदारांसाठी सर्वात मोठा अडथळा असते. देशांतर्गत तसेच परदेशी गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भांडवली बाजारातील विश्वास कमी होतो आणि नवीन गुंतवणुकीचा ओघ मंदावतो. परकीय गुंतवणूक घटल्यास तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढ यांवरही नकारात्मक परिणाम होतो. या सर्व प्रक्रियेचा फटका बसतो तो रोजगार क्षेत्राला. उद्योगांमध्ये उत्पादन कमी झाले, गुंतवणूक थांबली आणि नफा घटला की कंपन्या सर्वप्रथम मनुष्यबळावर गदा आणतात. नवीन भरती थांबते, कंत्राटी कर्मचाऱ्यांची कपात होते आणि काही वेळा कायमस्वरूपी नोकरकपातही केली जाते. सेवाक्षेत्रातही याचा परिणाम जाणवतो, कारण ग्राहकांचा खर्च कमी झाल्याने व्यवसायांवर ताण वाढतो. परिणामी मध्यमवर्गीय तसेच निम्नवर्गीय कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटते. युद्धाचा परिणाम केवळ थेट आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या मानसिकतेवरही परिणाम करतो. अनिश्चिततेमुळे लोक खर्च करण्यापेक्षा बचतीकडे वळतात. त्यामुळे बाजारातील मागणी आणखी घटते. हीच साखळी अर्थव्यवस्थेच्या मंदीला अधिक गती देते. जागतिक स्तरावर व्यापारमार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्यास निर्यात-आयात व्यवहारांवरही परिणाम होतो आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेलाच धक्का बसतो. अशा परिस्थितीत सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहते.



महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक वाढ टिकवून ठेवणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करणे कठीण होते.

यातून वित्तीय तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो, तर सामाजिक कल्याण योजनांवरील खर्च वाढवण्याची गरजही भासते. त्यामुळे आर्थिक धोरणे आखताना संतुलन साधणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पश्चिम आशियातील इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील भीषण संकटाच्या छाया आता भारतीय अर्थव्यवस्थेवर पडू लागल्या आहेत. या युद्धाचा फारसा परिणाम होणार नाही आणि आम्ही विशेष काळजी घेतली आहे, असे केंद्र सरकारतर्फे सांगण्यात येत असले, तरी इतर देशांप्रमाणे भारतावरही विपरीत परिणाम होणार आहे, हे स्पष्ट आहे. 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने २०२६-२७ साठी भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा अंदाज ६.८ टक्क्यांवरून ६ टक्के इतका खाली आणला आहे.

याचे कारण या युद्धामुळे होर्मुझ खाडीमधील वाहतूक अनेक देशांसाठी बंद झाली आणि अन्यत्रही क्षेपणास्त्र हल्ले सुरू असल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी ५५ आणि एलपीजीपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा याच युद्धग्रस्त भागातून होतो. खतांच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२४-२५ मध्ये २.४ टक्के असलेली सरासरी महागाई आता ४.८ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. यापूर्वी, म्हणजे १९७३ मध्ये तेल निर्यातदार राष्ट्रांनी अचानकपणे इंधनाचे दर वाढवल्यामुळे भारतावर महासंकट कोसळले होते. त्यावेळी याच्या परिणामी, तसेच सातत्याच्या दुष्काळामुळे भाववाढीचे संकट कोसळले होते.

आजघडीला भारताची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली आहे. अन्नधान्याची टंचाई केव्हाच दूर झाली आहे. परंतु तरीही आताचा काळ जागतिकीकरणाचा असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता युद्धजन्य स्थितीचे फटकेही जास्त बसण्याची शक्यता असते. याचे कारण परदेशांतून भारतात येणाऱ्या पैशांपैकी ४० टक्के वाटा हा आखाती देशातून येतो. त्याचप्रमाणे उदारीकरणानंतर जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा हळूहळू वाढत आहे आणि वेगवेगळ्या वस्तूंची व सेवांची निर्यात भारत करू लागला आहे.

युद्धाच्या वणव्यामुळे अमेरिकेतील इंधनदराने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. युद्धापूर्वी तीन डॉलर प्रति गॅलनच्या खाली असलेले पेट्रोल दर चार डॉलरच्या पार गेले. तर मालवाहतुकीसाठी कणा मानल्या जाणाऱ्या डिझेलच्या किमतीत युद्ध सुरू झाल्यापासून ४७ टक्क्यांची वाढ झाली आणि त्याचे दर ५.५० डॉलर प्रति गॅलनपर्यंत पोहोचले. युरिया आणि खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर सुमारे ५० हजार डॉलर्सचा अतिरिक्त बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे कम्प्युटर चिप्स बनवण्यासाठी लागणाऱ्या हेलियम वायूचा ३५ टक्के पुरवठा कतारमधून होतो. हा पुरवठा थांबल्याने सिलिकॉन व्हॅलीतील टेक कंपन्यांवर मोठे संकट कोसळले आहे. रुग्णालयातील एमआरआय उपकरणासाठी हेलियम अनिवार्य असतो, ज्याची टंचाई आता दूर व्हायला हवी.

होर्मुझची नाकेबंदी अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेमध्ये मंदी येणे अटळ आहे. अमेरिकेचा २०२६ मधील विकासदर २.६ टक्क्यांवरून थेट एक टक्क्यावर येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. याचा अर्थ अमेरिका पुन्हा एकदा १९७०च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन' सारख्या परिस्थितीत पोहोचू शकते.

अशा परिस्थितीत विकासदर कमी आणि महागाई जास्त असते. शिवाय युद्ध थांबले तरी बंद झालेल्या तेलविहिरी पुन्हा सुरू होण्यासाठी अनेक महिने लागतात. तसेच युद्धात उद्ध्वस्त झालेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीला काही वर्षे लागू शकतात. त्यामुळे इंधन दर पूर्वीच्या स्तरावर येथे येण्याची शक्यता कमीच आहे.

अमेरिकेची स्थिती अशी राहिल्यास भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशांनाही चटके बसणार, हे स्पष्ट आहे. वास्तविक, यापूर्वी देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये पैशांचा ओघ वाढला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, सर्वसामान्य नागरिक असो वा मोठे उद्योग समूह, आपल्या गरजा आणि विस्तारासाठी बँकांकडे कर्ज मागणाऱ्यांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. देशातील ९५ टक्के बाजारपेठ व्यापणाऱ्या ४१ प्रमुख बँकांकडून गोळा केलेल्या माहितीनुसार, उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये मोठी झेप पाहायला मिळाली आहे. गेल्या वर्षी उद्योगांची कर्जवृद्धी केवळ साडेसाते टक्के होती. ती आता वाढून १३.५ टक्के झाली आहे. पायाभूत सुविधा अभियांत्रिकी, रसायने, पेट्रोलियम आणि कापड उद्योगांतून कर्जाची सर्वाधिक मागणी दिसून आली आहे. या क्षेत्रात १६.१६ टक्के वाढ झाली असून, प्रामुख्याने एनबीएफसी आणि कमर्शियल रियल इस्टेट क्षेत्राकडून मोठी मागणी आली आहे. वैयक्तिक कर्ज विभागात १५ टक्क्यांची वाढ झाली आहे गृहकर्जामध्ये स्थिरता दिसत असली, तरी वाहनकर्ज आणि गोल्ड लोन घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. अर्थात ही आकडेवारी युद्धापूर्वीची, फेब्रुवारी महिन्यातील आहे. त्यानंतरच्या परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे. त्यामुळे बदलत्या स्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राचे नफे १५ टक्क्यांनी तरी कमी होतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

कंपन्यांचे नफे पावणेतीन लाख कोटी रुपयांनी, म्हणजेच जीडीपीच्या ०.८ टक्क्यांनी घटण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेने व्यक्त केला आहे.

# अकोला विमानतळाला ‘श्री संत गजानन महाराज’ नाव देण्याची मागणी गतीत

## मुख्यमंत्र्यांचे निर्देश; केंद्राकडे शिफारस लवकरच

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला शहराजवळील शिवणी येथील विमानतळाचे ‘श्री संत गजानन महाराज विमानतळ’ असे नामकरण करण्याच्या मागणीला वेग आला आहे. आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, केंद्र शासनाकडे आवश्यक शिफारस करण्यासाठी राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव (विमानचालन) यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत.*

अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने भूसंपादनाकरिता सुमारे २०८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीच्या आधारे शिवणी विमानतळाच्या विस्ताराचे काम सध्या प्रगतीपथावर असून, अल्पावधीतच हे विमानतळ प्रवासी सेवेसाठी खुले होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



दरम्यान, अकोल्याजवळील शेगाव (जि. बुलढाणा) येथे श्री संत गजानन महाराजांचे पावन वास्तव्य असल्याने या ठिकाणाला ‘विदर्भाची पंढरी’ म्हणून ओळखले जाते. दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. रेल्वे व रस्तामार्गाची सुविधा असली तरी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी हवाई वाहतूक उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवणी विमानतळाचे तातडीने विस्तारीकरण व नामकरण करण्याची मागणी करण्यात आली होती.

या संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत लवकरच निर्णय होण्याची शक्यता असून, प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडे अंतिम शिफारस पाठवली जाणार आहे. या निर्णयामुळे शेगावच्या धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्यासह विदर्भातील संत परंपरेचा गौरव वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अकोल्यात कंदील आंदोलनाने प्रशासनाला धक्का

## २०१८ चा ठराव अद्याप कागदावरच; प्रभाग ३ अंधारात, नागरिकांचा संताप उसळला

■ प्रतिनिधी | अकोला ■

हद्दवाढ भागातील मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाच्या उदासीनतेचा फटका बसलेल्या प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांनी अखेर रस्त्यावर उतरून कंदील आंदोलन करत तीव्र संताप व्यक्त केला. ९ मे २०१८ रोजी मंजूर झालेला स्ट्रीट लाईट बसविण्याचा ठराव तब्बल सात वर्षांनंतरही अपूर्णच असल्याने नागरिकांमध्ये रोष वाढला आहे.

चोपडे ले-आऊट, आपातापा रोड ते खरप परिसरात उभारण्यात आलेल्या शेकडो विद्युत पोलवर अद्याप दिवे बसविण्यात आलेले नाहीत. परिणामी संपूर्ण परिसर अंधारात बुडाल्याने नागरिकांना दररोजच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. विशेषतः महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, १० मार्च रोजी नागरिकांच्या वतीने स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर कार्यकारी अभियंत्यांना



तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र निधीअभावी काम पुन्हा ठप्प झाल्याचे समोर आले.

यानंतर २३ मार्च रोजी डीपीसी सेव्हिंगमधून निधी उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. तरीही प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल न झाल्याने नागरिकांचा संयम सुटला. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विद्युत विभागाच्या विरोधात कंदील आंदोलन छेडत निषेध नोंदवला. कार्यकारी अभियंत्यांना प्रतीकात्मक कंदील देत ‘अंधार दूर करणारा विभागच अंधारात’ असा उपरोधिक संदेश देण्यात आला. आंदोलक निलेश देव यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, ‘तातडीने निधी उपलब्ध करून सर्व पोलवर स्ट्रीट लाईट बसविण्यात याव्यात, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र केले जाईल.’ २०१८ पासून प्रलंबित असलेले हे काम, वारंवार दिलेले निर्देश आणि निधीअभावी थांबलेली प्रक्रिया यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# अश्विन नवले यांचा राजीनामा नामंजूर

## शिवसेनेत संवादातून मतभेदांवर पडदा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना अकोला जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांनी दिलेला राजीनामा पक्ष नेतृत्वाने नामंजूर करत संघटनेतील मतभेदांवर संवादातून तोडगा काढण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले आहे. या घडामोडीमुळे जिल्ह्यातील शिवसेनेतील अंतर्गत हालचालींना वेग आला असून पक्ष एकजूट टिकवण्यावर भर देत असल्याचे चित्र आहे.

अश्विन नवले यांनी काही वैयक्तिक व संघटनात्मक कारणांमुळे आपला राजीनामा पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला होता. या राजीनाम्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने तो तत्काळ स्वीकारण्याऐवजी परिस्थिती समजून घेण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, शिवसेना सचिव संजय माशीलकर यांनी



पुढाकार घेत नवले यांना मुंबईतील ‘बाळासाहेब भवन’ येथे चर्चेसाठी बोलावले. या बैठकीत नवले यांनी आपल्या अडचणी आणि नाराजी सविस्तर मांडली.

विशेषतः माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्या कार्यपद्धतीबाबत असलेल्या नाराजीमुळे राजीनामा दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माशिलकर यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत संघटनेत गैरसमज वाढू नयेत यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. शिवसेनेत कुणाच्याही दबावाखाली काम होत नाही आणि वैयक्तिक राजकारणासाठी कार्यकर्त्यांचा वापर होऊ दिला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेनंतर नवले यांचा राजीनामा नामंजूर करण्यात आला असून, त्यांना नव्या उमेदीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाप्रमुख योगेश अग्रवाल हेही उपस्थित होते.

या संपूर्ण घटनाक्रमातून शिवसेना कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेत संघटनात्मक एकजूट राखण्यावर भर देत असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

### राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानात सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांतर्गत शासकीय कर्मचारी या गटात गव्हर्नमेंट अॅसेट मॅपिंगकरिता प्रथम पुरस्कार जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूलसेवक ऋषिकेश आंग्रे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

# उमरा येथे तलाठी कार्यालयाच्या बांधकामावर निकृष्टतेचे आरोप

## अंदाजपत्रक फलक नसल्याने ग्रामस्थांमध्ये संभ्रम; चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील उमरा येथे सुरू असलेल्या तलाठी कार्यालयाच्या बांधकामावर ग्रामस्थांनी निकृष्ट दर्जाचे गंभीर आरोप केले आहेत. शासनाच्या नियमानुसार विकास कामाच्या ठिकाणी अंदाजपत्रक व कामाचा तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक असताना, संबंधित ठिकाणी असा फलकच लावण्यात आलेला नसल्याने कामाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सदर बांधकामात कमी प्रतीच्या साहित्याचा वापर करून काम उरकले जात आहे. त्यामुळे या कामावर खर्च होणाऱ्या निधीचा अपव्यय होत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. काम कोणत्या विभागामार्फत सुरू आहे आणि एकूण खर्च किती आहे,



याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, कामाच्या दर्जावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित अभियंत्यांकडूनही या प्रकरणाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदाराला अधिकाऱ्यांचे पाठबळ मिळत असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामाचे देयके थांबवावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

### अभियंता फिरकत नाही; निधी दुरुपयोगाचा आरोप

उमरा येथील तलाठी कार्यालयाच्या बांधकामावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त अभियंता प्रत्यक्ष ठिकाणी भेट देत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निकृष्ट दर्जाचे काम सुरू असतानाही अभियंता फिरकत नसल्याने ठेकेदाराला मोकळे रान मिळाले असून, शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असल्याची तीव्र नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# जवाहर नगर येथे घरगुती कचरा संकलन (घंटा गाडी) सेवा नियमित सुरू करण्यात यावी

## महापौर यांना देण्यात आले निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जवाहर नगर येथे घरगुती कचरा संकलन (घंटा गाडी) सेवा नियमित सुरू करण्यात यावी यासाठी मनपाचे महापौर यांना श्रीमती आशा श्रीकांत पिसे पाटील यांनी निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की घरगुती कचरा संकलन (घंटा गाडी) सेवा जवाहर नगर येथे नियमित सुरू होती. परंतु गेल्या महिनाभरापासून कचरा गाडी येत नसल्याने कचरा



साचला आहे. त्यामुळे अस्वच्छता वाढत आहे दुर्गंधीचा वास सुरू आहे त्यामुळे माशा मच्छरानी हैदोस घातला आहे. यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.आमच्या परीसरात घंटा गाडी सेवा तात्काळ सुरू करण्यात यावे. सेवा नियमित व वेळेवर सुरू करण्यात यावी. संबधीत विभागावर योग्य देखरेख ठेवावी.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला

मुर्तिजापूर रोड, अकोला - ४४४००१
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/९७८/ २०२६ दिनांक : २१/०४/२०२६

### निविदा सुचना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ०७ सन २०२६-२७ | ईमारत देखभाल व दुरुस्ती अंतर्गत अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानाची दुरुस्ती करणे व कलरींग करणे. | रु.८,४५,९९२/- |
| २ | क्रमांक ०८ सन २०२६-२७ | लंघापूर ५७ खेडी प्रादे. पा.पु. योजना - मुर्तिजापूर शुध्द पाण्याच्या सम्प वरिल ५० अ.श. बोर्टा झोन येथील FASD Starter बदलविणे व इतर अनुषंगीक कामे. | रु.१,२४,२१३/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन दि. २२/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदेचा विक्री कालावधी दि. २१/०४/२६ ते २७/०४/२६ असा असुन निविदा भरुन सादर करण्याचा दि. २८/०४/२६ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. २२.०४.२०२६ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म.जी.प्रा. विभाग, अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५३३/२०२६ प्रोसेस नं.४८२१/२०२६
चौ.ता. १९/०४/२०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. निर्मला रामभाउ चंदन २. सौ. मिनाक्षी सुरेश वाडेकर रा. क्लासीक गार्डन सी-३३, भारती विद्यापीठ समोर, कातरज, पुणे. ४११०४६ ३. सौ. कविता लीलाधर पाटील रा. डी मार्ट जवळ, चांदीवली फार्म रोड, चांदीवली मुंबई ४. सौ. सुषमा कैलास शेगोकार ५. अमोल रामभाउ चंदन अर्जदार क. १, ४ व ५ रा. पुंडलीक बाबा आश्रम, मिरा अपार्टमेंट सावंतवाडी, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामभाउ मारोती चंदन
**पत्ता :-** रा. पुंडलीक बाबा आश्रम, मिरा अपार्टमेंट सावंतवाडी, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामभाउ मारोती चंदन यांचे दि. १६ / १२ / २०१८ रोजी राहत्या घरी पुंडलिक बाबा आश्रम समोर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५७९/२०२६ प्रोसेस नं.५२८२/२०२६
चौ.ता. २२/०६/२०२६ दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. निर्मला रामधन इंगळे २. सिद्धार्थ रामधन इंगळे ३. नितीन रामधन इंगळे अर्जदार क. १ ते ३ रा. कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला. ४. सुजाता महेंद्र जाधव रा. सुकळी पैसाळी, पोस्ट म्हैसपूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामधन राणुजी इंगळे
**पत्ता :-** रा. कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामधन राणुजी इंगळे यांचे दि. ०९/०८/२०२३ रोजी कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५८६/२०२६ प्रोसेस नं.५१९६/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. भानुदास रानुजी इंगळे रा. कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला. २. रामधन रानुजी इंगळे मयत तर्फे वारस अ. निर्मला रामधन इंगळे ब. सिद्धार्थ रामधन इंगळे क. नितिन रामधन इंगळे अर्जदार क. २अ ते २क रा. कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला. ड. सुजाता महेंद्र जाधव रा. सुकळी पैसाळी, पो. म्हैसपूर, ता. जि. अकोला. ३. सयाबाई वकीला दामोदर रा. डापकी जहागिर, पो. बोरगाव खुर्द, ता. जि. अकोला. ४. वेणूताई उर्फ यांताबाई राजू गोपनारायण रा. घुसर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : उषा उर्फ मैनाबाई साहेबराव गाडेकर
**पत्ता :-** रा. कासळी बु, पोस्ट म्हातोडी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत उषा उर्फ मैनाबाई साहेबराव गाडेकर यांचे दि. २६/०९/२०१० रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# अकोट नगरपालिकेकडून सुसज्ज शववाहिका सेवेत; नागरिकांना मोठा दिलासा

## नगराध्यक्षा माया धुळे यांच्या हस्ते लोकार्पण; सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय

**अकोट :** शहरातील नागरिकांना अत्यावश्यक सेवांमध्ये सुसूत्रता मिळावी आणि दुःखाच्या प्रसंगी आर्थिक व मानसिक ताण कमी व्हावा या उद्देशाने अकोट नगरपालिकेने नव्याने खरेदी केलेली सुसज्ज शववाहिका सोमवारी (दि. २० एप्रिल) औपचारिकरित्या सेवेत दाखल करण्यात आली. पालिका प्रांगणात आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्षा माया धुळे यांच्या हस्ते या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शहरभरातून स्वागत होत आहे.

अकोट शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता, मृतदेह वाहतुकीसाठी नागरिकांना आतापर्यंत खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. अनेकदा तातडीच्या प्रसंगी योग्य वाहन उपलब्ध न होणे, तसेच खासगी वाहनांचे जादा दर यामुळे सर्वसामान्य व गरीब कुटुंबांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने स्वतंत्र, सुसज्ज शववाहिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.

पालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आलेली ही शववाहिका अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असून मृतदेह सुरक्षित व सन्मानपूर्वक नेण्यासाठी आवश्यक सर्व सोयींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना आता आपत्कालीन परिस्थितीत जलद व सुलभ सेवा मिळणार आहे. सोमवारी झालेल्या या कार्यक्रमात



### ‘जनसेवा हेच प्रथम कर्तव्य’ – माया धुळे

लोकार्पण प्रसंगी बोलताना नगराध्यक्षा माया धुळे म्हणाल्या, ‘जनतेची सेवा हेच आमचे प्रथम कर्तव्य आहे. दुःखाच्या प्रसंगी नागरिकांना तातडीने मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. नगरपालिका शहराच्या विकासाबरोबरच मूलभूत सेवा सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असून पुढील काळातही अशा लोकाभिमुख योजना राबविण्यात येतील.’

नगराध्यक्षा माया धुळे यांच्या हस्ते वाहनाचे शास्त्रोक्त पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी शशिकांत बाबर, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम छोटेखानी असला तरी त्याला सामाजिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले.

या प्रसंगी उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे, आरोग्य सभापती मनीष कराळे, गटनेता रवी ठाकूर, बांधकाम सभापती सुशील पुंडकर, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, महिला व बालकल्याण सभापती नयना इंगोले, उपसभापती शुभांगीताई टेंमझरे यांच्यासह नगरसेवक दिलीप बोचे, निलेश नवघरे, स्नेहल डाबेराव, अब्दुल अकबर अब्दुल नासिर, शारदा मिसळे, लता कांबळे, गंगाबाई चंदन, सीताबाई मर्दाने, रेणुका खवले, अझीम इनामदार आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालिकेचे अधिकारी, कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक आणि पत्रकारांचीही लक्षणीय उपस्थिती होती. नगरपालिकेच्या या निर्णयामुळे विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे नागरिकांनी सांगितले. आपत्कालीन काळात सन्मानपूर्वक आणि तातडीने सेवा उपलब्ध होणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. अकोट नगरपालिकेच्या या उपक्रमामुळे शहरातील मूलभूत सेवांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली असून, प्रशासनाच्या जनसेवेच्या बांधिलकीचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दुरांतो श्रीमंतांसाठी... गरीबांना प्रवासाची शिक्षा

## सिंदीतून संतापाची लाट

## पॅसेंजर सुरू करा नाहीतर आंदोलन : प्रवाशांचा इशारा

**सिंदी/मोहन सुरकार**

एकीकडे वातानुकूलित, वेगवान दुरांतो एक्सप्रेस श्रीमंत प्रवाशांच्या सेवेत धावत आहे, तर दुसरीकडे गोरगरीबांच्या प्रवासाची जीवनवाहिनी असलेल्या नागपूर–भुसावळ आणि नागपूर–काजीपेट पॅसेंजर गाड्या अजूनही रुळावर परतलेल्या नाहीत. श्रीमंतांना सुविधा आणि आम्हाला उपेक्षा का असा प्रश्न सिंदी रेल्वे स्थानकावरील प्रवाशांनी उपस्थित करत संताप व्यक्त केला आहे.

कोरोना महामारीच्या काळात बंद करण्यात आलेल्या रेल्वे सेवा आज तब्बल सहा वर्षांनंतरही पूर्ण क्षमतेने पूर्ववत झालेल्या नाहीत. सिंदी रेल्वे स्थानकावर भुसावळ आणि काजीपेट पॅसेंजर गाड्यांचे थांबे अद्याप सुरू झालेले नाहीत. या गाड्या सामान्य नागरिकांसाठी स्वस्त, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचे मुख्य साधन होत्या. मात्र, आज त्या नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

**शालीमार'ही गायब प्रवाशांची कोंडी**

दुपारच्या सुमारास वर्धा–नागपूर मार्गावरून परतीच्या प्रवासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी 'शालीमार एक्सप्रेस'ही बंद आहे. याशिवाय, महाराष्ट्र एक्सप्रेसचा 'डाउन' थांबा असला तरी 'अप' थांबा नसल्याने प्रवाशांना अर्धवट सुविधा मिळत आहेत. परिणामी, प्रवासाचे नियोजन कोलमडले असून नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत आहे.

**विद्यार्थी, कामगार, रुग्णांची होरपळ**

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका विद्यार्थी, चाकरमानी, छोटे व्यावसायिक आणि वैद्यकीय उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना बसत आहे. स्वस्त पॅसेंजर गाड्या बंद असल्याने त्यांना महागड्या एक्सप्रेस गाड्या किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे




वेळ आणि पैशांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असून सामान्य नागरिक अक्षरशः होरपळत आहेत.

**स्वस्त प्रवास' बंद;खिशावर ताण**

रेल्वेने स्वस्त आणि सुरक्षित प्रवास देणाऱ्या पॅसेंजर गाड्यांचा अभाव म्हणजे छोट्या स्थानकांवरील प्रवाशांसाठी मोठा धक्का आहे. वर्धा–नागपूर दरम्यानच्या अनेक लहान स्टेशनवरील प्रवासी रेल्वेपासून दूर लोटले गेले आहेत. रेल्वे आमची होती, आता ती आमच्यापासून दूर गेली, अशी हतबल प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली.

**सरकारला थेट इशारा**

श्रीमंतांसाठी दुरांतो, मग आमच्यासाठी पॅसेंजर कधी असा प्रश्न करत नागरिकांनी सरकार व लोकप्रतिनिधींना जागे होण्याचे आवाहन केले आहे. आम्हीच मतदान करतो, मग आमच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष का असा प्रश्न उपस्थित करत, लवकरात लवकर पॅसेंजर गाड्या सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. सिंदीतून उठलेला हा आवाज आता संपूर्ण रेल्वे प्रशासनाला जाग आणणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# जलाशयांच्या पातळीवर सैल नजर; आठवड्याला एकदाच अपडेट

## उष्णतेच्या लाटेत पाटबंधारे विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे जलसाठ्यांवरील ताण दिवसेंदिवस वाढत असताना पाटबंधारे विभागाकडून जलाशयांतील पाणी पातळीची नोंद नियमितपणे न घेता आठवड्यातून एकदाच अद्ययावत केली जात असल्याचे समोर आले आहे. परिणामी, पाणी व्यवस्थापनाच्या नियोजनात अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मागील आठवड्यात जिल्ह्यात तापमानाने ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला होता. तीव्र उष्णतेमुळे जलाशयांतील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. अशा परिस्थितीत पाणीसाठ्यांवर दररोज लक्ष ठेवणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात जलाशयांच्या पाणी पातळीची माहिती नियमित नोंदवली जात नसल्याने स्थितीचे अचूक चित्र समोर येत नाही.जिल्ह्यातील ११ मोठे व मध्यम प्रकल्प हे सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार आहेत. या जलाशयांतून पाणी वापर संस्था विविध भागांना पुरवठा करतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर काही भागांत पाणीटंचाईची चिन्हे दिसू लागली असून नागरिकांना पर्यायी स्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे.

तज्ज्ञांच्या मते, पाणी पातळीतील दररोजच्या चढ-उताराची माहिती उपलब्ध नसल्यास योग्य नियोजन करणे कठीण होते. विशेषतः बाष्पीभवनाचा वेग वाढलेला असताना साठ्याचे अचूक मूल्यांकन आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाने दैनंदिन अहवाल प्रणाली अधिक काटेकोरपणे राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलस्रोतांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी अचूक व वेळेवर माहिती महत्त्वाची ठरते. त्यामुळे पाटबंधारे विभागाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित होत आहे.दरम्यान, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबीकडे लक्ष देऊन पाणी पातळीची नोंद आणि अहवाल अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जलसाठा स्थिती (१५ एप्रिलपर्यंत)

बोर प्रकल्प – ५३.०९%
निम्न वर्धा – ५२.५५%
धाम प्रकल्प – ५०.२३%
पोथरा प्रकल्प – २३.६४%
पंचधारा प्रकल्प – ३२.६९%
डोंगरगाव प्रकल्प – ३८.९२%
मदन प्रकल्प – ४५.७४%
मदन उन्नई प्रकल्प – ०.००%
लाल नाला प्रकल्प – ५१.९६%
वर्धा कार नदी प्रकल्प – ३६.४६%
सुकळी लघु प्रकल्प – २५.२२%

# अवकाळीचा तडाखा; शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावणार

## दिवसा ऊन, रात्री पाऊस; पिकांवर दुहेरी संकट

**साहूर/जनमाध्यम**

हवामानातील अनिश्चिततेने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या पोटावर लाथ मारली आहे. दिवसभर कडक उन्हाचा तडाखा आणि रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या सरी या दुहेरी संकटामुळे कापणीच्या उंबरठ्यावर आलेली गहू व हरभऱ्याची पिके धोक्यात आली आहेत. शेतकऱ्यांची अक्षरशः दाणादाण उडाली असून शेतात पिके वाचवण्यासाठी रात्रंदिवस झटापट सुरू आहे.

हवामान विभागाने २० ते २६ एप्रिलदरम्यान वादळ, गारपीट व अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. त्यानुसार ३ एप्रिलपासून सुरू झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असतानाच १९ एप्रिलपासून पुन्हा नव्याने संकट कोसळले आहे. अधूनमधून येणाऱ्या पावसाच्या सरी आणि वादळी वाऱ्यामुळे उभी पिके आडवी होण्याचा धोका वाढला आहे.मागील वर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील



सोयाबीन पूर्णतः वाया गेले. त्याची भरपाई करण्याच्या आशेने शेतकऱ्यांनी यंदा मोठ्या प्रमाणात गहू व हरभरा पिकवला. सध्या ही पिके कापणीस तयार असून अनेक ठिकाणी कापून शेतातच पडून आहेत. मात्र, अवकाळी पावसामुळे हा माल भिजून निकृष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.यातच मजूर व यंत्रांची टंचाई शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरली आहे. वाढत्या मजुरी दरामुळे कापणी खर्च परवडत नाही, तर काही ठिकाणी यंत्रे वेळेवर मिळत नाहीत. परिणामी, काही पिके शेतात उभीच आहेत, तर काही कापलेली पिके पावसाच्या तडाख्यात सापडली आहेत.उत्पादनात घट होण्याची शक्यता गडद झाली असून आर्थिक संकट आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. आधीच महागाईने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळीने दुहेरी आघात केला आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहे.

तातडीची गरज : प्रशासनाने त्वरित पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच कापणीसाठी यंत्रसामग्री व मजूर उपलब्ध करून देण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

# स्वराज्य योद्धा सायकलिंग चॅलेंज'चा उत्साहात समारोप



**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा सायकलिस्ट क्लबतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'स्वराज्य योद्धा सायकलिंग चॅलेंज – सिझन २'चा समारोप सोमवारी (दि. २० एप्रिल) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. देशभरातून तब्बल २६० स्पर्धकांनी सहभाग नोंदवत या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. आरोग्याबाबत जनजागृती करणे आणि सायकलिंगची आवड सर्वसामान्यांमध्ये निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. वर्धा सायकलिंग क्लब मागील सहा वर्षांपासून दररोज २५ ते ३० किलोमीटर सायकल चालवून नागरिकांमध्ये फिटनेस व आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचे कार्य करीत आहे.समारोप कार्यक्रमात वर्ध्यातील सहभागी स्पर्धकांना मेडल व टी-शर्टचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बायसन कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन गलांडे यांनी केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्धा सायकलिंग क्लबचे अध्यक्ष किशोर वागदरकर, चॅलेंज हेड विजय मोहोड व राम चतुर यांच्यासह कोर कमिटीतील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे वर्धा जिल्ह्यात सायकलिंगबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होऊन नागरिकांचा कल आरोग्यदायी जीवनशैलीकडे वाढत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# रेती माफियांचा राजरोस धुडगूस; महसूल विभाग गप्प का

## वर्धा शेजारील गावांत रेतीचा काळाबाजार फोफावला; चढ्या दराने विक्रीचा गोरखधंदा उघड!

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात रेती माफियांनी पुन्हा एकदा आपले जाळे पसरवत उघडपणे साठेबाजीचा धंदा सुरू केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वर्धा शहरालगतच्या पिपरी (मेघे), सिंदी (मेघे) परिसरात रिकाम्या भूखंडांवर रेतीचे प्रचंड ढिगारे उभे करून त्याची सर्रास चढ्या दराने विक्री केली जात असल्याने संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे महसूल विभागाचे स्पष्ट दुर्लक्ष, ज्यामुळे रेती माफियांचे 'चांगभले' सुरू असल्याची चर्चा जोरात आहे.

जिल्ह्यातील रेती घाटांचा अधिकृत लिलाव झाला असून संबंधित एजन्सींना कार्यारंभ आदेशही देण्यात आले आहेत. मात्र, या नियमबद्ध व्यवस्थेला छेद देत काही भुरटे रेती माफिया रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत नदीपात्रातून अवैध उपसा करत आहेत. क्षमतेपेक्षा अधिक रेती अवजड ट्रक-टिप्परमध्ये भरून ती शहरालगतच्या सुरक्षित वाटणाऱ्या ठिकाणी साठवली जात आहे.

**रात्रीच्या अंधारात 'रेतीचा खेळ' सुरू**

सावंगी टी-पॉईंट, जुना पाणी चौक, बजाज चौक परिसरातून रात्री उशिरा रेती भरलेली वाहने शहरालगतच्या गावांकडे रवाना होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. ही रेती ठराविक भूखंडांवर टाकून तिचा साठा तयार केला जातो आणि नंतर चढ्या दराने विक्री केली जाते. त्यामुळे सामान्य नागरिकांना रेतीसाठी दुप्पट-तिप्पट दर मोजावा लागत आहे.

**प्रशासन कुठे आहे? नागरिकांचा सवाल तीव्र**

संपूर्ण प्रकार उघडपणे सुरू असतानाही महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. 'सगळं दिसत असूनही कारवाई का होत नाही? कोणाच्या आशीर्वादाने हा धंदा सुरू आहे?' असे थेट



सवाल आता उपस्थित केले जात आहेत. प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे.

**पोद्दार इंटरनॅशनल स्कूल परिसरात रेतीचे ढिगारे**

वर्धा शहरालगतच्या पोद्दार इंटरनॅशनल स्कूल परिसरात मोठ्या प्रमाणात रेती साठवली जात असल्याचे समोर आले आहे. येथे ठिकठिकाणी ५० ब्रासपेक्षा अधिक रेतीचे ढिगारे आढळत आहेत. ही रेती कोणाच्या मालकीची, कुठून आणली आणि कायदेशीर परवानगी आहे का, याची चौकशी तातडीने होणे गरजेचे आहे.

**हिंदी विद्यापीठ मार्गावरही संशयाचे सावट**

पिपरी (मेघे) परिसरातील अग्रगामी शाळेजवळील पेट्रोलपंपासमोरून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावरही मोठ्या प्रमाणात रेतीचे ढिगारे दिसून येत आहेत. ही रेती चोरीची आहे का अधिकृत, याचा तपास महसूल विभागाने तातडीने करणे आवश्यक आहे.

**जनतेचा इशारा : 'रेती माफियांची दादागिरी थांबवा, अन्यथा आंदोलन अटळ**

संपूर्ण प्रकारावर तातडीने विशेष मोहीम राबवून रेती माफियांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही आता दिला जात आहे.

# चित्रा जावंधिया यांना 'आयकॉन ऑफ सेंट्रल इंडिया' किताब

**वर्धा/जनमाध्यम**

वास्तुशास्त्र क्षेत्रात कार्यरत असलेल्या चित्रा जावंधिया यांना आयकॉन ऑफ सेंट्रल इंडिया' या प्रतिष्ठेच्या किताबाने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांतून निवड करण्यात येत असताना त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार महिला कर्तृत्ववान पुरस्कार या कार्यक्रमात 'स्पिरिच्युअल लीडरशिप' या विभागात देण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन डॉ, रिचा जेन यांनी केले होते. वास्तुशास्त्र आणि संबंधित क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आल्याचे आयोजकांनी नमूद केले.यापूर्वीही चित्रा जावंधिया यांना २०२४ मध्ये नितीन गडकरी यांच्या हस्ते




'वास्तु एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला होता. तसेच २०२५ मध्ये 'नवभारत एम्पॉवर वुमन' या पुरस्कारानेही त्यांचा गौरव करण्यात आला आहे. अलीकडेच २ एप्रिल रोजी विधान भवन येथे आयोजित कार्यक्रमात 'अधिकार' मंचाकडून त्यांना गेस्ट स्पीकर म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.चित्रा जावंधिया या वैदिक वास्तुशास्त्रात कार्यरत असून 'बिना तोडफोड' वास्तु उपाय आणि कलर थेरपी या संकल्पनांवर त्या काम करतात. निवासी तसेच व्यावसायिक ठिकाणी कोणतीही मोठी तोडफोड न करता वास्तुशास्त्रीय बदल सुचविणे, हा त्यांच्या कार्याचा मुख्य भाग आहे.याशिवाय त्या सायंटिफिक लोगो डिझायनर म्हणूनही कार्यरत असून विविध कंपन्यांचे लोगो आणि शोरूम डिझाइन वैज्ञानिक पद्धतीने तयार करतात. तसेच सिग्नेचर रीडिंगच्या माध्यमातून व्यक्तीच्या स्वभाव आणि परिस्थितीचा अभ्यास करण्याचे कामही त्या करतात.सामाजिक क्षेत्रातही त्या सक्रिय असून वर्धा जिल्हा माहेश्वरी समाजाच्या उपाध्यक्षपदी कार्यरत आहेत. त्यांच्या या यशामुळे वर्धा जिल्ह्याचे नाव सेंट्रल इंडियात उज्ज्वल झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी'चा डिजिटल अवतार

## रुग्ण-रुग्णालय-शासन एकाच क्लिकवर

**मुंबई/जनमाध्यम**

राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासा ठरणाऱ्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा आता डिजिटल कायापालट झाला आहे. नव्याने विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी हा उपक्रम रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार असल्याचे स्पष्ट केले.

यासोबतच राज्यातील विविध आरोग्य योजनांचे एकत्रिकरण करण्यासाठी मंत्रालय स्तरावर 'वॉर रूम' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही जाहीर करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री



सहाय्यता निधी कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणाद्वारे नव्या प्रणालीची माहिती दिली. या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे रुग्णांना अर्जाची स्थिती मोबाईलवर एसएमएस व लिंकद्वारे रिअल-टाइम मिळणार असून, संपूर्ण प्रक्रिया पेपरलेस करण्यात आली आहे.

**आठ तासांत मंजुरी थेट रुग्णालयाच्या खात्यात निधी**

नवीन प्रणालीमुळे उपचारासाठी लागणाऱ्या आर्थिक सहाय्याची मंजुरी केवळ कार्यालयीन आठ तासांत मिळणार आहे. मंजुरीनंतर ३० टक्के रक्कम तत्काळ, तर उर्वरित ७० टक्के अंतिम टप्प्यात वितरित केली जाणार आहे. विशेष म्हणजे मंजूर निधी थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा होणार असल्याने पारदर्शकता वाढणार आहे.

**३ हजार रुग्णालयांचे जाळे**

'रुग्ण मित्र' हेल्पलाईन राज्यातील ३ हजारांहून अधिक सरकारी व खाजगी रुग्णालयांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. रुग्णांना तात्काळ मार्गदर्शन मिळावे यासाठी २४७ 'रुग्ण मित्र' टोल-फ्री हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून मोबाईल अॅपद्वारे जवळील रुग्णालय, रक्तपेढी व रुग्णवाहिका सेवा शोधणे सुलभ झाले आहे.

**महागड्या उपचारांसाठी दिलासा**

CSR-एनजीओ भागीदारी कर्करोगासारख्या गंभीर आजारांवरील महागड्या उपचारांसाठी सीएसआर व स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. इम्युनो थेरपीसारख्या उपचारांचा खर्च लाखोंमध्ये जात असल्याने या योजनेमुळे गरजू रुग्णांना मोठा आधार मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**वॉर रूममधून रिअल-टाइम देखरेख**

मंत्रालय स्तरावर स्थापन होणाऱ्या वॉर रूमद्वारे संपूर्ण प्रक्रियेवर सतत देखरेख ठेवली जाणार असून निर्णय प्रक्रियेला गती मिळणार आहे. बेड उपलब्धता, अर्ज स्थिती आणि निधी वितरण यावर रिअल-टाइम मॉनिटरिंग होणार आहे.

या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत पारदर्शकता, गती आणि समन्वय वाढून गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १४५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# संघटीत महिला अत्याचारातील संबंधितांवर गुन्हा दाखल करा

## -तिवसा तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना सर्वपक्षीय निवेदन

### फरार रुपेश राऊत याच्यावरही कारवाई करण्याची मागणी

**तिवसा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्यात महिलांवर, अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या संबंधित आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, यासाठी तिवसा येथे विविध राजकीय पक्षांनी संयुक्त बैठक घेऊन मुख्यमंत्री महोदयांना तिवसा तहसीलदार यांचे मार्फत निवेदन सादर केले.

नाशिक मधील लिंगपिसाट अशोक खरात याने संघटीत स्वरूपात शेकडो महिलांवर लैंगीक अत्याचार करून केलेल्या कृत्याचे व्हिडीओ चित्रीकरण करून त्यातून दबाव निर्माण केला तसेच सतत सतत गुंगीचे औषधाचा वापर करून शेकडो महिलाचे चारीत्र्य हनन केल्या गेले. या प्रकरणी पोलीस कारवाई फक्त एक खरातवरच होते. सदर प्रकरणी सहभागी यांचेवर सुध्दा कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या वतीने संयुक्तपणे तिवसा तहसिलदार यांचे मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यता आली.

अमरावती जिल्ह्यातील, भानखेडा, परतवाडा येथील अल्पवयीन मुलीवर विविध ठिकाणी झालेला अत्याचार व त्याचे मोबाईलवर प्रसारीत केलेले चित्रीकरण करून केलेली बदनामी हि सारी संघटीत गुन्हेगारी असुन यातील सर्व लोकांना शोधून कारवाई करावी अशी जनमानसाची भावना आहे. यातच गुरूदेवनगर मधील विश्व हिंदु परिषदचे जिल्हा महामंत्री रूपेश राऊत जो या भागात गोरक्षक, बजरंग दल आदीचा प्रभावी नेता म्हणून घेतो, त्याने मध्यरात्री नंतर मोबाईल वर महिलांसोबत अश्लील भाषेत संवाद करून शरीर सूखाची मागणी करीत होता.



तो सध्या पोलिसांना गुंगारा देवून फरार आहे. रूपेश राऊतचे प्रकरण संघटीत स्वरूपातील असून त्यावर सुद्धा कडक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातुन करण्यात आली.

सदर निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अखील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव ठाकरे) राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) आदीचे वतीने देण्यात आले. त्यात कॉ. प्रकाश सोनोने, श्रीराम (शेतू) देशमुख, विलास माहोरे, अजय सुरटकर, जितेंद्र कोरडे, दिलीप गोहत्रे, नवाज खॉ पठाण, सुरेश कळसकर, आशिष माहोरे, देवेंद्र आमले, देविदास निकाळजे, नितीन वानखडे, अंबादास जुवारे, यशपाल पुनसे, चंद्रकांत वडसकर आदीनी सहभाग घेतला.

# स्वच्छता, शिक्षण, रोजगारासाठी नमो संघ कार्यरत

## -आत्मनिर्भर भारतासाठी तरुणांना सहकार्य करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय नमो संघ एक सामाजिक आणि राष्ट्रहितासाठी कार्य करणारी संघटना आहे. राष्ट्र निर्माण हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे. संघ शिक्षा, आरोग्य, स्वच्छता युवा सशक्तिकरण, रोजगार आणि सामाजिक जागरूकतासाठी कार्य करत आहे. आत्म निर्भर भारताच्या निर्माणासाठी तरुणांनी या मध्ये सहकार्य करण्याचे आवाहन आज सोमवार २० एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.मनोज कुमार उर्फ मन्नू तोमर यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की संघटनेने देशात मोठ्या प्रमाणावर जनसेवा मोहीम चालवण्याची योजना आखली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचार आणि मार्गदर्शनाने प्रेरित होऊन एक सशक्त आत्मनिर्भर व अखंड भारत निर्माण करून देशाला विश्वगुरू बनविण्यासाठी हे प्रयत्न आहे. संघाचे प्रत्येक विचार जनहितासाठी आहे. राजकीय लाभ नाही तर राष्ट्रसेवा आणि समाजाच्या उत्थानासाठी आणि प्रत्येक नागरिकाचे राष्ट्र निर्माणामध्ये सहभाग असण्यासाठी संघ कार्यरत आहे. तरुणांना राष्ट्रसेवेसाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष मनोज कुमार यांच्यासोबत नरेश बसंल, महामंत्री दशरथ माठे, हेमंत कालिया, चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया उपस्थित होते.



# कठोरा ग्रामपंचायत महापालिकेत समाविष्ट होणार नाही

## -मासिक सभेमध्ये मोठा निर्णय



**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या जानेवारीमध्ये झालेल्या बैठकीत रेवसा व नवसारी सोबत अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये कठोरा ग्रामपंचायतला सहभागी करण्याचे म्हटले होते. पण आज सोमवार २० एप्रिल रोजी झालेल्या मासिक बैठकीत ग्रामपंचायतने महानगरपालिकेमध्ये सहभागी होण्यापासून नकार दिला आहे. सभेमध्ये या संदर्भात प्रस्ताव पारित करण्यात आल्याची माहिती आहे. मनपा क्षेत्रात सहभागी झाल्यावरही विकास कार्य नाही झाले. यामुळे ग्रामपंचायतीने हा निर्णय घेतलेला आहे. प्रशासक प्रवीण अळसपुरे यांनी शेगाव-रहाटगाव ला महानगरपालिकेमध्ये सहभागी केले परंतु विकास कार्य अथवा नागरिक सुविधा न झाल्याने कठोरा बु. गावाने महानगरपालिकेमधून वेगळे होण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे.

मनपाने गावामध्ये पत्रक वाचून सांगितले होते त्यावर चर्चाही झाली होती. पण सर्वांनी मनपामध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. जानेवारी महिन्यामध्ये डीपीसी चा प्रस्ताव ग्रामपंचायतला पाठविण्यात आला होता .ज्यावर जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी नियमानुसार ग्रामपंचायत मंजुरी प्रस्ताव मागविण्यात आला होता. ग्राप ने यावर मोठा निर्णय घेतला आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये सहभागी होण्यापासून नकार दिला आहे. सभेमध्ये प्रशासकीय समिती उपसरपंच गजेंद्र काळबांडे ,विनोद भालेराव, जया काळबांडे, प्रतिभा ठाकरे ,अर्चना निमकर, सविता तंतरपाळे आदि उपस्थित होते.

# पाच दिवसीय आध्यात्मिक सत्र आजपासून

## -स्व. मंगलजीभाई पोपट स्मृती निमित्त आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार व लोहाना महाजन समाजाच्या वतीने स्व. मंगल भाई पोपट स्मृती निमित्त एक विशेष आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन २२ ते २६ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी ६:३० ते ९:३० या वेळेत बुटी प्लाट स्थित लोहाना महाजनवाडी येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती सोमवार २० एप्रिल रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की, या सत्रामध्ये ध्यान, प्राणायाम व 'जीवन जगण्याची कला' यांच्या माध्यमातून नागरिकांना सकारात्मक व आनंदी जीवनशैलीवर गुजरातचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आनंद देसाई मार्गदर्शन करणार आहे. तसेच याच कालावधीत, २२ ते २६ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी ६:०० ते सायं ६:०० या वेळेत वलगाव येथील सिकची रिसॉर्ट मध्ये विशेष रहिवासी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या मध्ये आंतरराष्ट्रीय


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१९४/२०२६ — ने.ता.१२.०६.२०२६

**अर्जदार :** १. राजेंद्र बापुराव कनेर, वय ६० धंदा - मजुरी
२. बाबाराव बापुराव कनेर, वय ५८ धंदा - मजुरी
दोन्ही रा.धानोरा पुर्णा, पो.राजना पुर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक बापुराव नागोराव कनेर** यांचा मृत्यू दिनांक **१८.११.२००३** रोजी धानोरा पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक सुशिला बापुराव कनेर** हिचा दि.**१४.०३.२००६** रोजी धानोरा पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. तसेच अर्जदार नं.१ व २ ची आजी सुध्दा बऱ्याच वर्षापासून मयत झाली आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१९४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार

प्रो.क्र.३८१/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १०६/२०२६ — ने.ता.०४.०५.२०२६

**अर्जदार :** १. हिरुबाई प्रल्हादराव चवरे, वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
२. अशोक प्रल्हादराव चवरे, वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
३. गजानन प्रल्हादराव चवरे, वय ४३ वर्षे, धंदा - मजुरी
४. कल्पना मारोती बागडे, वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
अर्जदार नं.१ व ३ रा.बहाद्दरपूर, ता.भातकुली, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.खळणा, पो.खरडगांव खलना, ता.नेर, जि.यवतमाळ
अर्जदार नं.४ रा.नोराबी मस्जिदजवळ, गोयनाका नगर धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **प्रल्हाद डोमाजी चवरे** हे दि.**१५.१०.२०२४** रोजी मयत झाले. अर्जदार **हिरुबाई प्रल्हादराव चवरे**, वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम, रा.बहाद्दरपूर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२३.०३.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **प्रल्हाद डोमाजी चवरे** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **प्रल्हाद डोमाजी चवरे** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २५.०३.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का — आदेशान्वये, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भातकुली

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७३१/२०२६
**रमेश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Ramesh Marotrao Lanjewar, Age 69 Yrs. Occu.: Retired
R/o Pardeshi Pura, Rahatgaon, Tq.Dist.Amravati
2. Dhiraj Ramesh Lanjewar, Age 40 Yrs. Occu.: Service
R/o Rahatgaon Plot, Tq.Dist.Amravati
3. Sau.Priti Suresh Borkar, Age 39 Yrs. Occu.: Household
R/o Gopal Nagar, Machhagandha Colony, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मंदा रमेशराव लांजेवार** हे दिनांक 17.05.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रमेश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रमेश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२०३/२०२६ — ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार :** १. चंद्रशेखर साहेबराव उर्फ सर्जेराव चौधरी, वय ६३ धंदा - सेवानिवृत्त
रा.बडनेरा रोड, श्रीकृष्ण विहार सातुर्णा नगर साईनगर, अमरावती
२. मंगला यशवंत गवळी, वय ६० धंदा - डॉक्टर
रा.कुकाना, ता.नेवासा, जि.अहमदनगर
३. उन्मेश साहेबराव उर्फ सर्जेराव चौधरी, वय ६० धंदा - नोकरी
रा.बॅकं कॉलनी, गोरेगांव, ता.जि.निझामाबाद राज्य-तेलंगाना पि.के.५०३२३०
४. सरला प्रफुल अढाऊ, वय ५८ धंदा - नोकरी
रा.प्लॉट नं.३, सप्तश्रृंगी विहार, सोनेगांव खामला, नागपूर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक साहेबराव उर्फ सर्जेराव चंपतराव चौधरी** यांचा मृत्यू दिनांक **२२.०९.२०१५** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक शकुंतला साहेबराव उर्फ सर्जेराव चौधरी** हिचा दि.**०१.१०.२०१८** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२०३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८५/२०२६ — ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :** १. गौतम शामराव गडलिंग, वय ४४ धंदा - मजुरी
२. निलेश शामराव गडलिंग, वय ४२ धंदा - मजुरी
३. अशोक शामराव गडलिंग, वय ३७ धंदा - मजुरी
४. ज्योती दिलीपराव जवंजाळ, वय ५० धंदा - घरकाम
५. कविता दीपक गवई, वय ४० धंदा - घरकाम
६. ललीता सुमेध राऊत, वय ३४ धंदा - घरकाम
अर्जदार नं.१,२,३ रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.४ रा.वायगांव, ता.भातकुली जि.अमरावती
अर्जदार नं.५ रा.बोदड, कारंजा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.६ रा.रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक शामराव बकाराम गडलिंग** यांचा मृत्यू दिनांक **२७.०६.२००३** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक बेबीताई शामराव गडलिंग** हिचा दि.**१५.०९.२००९** रोजी घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१८५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार

## वि.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ दि.अ.क्र.१११/२०२६ — ने.ता.१०.०६.२०२६

**अर्जदार :** १. मोहम्मद सद्दाम मोहम्मद युनूस (मुलगा), वय ३४ वर्षे, व्यवसाय - शेती
२. मोहम्मद इकबाल मोहम्मद युनूस (मुलगा), वय ४९ वर्षे, व्यवसाय - शेता
३. मोहम्मद अफसर मोहम्मद युनूस (मुलगा), वय ४१ वर्षे, व्यवसाय - शेती
४. मोहम्मद वकील मोहम्मद युनूस (मुलगा), वय ४८ वर्षे, व्यवसाय - शेती
सर्व रा.नांदसावंगी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **वरील** नमुद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे की, अर्जदारांचे वडील **मोहम्मद युनूस मोहम्मद युसूफ** रा.नांदसावंगी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती हे दिनांक **०४.०८.२०२०** रोजी नांदसावंगी येथे मरण पावले असून त्यांची पत्नी रुक्साना बी मोहम्मद युनूस, रा.नांदसावंगी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती या दिनांक **२०.१२.२०२४ रोजी** नांदसावंगी येथे मरण पावल्या आहेत. तसेच अर्जदारांनी नमूद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्च्यात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

म्हणून या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक १०.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकीलामार्फत लेखी स्वरुपात सादरकराव्यात. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक १०.०४.२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

## वि.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ दि.अ.क्र.१२८/२०२६ — ने.ता.१२.०६.२०२६

**अर्जदार :** १. विलासराव गुणवंतराव देशमुख, वय ५९ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.कनकपूर, सचिन, जि.सुरत
२. शिला राजाभाऊ देशमुख, वय ६० वर्षे, व्यवसाय - शेती
रा.उमरा देशमुख, ता.मेहकर, जि.बुलढाणा
३. अशोक गुणवंतराव देशमुख, वय ५५ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.भेस्तान चोरासी, जि.सुरत
४. राजेश गुणवंतराव देशमुख, वय ५१ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.कंसाड, सचिन, जि.सुरत
५. गजानन गुणवंतराव देशमुख, वय ५८ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत स्व.प्रभाताई गुणवंतराव देशमुख** यांचा मृत्यू दि.**१०.०५.२०२१** रोजी नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून आणि **स्व.गुणवंतराव श्रीपतराव देशमुख** यांचा मृत्यू दि.**२४.०८.२०१८** रोजी त्याच ठिकाणी झाला आहे. त्यांचा कायमचा पत्ता हा नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२३२/२०२६ — ने.ता.३०.०४.२०२६

**अर्जदार -** १. अर्पिता राजेश बुरंगे, वय ५५ वर्षे, धंदा -
२. आकांक्षा राजेश बुरंगे, वय २८ वर्षे, धंदा -
३. अमर्त्य राजेश बुरंगे, वय २१ वर्षे, धंदा -
४. फाल्गुनी राजेश बुरंगे, वय २३ वर्षे, धंदा -
सर्व रा.वार्ड नं.१६, सिंभोरा रोड, साई मंदिराजवळ, साई कॉलनी, मोर्शी ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ ते ४ ची आई असून अर्जदार नं.२ ते ४ हे एकमेकांचे सख्खे बहिण-भाऊ आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ४ हे मयत **राजेश विश्वासराव बुरंगे** यांचे वारस आहेत. **मयत राजेश विश्वासराव बुरंगे** हे दि.**११.०१.२०२६** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. **मयत राजेश विश्वासराव बुरंगे** यांचे वडील **विश्वासराव बुरंगे** यांचे दिनांक **२६.०७.२०१४** रोजी निधन झाले आहे. **मयत राजेश विश्वासराव बुरंगे** यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.०४.२०२६

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६८८/२०२६
**सुरेश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१७.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Suresh Balakrushan Upalkar, Age 63 Yrs. Occu.: Service
2. Sunanda Sunil Karapekar, Age 56 Yrs. Occu.: Household
3. Rajesh Balkrushna Upalkar, Age 50 Yrs. Occu.: Service
All 1 to 3 R/o Gorakshan Chowk, Behind Ajmera Decoration, Gandhi Chowk, Amravati
4. Kiran Sanjay Indapurkar, Age 59 Yrs. Occu.: Household
R/o Flat No. H-804, Kashikapdi Puram Kothrud, Pune

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बाळकृष्ण उर्फ बाळकष्ण मारोतराव उपलकर व लिलाबाई बाळकष्ण उपलकर** हे अनुक्रमे दिनांक 08.03.2019 व 12.06.2005 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुरेश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुरेश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.६७५/२०२६
**कमल अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०४.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. कमल बबन भिंगारे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.फ्लॅट नं.२०४, ब्ल्यू बेल अपार्टमेंट, अमरावती
२. आरती अनिल बांबल, वय २४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
रा.गायत्री मंदिराजवळ, विलास नगर, गल्ली नं.२, वि.म.वि., अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बबन सुदामराव भिंगारे @ बबन सुदामराव भिंगारे** यांचे दिनांक **१९.१०.१९९९** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार कमल अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल अधिक एक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.७१२/२०२६
**अभिजीत अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. अभिजीत रमण खारकर, वय २४ वर्षे, व्यवसाय - व्यापार व शेती
२. गुंजन रमण खारकर, वय २१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. संगीता रमण खारकर, वय ४५ वर्षे, व्यवसाय - व्यापार
४. सुमन मधुकरराव खारकर, वय ७५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.हनुमान नगर, खोलापुरी गेट, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मधुकर बापुरावजी खारकर** यांचे दिनांक **२१.०५.२०२०** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. तसेच **मयत रमण मधुकर खारकर** हे दि.**०९.०९.२०१०** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार अभिजीत रमण खारकर अधिक तीन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अभिजीत रमण खारकर अधिक तीन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३७/२०२६
**स्नेहल व तीन -वि- निरंक**
पुढील ता.२८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Snehal Wd/o Ashok Diwe, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Swapnil S/o Ashok Diwe, Age 49 Yrs. Occu.: Pvt. Job
3. Nikhil S/o Ashok Diwe, Age 35 Yrs. Occu.: Pvt. Job
All R/o Deshpande Layout, Dastur Nagar, Rukhmini Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Ashok Wamanrao Dive हे दिनांक 02.10.2015 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Snehal Wd/o Ashok Diwe + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Snehal Wd/o Ashok Diwe + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सांडपाणी, अतिक्रमण आणि बेघर निवारा केंद्राची आयुक्तांकडून पाहणी

**अमरावती/क्रा.प्र.**
शहरातील विविध भागांमध्ये सांडपाणी, नालेसफाई व अतिक्रमणाच्या वाढत्या समस्या लक्षात घेता अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी नागरिकांकडून वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारींची प्रत्यक्ष पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे कडक निर्देश दिले.

सर्वप्रथम आयुक्तांनी सामरा नगर उद्यान, सामरानगर परिसराला भेट दिली. येथे स्थानिक नागरिक सचिन थोटे यांनी वारंवार मांडलेल्या सांडपाण्याच्या समस्येची त्यांनी सखोल पाहणी केली. परिसरात सांडपाणी साचत असल्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी तातडीने निचरा व्यवस्थेत सुधारणा करण्याचे आदेश दिले.या अतिक्रमणामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यावर त्वरित कारवाई करून अतिक्रमण हटविण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश देण्यात आले.कोंडेश्वर रोडवरील पेट्रोल पंपासमोरील कच्च्या नालीची दयनीय अवस्था पाहून आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. येथे नाली



पक्की करून सांडपाण्याचा सुरळीत निचरा होईल यासाठी आवश्यक ती कामे तातडीने हाती घेण्याचे आदेश देण्यात आले.तसेच मनपा उर्दू शाळा क्रमांक ११ समोरील नाल्यांची पाहणी करत त्यांनी स्वच्छतेच्या अभावामुळे निर्माण झालेल्या अडचणींची दखल घेतली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून येथे नियमित साफसफाई व दुरुस्ती करण्याचे निर्देश त्यांनी दिले. आठवडी बाजार परिसरातील मटन मार्केट येथेही आयुक्तांनी भेट दिली. या ठिकाणी अतिक्रमण हटवून नाल्यांची तातडीने साफसफाई करण्याचे आदेश देण्यात आले.यानंतर झोन क्र. ४ कार्यालय, बडनेरा तसेच गोपाल नगर टी-पॉइंट परिसराची पाहणी करण्यात आली. या भागातही सांडपाणी व नाल्यांच्या समस्यांबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींची आयुक्तांनी दखल घेतली. त्यांनी केंद्रातील स्वच्छता, राहण्याची व्यवस्था, अन्नाची गुणवत्ता आणि इतर मूलभूत सुविधांची बारकाईने तपासणी करून बेघर नागरिकांच्या जीवनमानाबाबत असलेली त्यांची बांधिलकी स्पष्ट केली. अशा प्रकारे मानवी दृष्टिकोन ठेवून केलेले काम हे प्रशासनातील सकारात्मक बदलाचे प्रतीक असून, गरजू नागरिकांच्या जीवनात दिलासा निर्माण करणारे आहे. महानगरपालिका प्रशासन शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी कटिबद्ध असून नागरिकांनीही स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या पाहणी दरम्यान नगरसेवक अजय जयस्वाल, किशोर जाधव, नगरसेविका रजनी डोंगरे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक,उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मंगेश कडू,उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, उपअभियंता श्रीरंग तायडे, हेमंत महाजन, विवेक देशमुख, राजेश आगरकर, रविंद्र तांबेकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे, उद्यान निरीक्षक मुकेश खारकर, अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, अधिकारी, कर्मचारी, स्वास्थ निरीक्षक उपस्थित होते.

## संक्षिप्त



## भारताचा सुजाण नागरिक घडवणे हेच स्पर्धेचे ध्येय-गिरीष कुलकर्णी

**टाकरखेडा संभू-** चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल येथे गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धा ही विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे संस्कार रुजवण्यासाठी कार्यरत असून, या उपक्रमांतून भारताचा सुजाण नागरिक घडवणे हेच प्रमुख ध्येय आहे, असे प्रतिपादन स्पर्धेचे मुख्य समन्वयक गिरीष कुलकर्णी यांनी केले. ते शंकर विद्यालय तळवेल येथे आयोजित अंतिम मूल्यमापन शाळा भेटीदरम्यान बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजा देशमुख होते. प्रमुख उपस्थिती म्हणून गांधी रिसर्च फाउंडेशनचे पदाधिकारी विश्वजित पाटील, संजय जाधव, संस्थेचे सचिव नरेंद्र देशमुख, शेषस्मृती क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष वैकुंठराव वानखडे आदी उपस्थित होते.यामध्ये दर्शन प्रमोद हिवराळे याने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच सर्व मान्यवरांचा राजा देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान शंकर विद्यालयच्या 'स्वच्छंदी' या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर आधारित नाटिका सादर केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक समन्वयक डॉ. तुषार देशमुख यांनी केले. स्वागतपर भाषण प्रभारी मुख्याध्यापिका सुचिता फुटाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भाष्कर काळे यांनी केले.



## शिक्षण विभागात पाणपोई

**अमरावती-** जिल्हा परिषद शिक्षण विभाग येथे जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटना व जिल्हा परिषद कर्मचारी युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिक व येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी थंड पाण्याची व्यवस्था म्हणून पाणपोई सुरू करण्यात आली. पाणपोईचे उद्‌घाटन प्राथमिक शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांच्याहस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमध्ये नागरिक व कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यामध्ये श्रीकांत मेश्राम, विजय कोठाळे, पंकज गुल्हाने, गंगाधर मोहने, नरेंद्र गायकवाड, शरद शाहकार, विजय मालोकार, संजय मुंडे, प्रवीण जिसकर, चंदू टेकाळे, अर्चना मानकर, विजय राऊत उपस्थित होते.

## शिक्षक ते 'गुरु': मूल्यसंवर्धनासाठी SCMS नागपूरचा अभिनव प्रयत्न'

**नागपूर-** 'Faculty as 'Guru' for Cultivating Value-Based Leadership' या विषयावर एक विचारप्रवर्तक आणि ज्ञानवर्धक परिसंवाद सिम्बायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट स्टडीज (SCMS), नागपूर येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. हा उपक्रम जगद्गुरु देवनाथ वेद विज्ञान आणि संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

हा परिसंवाद आदि शंकराचार्य जयंतीच्या पावन निमित्ताने आयोजित करण्यात आला होता, ज्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरा आणि मूल्याधारित शिक्षण यांचे महत्त्व अधोरेखित झाले.या सत्राचे मार्गदर्शन आचार्य अनुराग देशपांडे यांनी केले, जे मूल्याधारित शिक्षण आणि



भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित नेतृत्व याबाबतचे तज्ज्ञ वक्ते आहेत. आपल्या मार्गदर्शनात, आचार्य अनुराग देशपांडे यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील 'गुरु' संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, मूल्यांचा आणि सर्वांगीण विकासाचा मार्गदर्शक असतो. त्यांनी आधुनिक अध्यापनात प्रामाणिकपणा, सहानुभूती, शिस्त आणि आत्मजागरूकता यांसारख्या मूल्यांचा समावेश कसा करता येईल यावरही प्रकाश टाकला. या सत्राने प्राध्यापकांना पारंपरिक अध्यापन पद्धतींपलीकडे जाऊन परिवर्तनशील आणि मूल्याधारित दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रेरित केले.

या परिसंवादाचे यशस्वी आयोजन SCMS नागपूरचे संचालक डॉ. समीर पिंगळे यांच्या मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे शक्य झाले. उत्कृष्टता यांचा संगम घडवून आणण्याच्या त्यांच्या दूरदृष्टीमुळे अशा उपक्रमांना चालना मिळाली.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी IKS (भारतीय ज्ञान प्रणाली) विभागाच्या प्रभारी डॉ. तेजस्विनी पारळकर यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे आणि समन्वयामुळे कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.हा उपक्रम एणश्ए नागपूरच्या सर्वांगीण शिक्षणाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे, ज्यामध्ये भारतीय ज्ञान प्रणालींचा समावेश करून आधुनिक शिक्षण अधिक समृद्ध केले जाते. अशा परिसंवादांमुळे प्राध्यापकांच्या क्षमतांमध्ये वाढ होण्यासोबतच जबाबदार आणि मूल्यनिष्ठ नेते घडवण्याच्या संस्थेच्या ध्येयाला बळकटी मिळते.परिसंवादाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला, ज्यामध्ये वक्ते, आयोजक आणि सहभागी यांचे योगदान मान्य करण्यात आले. या परिसंवादाने उपस्थितांवर दीर्घकालीन प्रभाव टाकत त्यांना खऱ्या अर्थाने 'गुरु' बनण्याची प्रेरणा दिली.

## विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण

### पाच नाविन्यपूर्ण कंपन्यांना आर्थिक पाठबळ

**अमरावती/का.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशन मार्फत पाच उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) वितरीत करण्यात आले. हा निधी वितरण सोहळा नुकताच विद्यापीठ परिसरातील इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडला.

स्टार्टअप इंडिया सिड फंड स्किम अंतर्गत या स्टार्टअप्सना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यामध्ये मोरया ॲग्रो रिसर्च नॅनो बायोटेक ८ लाख, एसजेडी श्रीजी ब्रादर्स प्रा. लि. ६ लाख, वेनो टेक्नॉलॉजीज प्रा. लि. १० लाख, पवन ई-पॉवर सोल्यूशन्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. १० लाख आणि इनशीराह हर्बल्स प्रा. लि. ४ लाख असे निधीचे वितरण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते करण्यात आले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर विभागातील स्टार्टअप्सना तांत्रिक मार्गदर्शन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत सक्षम स्टार्टअप इकोसिस्टम उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनच्यावतीने अथक परिश्रम घेण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, संचालक व सीईओ आनंद यादव तसेच मॅनेजर अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे आणि भावेश वारके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# शिरजगावच्या बसस्थानकात सुविधांचा अभाव!

**चांदूरबाजार/वार्ताहर**
तालुक्यातील तब्बल ३० हजार लोकसंख्या असलेले 'ब' वर्ग प्राप्त तीर्थक्षेत्राचा दर्जा शिरजगाव कसबा येथील बसस्थानक आपला अखेरचा श्वास घेत आहे. येथील बसस्थानकात सुविधांचा अभाव असून येथे सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नसल्याने येथे मुक्कामी असलेल्या बसमधून डिझेल चोरीच्या घटना घडल्या आहे.

या गावातून दररोज शेकडो प्रवासी व विद्यार्थी राज्य परिवहन मंडळाच्या बसने प्रवास करतात; मात्र गेल्या अनेक वर्षांपासून येथील बसस्थानकाची प्रचंड दुवस्था झाली असून संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.परतवाडा, चांदूरबाजार, मोर्शी आगारातून येथे नियमित बसफेऱ्या सुरू आहेत. आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी हे गाव शिक्षणाचे केंद्र आहे. त्यामुळे बसस्थानक नेहमीच वर्दळीचे ठिकाण असते. बसस्थानकातील नियंत्रण कक्षाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. या कक्षात व बसस्थानक परिसरात दुर्गंधी पसरली आहे. दारे-



खिडक्या तुटलेल्या आहेत. स्थानक परिसरात प्रवाशांना बसण्यासाठी साधी स्वच्छ जागाही उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिक तेथे जाणे टाळतात. परिणामी, चालक बस आत न नेता मुख्य रस्त्यावरूनच वळवतात. तेथे प्रवाशांना जीव धोक्यात घालून चढ-उतार करावी लागते.लाखो रुपये खर्चुन बांधलेल्या या इमारतीत व पिण्याच्या पाण्याची प्रसाधनगृहाची योग्य सोय नाही, तसेच वीजपुरवठा नसल्याने रात्रीच्या वेळी येथे अंधाराचे साम्राज्य असते. तसेच स्थानकावर उभ्या असलेल्या बसमधून डिझेल चोरीच्या घटना घडल्या आहेत.

> बसस्थानक प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण वास्तू आहे. तिच्या सौंदर्याकरण व देखभालीसाठी आगामी जिल्हा नियोजन समितीमध्ये एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना तातडीने निधी उपलब्ध करून देणार.
> **-प्रवीण तायडे,** आमदार

> शिरजगाव बसस्थानकाची दुरवस्था व प्रवाशांच्या तक्रारींबाबत मुख्य कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात एसटी महामंडळाकडून आवश्यक सोयीसुविधांसाठी निधी उपलब्ध होण्याचे नियोजन झाले आहे.
> **-प्रवीण डायलकर,** आगार व्यवस्थापक

## जय भीम ही नव्या भारताच्या उभारणीची ऊर्जा-ॲड.यशोमती ठाकूर

**नांदगाव पेठ/वार्ताहर**
'जय भीम हा केवळ अभिवादनाचा शब्द नाही, तर तो सामाजिक परिवर्तनाची प्रखर ऊर्जा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा 'जय भीम'मधून प्रत्येकाच्या मनात चेतना निर्माण करते. अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद, शिक्षणाची जिद्द आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा 'जय भीम' या मंत्रातूनच मिळते. त्यामुळे 'जय भीम' ही नव्या भारताच्या उभारणीची शक्ती आहे,' असे प्रभावी प्रतिपादन ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले.

सम्राट अशोक, क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त प्रज्ञास्पर्श बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ग्रामपंचायत पटांगणात या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. यशोमती



ठाकूर उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून कैलाश मोरे, प्रशासक कविता डांगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, भारतीय दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष प्रभाकर शेंडे, माजी जि.प. सदस्य विनोद डांगे, नितीन हटवार, गंगाधर खडसे, बाळासाहेब (श्रीधर) राऊत, प्रा. मोरेश्वर इंगळे,वृषाली इंगळे, राजेश बोडखे, श्याम देशमुख पुसदेकर, अर्जुन युवनाते, योगेश ठवळी, संस्थेचे अध्यक्ष अण्णाजी कांबळे, प्रमोद कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध तसेच महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली.

# श्री समर्थ विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

**अमरावती/का.प्र.**
श्री समर्थ शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री समर्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात झाली.शाळेचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष धनंजय पाठक, उपमुख्याध्यापक सचिन देवळे, पर्यवेक्षक मधुसूदन वटक, पर्यवेक्षक अमित कापगते व प्रमुख वक्ते पुरुषोत्तम जिचकार यांच्या हस्ते शाळेचे आराध्य दैवत श्री समर्थ रामदास स्वामी व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. पर्यवेक्षक मधुसूदन वटक यांनी याप्रसंगी



बाबासाहेबांच्या जयंती वरील समर्पक गीत आपल्या सुमधुर आवाजात सादर करून उपस्थितांची मने जिंकण्यासोबतच वातावरण निर्मिती केली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व शाळेचे सहाय्यक शिक्षक पुरुषोत्तम जिचकार आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एकसंघ समाज निर्माण करण्यासोबतच शोषितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यास प्रस्थापितांशी यशस्वी लढा दिला.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उपमुख्याध्यापक सचिन देवळे यांनी याप्रसंगी संविधानाने आपल्याला अधिकारांसोबतच कर्तव्यं सुद्धा सांगितलेली आहे याची जाणीव उपस्थितांना करून देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. शाळेचे मुख्य लिपिक मिलिंद देशपांडे यांनी सर्व भारतीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या आचरणात आणावे असे सांगितले.आपल्या माहितीपूर्ण अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक धनंजय पाठक यांनी हिंदू कोड बिल व डॉ.बाबासाहेब, महामानवांमुळे आधुनिक काळातील स्त्रीला प्राप्त झालेले हक्क व अधिकार यासोबतच घटनेतील ३७० वे कलम, समाननागरी कायदा, नदी जोड प्रकल्पाची संकल्पना , आरक्षण आदी प्रमुख विषयांवरील डॉ. बाबासाहेबांच्या भूमिकेचे सोप्या शब्दात विश्लेषण केले. बाबासाहेबांच्या संबंधाचा रंजक इतिहासही त्यांनी प्रतिपादन केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ.सौ.मनिषा ठाकरे यांनी केले. या प्रसंगी ॅसर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी पूर्ण संखेत उपस्थित होते.

## कौशल्य विकास विभागातर्फे निबंध स्पर्धा

**अमरावती-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. आंबेडकर याच्या विचाराचा प्रसार करणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

या स्पर्धेत पहिल्या गटात शासकीय आयटीआय, खासगी आयटीआय, तसेच आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतील. निबंधाच्या विषयासाठी विद्यार्थ्यांना ५०० ते ८०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुसरा खुला गट असून यात राज्यातील सर्व महिला आणि पुरुष सहभागी होऊ शकतील. या गटाला ८०० ते १ हजार २०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

दोन्ही गटाला निबंध केवळ मराठी भाषेत सादर करावा लागणार आहे. स्पर्धेचा कालावधी १४ एप्रिल ते २५ एप्रिल हा निश्चित करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे स्पर्धक ९१५२२३०१९३ या मोबाईल क्रमाकावर संपर्क करू शकतील.

विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

## निधन

### तुळसाबाई रामटेके

**आसेगाव पूर्णा -** येथील आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते



रामभाऊ अमृतराव रामटेके यांच्या मातोश्री तुळसाबाई अमृतराव रामटेके (वय ८५) यांचे दि. १९ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजताच्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज आसेगाव पूर्णा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुशिलाबाई पातशे

**कुऱ्हा-** अमरावती येथील व श्रीक्षेत्र कौंडण्यपूर अंबिका देवी संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पातशे यांच्या वहीणी वयोवृद्ध जेष्ठ महिला सुशिला पांडुरंगजी पातशे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दि. १९ एप्रील २०२६ अक्षय तृतीया च्या दिवशी दुपारी ४ वा अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पती एक मुलगा, दोन मुली, स्नुषा, जावाई, नातू, नातवंड असा आप्त परिवार बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व सुशिला पातशे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# महापौरांची तत्परता : सायन्सस्कोर मैदानावर उभारली जाणार स्वच्छता व स्नानगृह

**अमरावती/का.प्र.**
शहराचे प्रथम नागरिक, महापौर श्रीचंद तेजवानी यांनी पुन्हा एकदा आपल्या कार्यतत्परतेचा प्रत्यय दिला आहे.महापौरांनी बसस्थानक परिसरातील सायन्सस्कोर मैदानावर भेट दिली असता, नागरिकांनी मांडलेल्या समस्यांची दखल घेत त्यांनी तातडीने तेथे स्वच्छतागृहे आणि स्नानगृहे उभारण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

दररोज सकाळी आरोग्याप्रती जागरूक नागरिक मोठ्या संख्येने सायन्स्कोर मैदानावर 'मॉर्निंग वॉक' साठी येत असतात. यावेळी नागरिकांनी महापौरांची भेट घेऊन मैदानावर असलेल्या मूलभूत सुविधांच्या अभावाकडे त्यांचे लक्ष वेधले. विशेषतः मैदानावर सध्या सुरू असलेल्या विविध उत्सवांमुळे आणि मेळाव्यामुळे तेथे दुकानांची मोठी गर्दी असते. मात्र, परिसरात कायमस्वरूपी स्वच्छतागृह नसल्यामुळे महिला, पुरुष नागरिक आणि व्यापाऱ्यांची मोठी गैरसोय होत होती. ही बाब लक्षात येताच महापौरांनी यावर तात्काळ



तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.स्वच्छतेचा मुद्दा गांभीर्याने घेत महापौर श्रीचंद तेजवानी यांनी जिल्हा परिषद ऑफिस मध्ये हा मुद्दा मांडला असता,त्या विषयी सकारात्मक चर्चा झाली असून,या ठिकाणी महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज स्वच्छतागृहे बांधण्याचे निर्देश दिले. बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांची सोय व्हावी, या उद्देशाने ५ आधुनिक स्नानगृहे (Bathrooms) उभारण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

केवळ आश्वासन न देता महापौरांनी प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली आहे. सदर जागा जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असल्याने, तेथे शौचालय बांधकामासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेसाठी महापौरांनी जिल्हा परिषद प्रशासनाशी पत्रव्यवहार सुरू केला आहे.महापौरांच्या या निर्णयामुळे दररोज फिरायला येणाऱ्या नागरिकांची, मेळाव्यातील दुकानदारांची आणि विशेषतः महिलांची मोठी अडचण दूर होणार आहे. महापौरांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेमुळे आणि तत्परतेमुळे अमरावतीकर नागरिकांमधून त्यांचे विशेष कौतुक होत आहे. स्वच्छ आणि सुंदर अमरावतीसाठी महापौरांचे हे महत्वाचे पाऊल ठरणार आहे.यावेळी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, नगरसेविका सुरेखा लुंगारे उपस्थित होते.

# गाजीपूर-रुदाळीत वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर,तरीही बफर झोनबाहेरच

## वनविभागाच्या अहवालातूनच उघड : एसआयटी नेमून चौकशी करण्याची मागणी

**अॅड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील नरनाळा अभयारण्यालगतच्या व कोअर सीमेपासून केवळ ४ किमी अंतरावर असलेल्या गाजीपूर आणि रुदाळी गावांच्या संदर्भातील वाद आता अधिकच गंभीर वळणावर पोहोचला असून, वनविभागाच्या अंतर्गत अहवालातूनच धक्कादायक बाबी समोर येऊ लागल्या आहेत. ज्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वन्य प्राण्यांचा वावर असल्याची नोंद अधिकृत अहवालात करण्यात आली आहे, त्याच भागाला बफर झोनच्या बाहेर ठेवण्यात आल्याने संपूर्ण प्रक्रियेवर संशय अधिकच गडद झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वन अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या एका अहवालात गाजीपूर आणि रुदाळी परिसरात वन्यजीवांचा लक्षणीय वावर असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. या भागात नैसर्गिक अधिवास, जलस्रोत आणि घनदाट वनसदृश्य क्षेत्र असल्याने विविध प्रजातींचे वास्तव्य असल्याची पुष्टीही करण्यात आली आहे. असे असतानाही या गावांचा बफर झोनमध्ये समावेश न होणे ही केवळ प्रशासकीय त्रुटी नसून, जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय असल्याचा आरोप अधिक तीव्र होत आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, पोपटखोड गट ग्रामपंचायतीअंतर्गत गाजीपूर व रुदाळी या गावांनी बफर झोनमध्ये समावेशासाठी स्वतंत्र ग्रामसभेचा ठराव घेतल्याची नोंद स्वतः वनविभागाच्या कागदपत्रांमध्ये असल्याचे समोर आले आहे. मात्र, हा ठराव अकोट वन विभागातील तत्कालीन अधिकाऱ्यांनी पुढे पाठविलाच नसल्याचे एका अधिकृत अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे 'ठराव दडपला गेला का?' हा प्रश्न आता केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता चौकशीचा मुख्य मुद्दा ठरत आहे.

दरम्यान, सध्याच्या स्थितीत या संपूर्ण परिसरात खाणकाम, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट यांसारख्या प्रदूषणकारी उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाल्याचे वास्तव समोर येत आहे. हे उद्योग थेट वनपरिक्षेत्रालगत १००० मीटरच्या आत असल्याने ध्वनी, वायू व धूळ प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. परिणामी, वन्य प्राण्यांच्या हालचालींवर परिणाम होत असून त्यांच्या अधिवासावर गंभीर धोका निर्माण झाला आहे.

स्थानिकांच्या मते, रात्रीच्या वेळी स्फोटकांचा वापर, दिवसरात्र सुरू असलेले क्रशर आणि वाढती मानवी हालचाल यामुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक वर्तनात बदल होत आहे. काही प्रजातींचे स्थलांतर, तर काहींची संख्या घटल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या दृष्टीने हा भाग संवेदनशील मानला जात असून, अशा ठिकाणी औद्योगिक उपक्रमांना परवानगी देणे ही धोरणात्मक विसंगती असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**■ वन्यजीव अहवालालाच हरताळ?**

वनविभागाच्या अहवालातच गाजीपूर-रुदाळी परिसरात वन्य प्राण्यांचा वावर असल्याचे नमूद असताना, त्या भागाला बफर झोनमध्ये स्थान न देणे ही गंभीर विसंगती मानली जात आहे. यामुळे विभागीय स्तरावरील निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**■ उद्योगवाढ की पर्यावरण हानी?**

खाण, क्रशर व हॉट मिक्स प्लांटमुळे परिसरातील जैवविविधता धोक्यात आली असून, वन्यजीवांच्या अधिवासावर थेट परिणाम होत असल्याचे चित्र आहे. प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. तर सोबतच या ठिकाणी असलेल्या फळबागांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे थर साचल्याने उत्पादनात घट होत असून त्याचा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसत आहे.

वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बफर झोनची संकल्पना प्रत्यक्षात निष्प्रभ ठरत असल्याची टीका आता उघडपणे होऊ लागली आहे. 'ज्या भागात वन्यजीव आहेत, तोच भाग संरक्षणाबाहेर आणि प्रदूषणकारी उद्योगांसाठी खुला कसा?' हा मूलभूत प्रश्न या प्रकरणामुळे उपस्थित झाला आहे.

एकंदरीतच वन्यजीवांची उपस्थिती, अस्तित्वात असलेला ग्रामसभेचा ठराव आणि त्यानंतरही झालेली वगळण्याची प्रक्रिया, या तिन्ही बाबींचा एकत्रित विचार करता, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी अपरिहार्य ठरत आहे.

आता प्रशासन या प्रकरणात पारदर्शक भूमिका घेऊन सत्य समोर आणणार का, की ' खाण - क्रशर ' धारकांच्या दबावाखाली पूर्वीप्रमाणे हा विषय फाईलपुरताच मर्यादित ठेवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल प्रकरण**

# चार आरोपींना २७ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

## महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील अल्पवयीन मुलींचे व्हायरल अश्लील व्हिडिओ व फोटो प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने दिलासा नाकारत त्यांचा पोलीस कोठडी (PCR) कालावधी वाढविला आहे. न्यायालयाने मुख्य आरोपी अयान अहमद तन्वीर अहमद, सह आरोपी उजैर खान इकबाल खान तसेच मो. साद मो. साबिर आणि तबरेज खान तसलीम खान यांना दि.२७ एप्रिल २०२६ पर्यंत वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे.




या प्रकरणातील तपास अद्याप सुरू असून अनेक महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आरोपींकडून अधिक माहिती मिळविणे, डिजिटल पुरावे तपासणे तसेच गुन्ह्याशी संबंधित इतर व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा शोध घेण्यासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयात☞(पान २ वर)

# दर्यापूर न्यायालयासमोर इसमाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

## उष्माघाताने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर न्यायालया समोर सोमवारी (दि.२०) सायंकाळच्या सुमारास ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली.

दादाराव नकुल शिवरकर (वय ३५ ) रा.समता नगर दर्यापूर असे मृतक इसमाचे



नाव असून नातेवाईकांच्या माहिती नुसार मृतक दादाराव हा शनिवार (दि.१९) पासून उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर या ठिकाणी पेशी कमी झाल्यामुळे उपचार घेत होता. सोमवारी दुपारी कोणाला न सांगता ते उपजिल्हा रुग्णालयातून निघून गेलेत. दरम्यान कडाक्याची ऊन असल्यामुळे☞(पान २ वर)

### प्रकाशचंद्र सरवैया यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील मनीष हार्डवेअरचे संचालक अनीष आणि मनीष सरवैया यांचे वडील



प्रकाशचांद्र मोतीलालजी सरवैया यांचे सोमवार, २० एप्रिल २०२६ रोजी दुःखद निधन झाले. स्व. प्रकाशचंद्रजी सरवैया यांची अंत्ययात्रा मंगळवार, २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता त्यांच्या निवासस्थान 'पुष्पप्रकाश', मंगलमूर्ती कॉलनी, हॉटेल कन्हैया कुंजच्या मागे, महेश नगर, अमरावती येथून काढण्यात आली. त्यांच्या निधनाने सरवैया परिवारावर शोककळा पसरली आहे.

# शासकीय-निमशासकीय कर्मचारी संपावर

## अनेक कार्यालयात कामकाज ठप्प

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुधारित पेन्शन योजनेची अंमलबजावणी आणि इतर मागण्यांची पूर्तता न झाल्याने शासकीय निम शासकीय कर्मचाऱ्यांनी आजपासून (दि.२१) बेमुदत संप पुकारला आहे. यामुळे अधिकांश कार्यालयामध्ये शुक शुकाट पाहायला मिळाला. राज्य सरकारच्या विरोधात तीव्र नाराजी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. कर्मचाऱ्यांना सुधारित पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, कॅशलेस उपचाराची सुविधा मिळावी, रिक्त पदांची भरती करण्यात यावी, सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण



रद्द करण्यात यावे, आठवा वेतन आयोग त्वरित कार्यान्वित करावा, वेतन पुनर्रचनेसाठी स्वतंत्र आयोग नेमण्यात यावा, सेवानिवृत्तीचे वय ६० करण्यात यावे या सह इतर मागण्यांसाठी संप सुरू करण्यात आला आहे. या संपामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही सहभाग आहे. संपात ब्रजेश वस्तानी, ☞(पान २ वर)

# दिलीपबाबू इंगोले यांचे शिवपरिवाराच्या वतीने अभिष्टचिंतन

## हेमंत काळमेघ यांच्या उपस्थितीत दिल्या शुभेच्छा

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचे वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला शिवपरिवाराच्या वतीने अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी गुलाबपुष्पहार देऊन शुभेच्छा दिल्या.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रत्येक कार्याची खडानखडा माहिती ठेऊन प्रत्येक कार्यपूर्तीसाठी सातत्याने धडपडत राहणारे संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचा संपूर्ण विदर्भात मोठा चाहता वर्ग आहे. विशेषत: भाऊसाहेबांच्या विचारांवर कार्य करणाऱ्या शिवपरिवाराच्या वतीने आज हेमंत काळमेघ यांच्या प्रमुख उपस्थितीत दिलीपबाबू इंगोले यांच्या निवासस्थानी जाऊन गुलाबपुष्पहार देऊन त्यांचे सहपरिवार अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी दिलीपबाबु इंगोले यांच्यासह



त्यांच्या पत्नी सौ.प्रेरणाताई इंगोले, चिरंजीव अक्षय इंगोले यांचीही उपस्थिती होती.

यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष नरेश पाटील, बँकेचे संचालक तथा भारत कृषक समाजाचे जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब मेटकर, संचालक सुरेंद्र गावंडे, संचालक ओंकार बंड तसेच राजू सुंदरकर, अॅड.मनोज खंडारे, संजय भोकसे, आशिष इखे, नितीन कडू, राजेश गाडगे, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे,नरेंद्र इंगोले, प्रतिक खुरद,युवक बिरादरीचे माजी संचालक गौरव इंगळे, अनिल कराळे, चंदू अढाऊ यांच्यासह अन्य मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती. यावेळी इंगोले परिवारातील सर्व सदस्यांची देखील उपस्थिती होती.

# जिल्हा वकील संघाची निवडणुक, ३० एप्रिलला मतदान

### -अॅड सुमित शर्मा अविरोध लायब्ररी सचिव

### अध्यक्ष पदासाठी अॅड.विश्वकर्मा, देशमुख व धनराज साधवानी यांच्यात लढत



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा वकील संघाच्या २०२६-२०२८ द्विवर्षीय कार्यकारणीसाठी निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्या नुसार ३० एप्रिल रोजी मतदान होणार आहे आणि १ मे रोजी मतमोजणी होणार आहे. १६०० वकील सदस्य मतदानाचा हक्क वाजविणार आहे. निवडणुकीची नामांकन प्रक्रिया मंगळवार २१ एप्रिल रोजी पूर्ण झाली. यामध्ये अॅड. सुमित शर्मा यांची लायब्ररी सचिव पदी निर्विरोध निवड झाली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी ☞(पान २ वर)

# आईसह मुलावर हल्ला

## घरात तोडफोड करून वाहनाचे नुकसान

### अकबर नगर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरात शिरून आई आणि मुलावर सशस्त्र हल्ला करण्यात आल्याची घटना नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या अकबर नगर परिसरात समोर आली आहे. या हल्ल्यात वसीम खान उर्फ शेरू शकील खान (वय २३) यांची आई आणि भावाला मारहाण करण्यात आली. वसीम खानच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी शेख सलमान



शेख अतीत (वय ३०), आकीब खान युसुफ खान पठाण (वय ३२), शाहिद रफ्तार, जावेद खान उर्फ गोलू अनवर खान (वय २८),सुफियान खान (वय १९) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार आरोपी शेख सलमान☞(पान २ वर)

# दिवसाढवळ्या घरफोडी करणाऱ्या महिलेसह दोघे ताब्यात

### -४.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** शहरातील गायत्री नगरमध्ये दिवसा ढवळ्या एका बंद घराला निशाणा बनवून तेथून रोख व दागिनेसह लाखोचा मुद्देमाल लंपास करण्यात आला होता. या प्रकरणात ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करून आरोपी महिलेसह (वय ४५, सादिया नगर, अमरावती) सोनार विवेक यादवराव कुंभलवार (वय ४०, लक्ष्मी नगर, अमरावती)



यांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्या कडून ३४ ग्राम ६० मिली सोने किंमत ४ लाख ७६ हजार ८४० रुपयांचा ☞(पान २ वर)

# नांदगाव पेठ परिसरात केबल व बॅटरी चोरट्यांचा सुळसुळाट

## शेतकऱ्यांसह वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण



**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** परिसरात केबल तसेच बॅटरी चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांसह वाहनधारकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. मौजा नांदगाव पेठ भाग-१ तसेच कठोरा गांधी रेल्वे लाईन परिसरातील शेतांमधून मोठ्या प्रमाणात केबल लंपास करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे.

माहितीनुसार, तब्बल १७ हून अधिक शेतकऱ्यांच्या☞(पान २ वर)

# धामोडी गावचा ७५ वर्षांचा वनवास संपेना!

## दोन दिवसांच्या उपोषणानंतरही रस्ता कागदावरच

### ग्रामस्थांचा प्रशासनाला जाब

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यात स्वातंत्र्यानंतर तब्बल ७५ वर्षे उलटूनही धामोडी गावाला पक्क्या रस्त्याचा लाभ अद्याप पर्यत मिळालेला नाही. ग्रामस्थांनी अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाने केवळ आश्वासनांचीच पूर्तता केली. अखेर संतप्त ग्रामस्थांनी दोन दिवसांचे उपोषण करत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.



गावासाठी मंजूर असलेल्या ९ किलोमीटर रस्त्यापैकी प्रत्यक्षात फक्त दीड किलोमीटरचाच रस्ता तयार करण्यात आला आहे. उर्वरित रस्ता आजही कागदोपत्रीच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे गावकऱ्यांना दैनंदिन जिवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होते. चिखल आणि खड्ड्यांनी भरलेल्या मार्गामुळे रुग्णांना वेळेवर दवाखान्यात नेणे कठीण होते, विद्यार्थ्यांना शाळेत पोहचण्यासाठी जिव धोक्यात घालावा☞(पान २ वर)

# सोन्याचे दागिने चमकवण्याच्या नावावर २.२५ लाखांनी फसवणूक

### -गणोरी येथील घटना, दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोन्याचे दागिने चमकविण्याच्या नावावर २ लाख २५ हजाराने फसविण्यात आल्याची घटना भातकुली पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या गणोरी गावात घडली आहे. या प्रकरणात पोलिसांनी विजय हरिभाऊ घोरमोडे (वय ५६) यांच्या तक्रारी वरून २ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार विजय



घोरमाडे ☞(पान २ वर)